भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला, क्र. ७८

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक ग्रंथमाला, क्र. ४

# पेठे — दप्तर

## भाग २ रा

MR
954.792
C 448.II P

MR
954.792
C448.II P

वि. सि. चितळे

# शिवचरित्रकार्यालयाचे शिवचरित्रविषयक ग्रंथ

ह्या तीनहि ग्रंथांत इंग्रजी, डच, पोर्तुगीज, फारसी तसेंच संस्कृत, कानडी, हिंदी ह्या भाषांतील श. १३४८ ते श. १६०४ (इ. १६८२ एप्रील) अखेर-पर्यंत पत्रांचा राजकीयदृष्ट्या विस्तृतपणें मराठींत काढलेला सारांश दिलेला आहे. अर्थातच मराठी पत्रें ह्यांत घेतलेलीं आहेत हें सांगणें नको. १९३७ पर्यंत जेवढी ह्या ७।८ भाषांमधून इतस्ततः पत्रें म्हणून प्रसिद्ध झालीं त्यांचा सारांश कालानुक्रमानें ह्या भागांतून प्रसिद्ध झाला आहे. पत्रें व तीं कालानुक्रमानें लावलेलीं असणें ह्याहून इतिहासअभ्यासकास दुसरी महत्त्वाची गोष्ट नाहीं. अशीं पत्रें ह्या तिन्ही भागांत अंदाजें तीन सहस्र आलीं आहेत. शिवाय तिसऱ्या भागांत अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब ह्या बादशहांच्या कारकीर्दीची **जुलूस-वर्षे** म्हणजे त्यांच्या कारकीर्दीच्या प्रत्येक वर्षाचा प्रारंभकाल मुसलमानी व इंग्रजी वर्ष, महिना, तारीख असा दिला आहे. ह्या सर्वांपेक्षां **शिवकालीन शकावली** पृष्ठें सुमारें १५० आली आहे. पृष्ठसंख्या ९७०. किं. भाग १, २ प्रत्येकी रु. ३॥, भाग ३ रु. २॥.

**शिवचरित्र निबंधावली**—ह्या ग्रंथांत श्री. द. वि. आपटे, प्रो. पटवर्धन, प्रो. कुंभारे, प्रो. देशपांडे, प्रो. ओतुरकर, श्री. दि. वि. काळे, श्री. शं. ना. जोशी, श्री. वा. सि. बेंद्रे, रा. सा. गं. के. देशपांडे ह्यांचे मुख्यतः तत्कालीन पत्रांचें आधारें शिवचरित्रांतील प्रसंगावर लिहिलेले निबंध आले आहेत. पृ. ४१२, किं. रु. ३॥.

**शिवाजी निबंधावली भाग १**—ह्या ग्रंथांत प्रो. काणे, प्रो. पेंडसे, श्री. रा. राजोपाध्ये, प्रो. सबनीस श्री. य. खु. देशपांडे, श्री. बा. आ. देशप्रभु पेडणेकर, श्री. ज. स. करंदीकर, म. म. गौरीशंकर ओझा, प्रो. दांडेकर, बॅ. प्रो. पुणतांबेकर, श्री. भट, श्री. शि. का. ओक-धार ह्यांचें शिवकालीन संस्कृति व धर्म, गागाभट्ट, शिवाजीची कौटुंबिक माहिती, राजनीति, संतांची कामगिरी, शिवजन्मदिननिर्णय, श्रीसमर्थ रामदास, शिवकालीन विदर्भ, शिवाजीचे कुलोपाध्याय, (शिवकालीन सिंहस्थ, निजामशाही व अदिलशाही सुलतान परिशिष्ट) इत्यादि निबंध आले आहेत. पृ. ३००, किं. रु. ३॥.

**शिवाजी निबंधावली भा. २**—मध्यें प्रो. आगा हैदर हसन-अलीनामा दा. वि. गोखले-शिवकालीन प्रवासी पिटर डेला व्हॅले; प्रो. कुलकर्णी-शिव-कालीन भाषा; प्रो. देशपांडे-मोडी लिपी; श्री. चिं. वि. वैद्य-मराठ्यांच्या ९६ कुळांच्या याद्या, मराठे व रजपूत; श्री. ग. ह. खरे-शिवकालीन राजपत्रलेखन; श्री. बेंद्रे-जंजिरेकर शिद्दी; श्री. मा. ह. घोरपडे-शिवाजी व तत्कालीन मराठे प्रतिस्पर्धी; श्री. शि. ग. पवार-शिवकालीन ज्योतिर्गणित; प्रो. भानू-प्रतापगड

(पुढील मजकूर कव्हरपान ३ पाहा.)

No ........



भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७८

# पेठे–दप्तर

## भाग २ रा

संपादक
विष्णु सिताराम चितळे,
एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन).

शके १८७२ ] मूल्य ३ रुपये [ इ. १९५०

प्रकाशक :
चिं. ग. कर्वे,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ,
३१३ अ, सदाशिव पेठ, पुणे २.

Library IIAS, Shimla
MR 954.792 C 448.1 P-C 448.11
00008988

MR
951.79
C-148.1

पहिली आवृत्ति, १९५० जून.

INDIAN INSTITUTE OF ADVANCED STUDY
Acc. No. 8988
Date 19.3.66

मुद्रक :
लक्ष्मण नारायण चापेकर,
आर्यसंस्कृति मुद्रणालय, लि.,
१९८/१७ सदाशिव पेठ, पुणे २.

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| | निवेदन ... ... ... | १–२ |
| | प्रस्तावना ... ... ... | १–१२ |
| १. | लेखांक ८८–१२७ ... ... | १–४४ |
| २. | पेशव्यांच्या रोजकीर्दीतील महत्त्वाचे उतारे ले. १२८–१८२ ... ... | ४५–७३ |
| ३. | पेठ्यांची वंशावळ ले. १८३ ... ... | ७३–७५ |
| ४. | पेठ्यांच्या वंशावळीसंबंधीं दीक्षित यांच्या कीर्दीतील उतारे ले. १८४ ... | ७६–७७ |
| ५. | म्हैसूर-कर्नाटक युद्धाच्या वेळचे ... ... त्रिंबकरावमामांचे मुक्काम इ.१७७०-१७७२ ... | ७७–८२ |
| ६. | त्रिंबकरावमामा पेठे शकावली इ. १७१० – १८३२ ले. १८५ ... | ८२–१२८ |
| ७. | सूची ... | १२९–१५७ |

# चिटणिसी निवेदन

कै. बाबासाहेब इचलकरंजीकर-स्मारक-ग्रंथमालेंत हें चवथें पुष्प भारत इतिहास संशोधन मंडळातर्फे ओंवलें जात आहे. पेठे दप्तराचा पहिला भाग याच ग्रंथमालेंतील दुसरें पुष्प होतें. तेव्हां त्याच ग्रंथमालेंत पेठे दप्तराचा दुसरा भागहि समाविष्ट व्हावा हें अगदीं योग्य म्हणतां येईल.

पेठे-दप्तराचा हा दुसरा भाग मागें आश्वासिल्याप्रमाणें श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं प्रसिद्ध होत आहे. यांत ८८ ते १८२ इतके लेख, पेशव्यांची वंशावळ, म्हैसूर-कर्नाटक युद्धाच्या वेळचे त्रिंबकरावमामांचे मुक्काम व त्रिंबकरावमामा पेठे-शकावली एवढा मजकूर आहे. या दोन्ही भागांवरून पेशवाईतील अव्वल मुत्सद्दी व सरदार त्रिंबकरावमामा यांच्याविषयीं बरीच नवी माहिती मिळत आहे. संपादक श्री. चितळे यांनीं प्रस्तावनेंत नवीन साधनांवरून प्रत्ययास येणारें मामांचें चरित्र व पराक्रम हीं साधार निवेदिलीं आहेत. बारभाईंना मामांचा फार मोठा आधार वाटत होता व त्याप्रमाणें मामाहि वागत होते. नागपूरकर भोसले घराण्यांतील साबाजी आणि दर्याबाई या परस्परविरुद्ध पक्षांतील म्होरक्यांना आपल्या गोटांत आपल्याबरोबर वागविण्यांत मामांची मुत्सद्दीगिरी प्रत्ययास येते. केव्हां कोणता पक्ष घेईल व काय करील याचा नेम नाहीं असा बेविश्वासी व अत्यंत स्वार्थी जो निजाम त्यालाहि दादांकडून फोडण्यांत मामांनीं जी कारवाई केली ती लक्ष्यांत घेण्याजोगी आहे. तथापि सखारामबापू किंवा नाना फडणीस यांच्यासारखा दौलतीचा कारभार उरकण्याचा मामांना त्यांच्या स्वभावदोषामुळें जमलें नसतें व जमलेंहि नाहीं. १७५१त नानासाहेब पेशव्यांच्या अमदानींत त्यांना एकदां कारभारीपण मिळालें होतें व नंतर सखारामबापूंनीं राजीनामा दिल्यावर १७६१ सालीं त्यांच्या गळ्यांत ते नाखूष असतां ती जबाबदारी टाकण्यांत आली. मामा स्पष्टवक्ता शिपाईगडी; त्यांना राजकारणांतील डावपेंच व लपंडाव काय माहीत ! याचा फायदा इतर कार्यसाधूंनीं भरपूर करून घेतलेला दिसतो. अमो.

प्रस्तुत कागदपत्रसंग्रहांत पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी आढळतात. राजकीय बाबींची यांतील माहिती संपादकांनीं प्रस्तावनेंत सविस्तर दिलीच आहे. पेशवाईतील शूर सरदार सखाराम हरि गुप्ते यांच्याविषयीं यांत बरेच उल्लेख आहेत. त्या काळांत उंट, घोडे, हत्ती वगैरे जनावरांची किंमत काय होती हें कळून येतें. पेश्व्यांचें वांटणीपत्र (ले. १२०–१२१) वाचनीय आहे. त्यांत देव, गुरें व कुणबिणी यांच्या वांटण्या आहेत. लढायांतील जखमा बऱ्या झाल्यावर त्यांवर पाणी घेण्याचा सोहळा असतो; त्या वेळीं आहेर येत असतात. म्हणजे मराठेशाहींत पराक्रमाची कशी बूज करण्यांत येत असे हें दिसून येतें.

या ग्रंथांतील शकावली फार बारकाईनें केलेली दिसते. त्यामुळें कांहीं उल्लेख जरूरीचे नसतांना आले आहेत. [ उदा० १७६२ डिसेंबर ५–त्रिंबकरावमामांच्या पत्रांत अवसान नाहीं (खरे भाग १, ले.१३४) ] या मजकुराचें प्रयोजन काय ? कांहीं तारखा पत्रांतील घटनांच्या नसून पत्र रवाना केल्याच्या आहेत.

त्रिंबकरावमामांचे कर्नाटकयुद्धांतील मुक्काम साक्षेपानें दिलेले आहेत. त्यांवरून मोहिमांतील मार्गांचा चांगला नकाशा करतां येईल. असो. याप्रमाणें संपादकांनीं मोठ्या कसोशीनें पेश्व्यांची माहिती जमवून ती संगतवार लाविली आहे.

ऐतिहासिक साधनांत या पेठे दप्तराची भर नवीन व महत्त्वाची वाटेल यांत शंका नाहीं. श्री. चितळे यांनीं हें दप्तर मंडळास स्वीयग्रंथमालेंत प्रसिद्ध करण्यास दिल्याबद्दल मंडळ त्यांचे फार आभारी आहे. तसेंच इचलकरंजीकर स्मारक–समितीचेहि आभार मानणें जरूर आहे. समिति मंडळाकडून अशीच निरंतर सेवा घेत राहील अशी आशा आहे.

चिंतामण गणेश कर्वे
चिटणीस
भा. इ. सं. मंडळ, पुणें.

# प्रस्तावना

बाळाजी विश्वनाथाच्या काळापासून सवाई माधवरावाच्या जन्मापर्यंत पेशवाईतील घडामोडी पाहिलेला अनुभवी व स्पष्टवक्ता मुत्सद्दी, बाणेदार सरदार व शूर सेनापति म्हणून त्रिंबकरावमामा पेठे याचें नांव मराठ्यांच्या इतिहासांत महशूर आहे. सन १७१३ च्या सुमारास त्याचा जन्म झाला, प्रथम लग्न सन १७२५ च्या सुमारास झालें व प्रत्यक्ष जबाबदारीच्या कामगिरीला सन १७२८ मध्यें त्यानें सुरवात केली. त्या वेळेपासूनच राजकारणांत तो हळूहळू पुढें येऊं लागला; इतका कीं, पेशव्याच्या प्रभावळींत त्याला मोठ्या मानाचें स्थान प्राप्त झाल्यानें त्याचा सल्ला स्वीकारण्यांत येऊं लागला. सन १७५१ च्या सुमारास नानासाहेब पेशव्यानें आपल्या व भाऊच्या गैरहजेरींत पुण्यास पेशव्यांच्या दौलतीच्या कारभारीपदावर त्याची नेमणूक केली व त्यानेंही ती कामगिरी मोठ्या जबाबदारीनें हांकून नांव कमाविलें. त्यामुळें नानासाहेबाच्या निकटवर्ती सल्लागारमंडळांत त्याची गणना होऊं लागली. सन १७५९ मध्यें तो साताऱ्यास पेशव्याचा मुतालिक म्हणून कांहीं महिने काम करीत होता. त्यावेळीं आपल्या कर्तबगारीनें त्यानें ताराबाईसारख्या जहांबाज राजकारणी स्त्रीकडूनही 'मातुश्रीही मामानी आजून रजावंदच राखली' (पु. द. १, ले. ३६९) अशी वाहवा मिळविली. परंतु त्रिंबकरावमामाचें खरें तेज माधवरावाच्या वेळेपासूनच जास्त फाकूं लागून त्याच्या मृत्यूपर्यंत तें एकसारखें वृद्धिंगतच होत गेलें.

माधवरावाला पेशवेपद मिळाल्यानंतर व विशेषतः उरुळीच्या तहानंतर पुण्याच्या कारभारांत 'डोहणा' पडून कारभाराचा गाडा सुरळितपणें चालीस लागण्याचें चिन्ह दिसेना. एकीची बेकी होणार असा रंग दिसत होता. त्याला त्रिंबकरावमामाच थोडाफार जबाबदार आहे असें मानणारे लोक, माधवरावापूर्वी 'परिस्थिति ओळखून शहाणपणानें वागणारा' त्रिंबकरावमामा या वेळीं घसरला असें समजून, त्याच्यावर ते आग पाखडतांना दिसलें कीं, त्यांची कींव करावीशी वाटते. खरा प्रकार असा आहे कीं, उरुळीच्या तहानंतर सखारामबापूनें पेशव्याच्या कारभारीपणाचा आपण होऊन राजीनामा दिला व चालत्या गाड्यास खीळ घालून स्वतःचें महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें माधवरावाच्या पुढें आपण अडचणीचे डोंगर उभे करीत आहों, याची त्याला फारशी जाणीव नसावी; निदान असली तरी त्याची त्यानें फिकिर बाळगली नाहीं. अशा स्थितींत गोपिकाबाईनें त्रिंबकरावमामा नको नको म्हणत असतां

त्याच्या अंगावर कारभारीपणाचीं वस्त्रें माधवरावाकरवीं टाकिलीं. यांत त्रिंबकरावमामांकडे कोणता दोष येतो तें कळत नाहीं. या बाबतींत खुद्द त्रिंबकराव लिहितो, "कारभाराची सोय म्हणावी तर हल्लीं या दौलतीस ज्या अनुपति प्राप्त झाल्या आहेत तशा मागेंही जाल्या नाहींत व पुढेंहि होणार नाहींत. असें असतां जातीनें मला लोभ कारभारामध्यें आहे नाहीं या गोष्टीची निशा तुम्हांस आहे. एक गोष्ट खरी कीं, श्रीमंतांचें अन्न फार दिवस भक्षिलें...... कठिण काळीं सोडिली तर आम्ही अन्न भक्षिल्याचें सार्थक करावें हेंच आम्हास व आमचे लौकिकास उचित." (खरे ६५). असा मोकळेपणानें लिहिणारा त्रिंबकराव वैयक्तिक विरोधाचा आसरा घेऊन 'दादासही सोडवत नाहीं व रावासही दूर करवत नाहीं' असें म्हणणाऱ्या सखारामबापूशीं कारभारीपणासाठीं दोन हात करण्यास सिद्ध झाला होता हें म्हणणें सयुक्तिक व रास्त दिसत नाहीं. या बाबतींत त्रिंबकरावाचा स्पष्टवक्तेपणाच त्याला बाधलेला दिसतो. बरें, एकदां राजकारणाच्या आखाड्यांत पडल्यावर केवळ वैयक्तिक कारणांकरितां सखारामबापूवर आग पाखडणारा त्रिंबकरावमामा नव्हता हें मामानें स्वतःच्या कृतीनेंच सिद्ध करून दाखविलें आहे; कारण बारभाईची स्थापना झाल्यावर बापूची पूर्ण व योग्य किंमत जाणणारा त्रिंबकराव नाना फडणिसास लिहितो. "सर्वांनीं एकावर भार द्यावा......राजश्री बापू सर्वांस वडील केलेला पुरुष त्याणीच आवघे डोईवर घेऊन करावे आम्ही तुम्ही सर्व त्यास आनकूल व्हावे दोहीकडील सरदारमंडळीस त्यानी ममता शासन भयपूर्वक वागवावे." (पे. द. भा ५-२३). राज्याचा आपत्काळ जाणून कोणता मनुष्य कोणत्या कामास योग्य हें ओळखून वागणारा त्रिंबकराव, बापूस सर्वाधिकार देण्यास तयार झाल्याबरोबर त्याची तळी उचलण्यास तयार व्हावयाचे व कारभारीपणाच्या वादगाचे वेळीं त्याच्या अंगचा हा गुण विसरून त्याला दूषण देऊन शाहण्यांच्या यादींतून त्याचें नांव काढून टाकण्यास सिद्ध व्हावयाचें, हें बुद्धीस पटण्यासारखें दिसत नाहीं. त्रिंबकरावाचे पाय कारभारीपणावरून खालीं ओढण्याच्या कारवाया कशा झाल्या व त्यानंतर त्याच्या अब्रूचे धिंडवडे कसे व कोणी उडविले या वादांत पडण्याचें हें स्थळ नव्हे.

कारभारीपणांतून मुक्त झाल्यावर त्रिंबकरावानें आपला बराच काळ अज्ञातवासांतच काढला. रघुनाथरावाबरोबर नाशिकास जाईपर्यंत त्याला राजकारणांत फारसें महत्त्व राहिलें नाहीं. परंतु नाशिकास असतां दादाच्या सांगण्यावरून पुरंदर—कोळी प्रकरणांत त्यानें बराच भाग घेतला. त्या प्रकरणावर नवा प्रकाश पाडणारीं दोन पत्रें या संग्रहांत (ले. २२ व २९) आहेत. त्यांच्या व इतर प्रकाशित साधनांच्या आधारें 'पुरंदर—कोळी प्रकरणावर नवा प्रकाश' (ऐ. सं. नि. खंड २, पानें १४–२८) या लेखांत आम्हीं सर्व प्रकारें उहापोह केलेला

आहे. तेव्हां त्याबद्दल येथें चर्वण करण्याचें कारण दिसत नाहीं. परंतु दादालाही त्रिंबकरावाची योग्यता समजून आल्याची साक्ष या संग्रहांतील कांहीं पत्रांतून (ले. २३, २४) आहे. एरवी "नाशिकास देवास जाल ते दिवशीं त्रिंबकरावमामा याचेही घरी जात जावे सर्वास राजी रक्षावे हेच थोरपण आहे" असा चिंतो विठलास त्यानें उपदेश केलाच नसता.

या संग्रहांतील अत्यंत महत्त्वाचा पत्रव्यवहार म्हणजे नारायणराव पेशव्याच्या खुनानंतर दादाविरुद्ध बारभाईंनीं जो बनाव घडवून आणला, त्यावेळीं त्रिंबकरावानें साबाजी भोसल्यास बारभाईंच्या बाजूस वळवून घेतलें त्याबद्दलचा होय. त्याकडे थोडें बारकाईनें पाहणें अप्रस्तुत होईलसें वाटत नाहीं. पेशव्याच्या खुनानंतर राघोबाची पेशवेपदावर स्थापना झाली व जुन्या मुत्सद्यांस हाताशीं धरून कारभाराचा गाडा सुरळीत चालावा अशी त्यानें व्यवस्था केली; परंतु कोणाचेंही लक्ष त्याच्याकडे लागेना. खुद्द बापूही 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' परंतु कारभार रगडणार नाहीं असें म्हणून दूर राहिला. कारभाराची कशीबशी सोय करून दादा निजामावर स्वारी करण्यास निघाला. बापू, त्रिंबकराव, नाना हरिपंत, मोरोबा वगैरे मंडळीस आपल्यामागें पुण्यास ठेवल्यास आपल्याला मोठा धोका निर्माण होईल अशी दादाला सार्थ भीति वाटल्यानें त्या सर्व आवळ्यांची त्यानें मोट बांधली व त्यांस आपल्याबरोबर लष्करांत चालविलें. ता. १० ऑक्टोबर, १७७३, रोजीं पुण्याहून निघून सुमारें चार–सहा दिवसांत त्यानें पेडगांव गांठलें. तेथेंच आनंदीबाईच्या सांगण्यावरून आणलेलीं पेशवेपदाचीं वस्त्रें दादानें स्वीकारलीं. त्याच वेळीं त्याच्या लष्करांतील आवळ्यांच्या मोटेंतील एकेक आवळा निसटून जात होता, त्याची त्याला जाणीवही नव्हती !

पेडगांवीं असतांच बापूच्या मनानें उलट खाल्ली. नारायणरावाच्या रक्षणाचें वचन देणारा बापू, त्याच्याविरुद्ध कट उभारण्यास सिद्ध झाला हें खरें असलें, तरी आपण केलें एक व झालें भलतेंच, या जाणिवेनें त्याचें मन त्याला खातच होतें. मनाच्या त्या बोचणीनें असो किंवा दादाचा त्याला अत्यंत तिटकारा उत्पन्न झाल्यामुळें असो, बापूनें पेडगांवीं लष्करी तळावर असतांच मामा, नाना, मोरोबा, हरिपंत वगैरे मंडळींशीं गुप्तपणें मसलती चालविल्या व त्या सर्वांस आपलें मनोगत पटवून देऊन त्यानें दादाविरुद्ध एक मोठा कट उभा केला. त्या सर्वांचीं मनें दादाविरुद्ध अगोदरच होतीं. त्यांतच सखारामबापूसारखा दादाच्या नाकांतील लाल त्यांस पुढारी लाभल्यावर त्यांनीं आणक्रिया केली व भावी धोरणाची दिशा ठरवून बारभाई कटाची मुहूर्तमेढ पेडगांवींच रोविण्यांत आली. लगेच बापू पुढील उद्योगास लागला व 'समाधान नाहीं' अशी बतावणी करून, दादास आनंदीबाई नको नको म्हणून सांगत असतांही, दादाची संमति घेऊन तो ता. २२ ऑक्टोबरला सासवडास जाण्याकरितां पेडगांवाहून निघाला व तेथें पोचल्या-

वर भावी कारस्थानाची उभारणी करण्यांत दंग होऊन राहिला. त्यानंतर नाना, मोरोबा, हरिपंत वगैरे मंडळी हळूहळू त्यांस येऊन मिळाली व अशा रीतीनें हे सर्व आवळे हळूहळू मोटेंतून निसटून त्यांनीं एक मोठी सामर्थ्यवान साखळी निर्माण केली.

मात्र त्रिंबकरावमामा या मंडळीबरोबर पुण्यास जाऊं शकला नाहीं हें एक प्रकारें सुदैवच होय; कारण दादानें मामाला दहा हजार सैन्य देऊन साबाजी भोसल्यावर रवाना केलें होतें. यामुळें मामाला आयतीच सैन्याची प्राप्ती होऊन बारभाईचें बळ वाढीस लागलें. साबाजी भोसले निजामास मिळून पेशव्यांच्या मुलुखांत पुंडाई करीत होता. त्याला वठणीवर आणण्याकरितांच दादानें ता. १ नोव्हेंबरला मामाची रवानगी केली होती. पडत्या फळाची आज्ञा घेऊन मामा दहा हजार सैन्यासह साबाजीस वठणीवर आणण्यासाठीं निघाला खरा, परंतु अंतर्यामीं त्यानें ठरविलें होतें कीं, साबाजीस बारभाईच्या बाजूस वळवून घ्याव-याचें. त्याप्रमाणें त्यानें आपल्या उद्योगास सुरवात केली. साबाजी जड बुडाचा असामी. त्रिंबकरावापेक्षां त्याच्याजवळ सैन्यबलही चांगलें. तेव्हां तो एकदम मामास बधेना. 'सेनासाहेब सुभा' हें पद देणार असाल तर बोला नाहीं तर 'जेथवर हात पोहोचेल तेथवर प्रजेस उपसर्ग देऊन पैका घेईन, कोणी आडवें आल्यास युध करून मरोन बरे म्हणवीन' (पे. द. ५, ५) अशीं प्रतिज्ञेचीं वाक्यें साबाजी उच्चारूं लागला. तेव्हां आपल्यापेक्षां त्याचें बळ जास्त आहे असें ओळखून त्रिंबकरावानें मोठ्या मुत्सद्देगिरीनें साम-दाम-दंड-भेद वगैरे उपायांनीं सन १७७३ च्या डिसेंबर महिन्याच्या २३ तारखेच्या सुमारास साबाजीस आपल्याकडे वळवून घेतलें (पेठे द. ले. ७५) व ही सर्व सेना रघुनाथरावाच्या दिशेनें चालूं लागली. सेनासाहेबसुभा पद न मिळाल्यास झुंजून मरून जाईन असें म्हणणारा साबाजी 'मसलत सेवटास जाई तो अक्षर बोलू नये पुढें आमचे विचारें होईल तसी सोय करून देऊं, परंतु दहा हजार फौजेचे सरदारींत उणें न व्हावें. मग कोणेविसी आग्रह नाहीं' (पे. द. ५, २४) असें सामोपचाराचें बोलणें बोलूं लागला. त्यावरून त्याला नरम आणण्याकरितां त्रिंबकरावानें कोणती जडी-बुटी वापरली कोणास कळे! साबाजीस अनुकूल करून घेणें हा त्रिंबकरावाचा मोठाच विजय होय यांत शंका नाहीं.

याच सुमारास अशी बातमी आली कीं ता. १६ जानेवारी, १७७४, रोजीं दर्याबाई (जानोजीची बायको) आपला दत्तक पुत्र रघोजी व आठ हजार फौज घेऊन दादाच्या छावणींतून, त्याच्या अनुमतीनें नागपुरास जाण्यास निघाली. (पे. द. ५, ६). दर्याबाई रघुनाथरावाच्या पक्षाची. सेनासाहेबसुभा या पदाबद्दल ती व साबाजी यांच्यामध्यें वादंग माजून त्या दोघांमध्यें

छत्तिसाचा आकडा पडलेला. अशा स्थितींत ‘ धरलें तर चावतें, सुटलें तर पळतें ’ अशी मामाच्या मनाची स्थिति झाली. त्यानें साबाजीस अनुकूल करून घेतल्यावर दर्याबाईसही बरोबर घ्यावी तर त्या दोघांचें जमावयाचें कसें ! बरें तिला न घ्यावी तर ती नागपुरास जाऊन तिकडे निराळेंच खूळ निर्माण केल्याखेरीज राहणार नाहीं अशी त्रिंबकरावाची पक्की खात्री होती. “ही वराडात गेल्यानें उपयोगी नाहीत फौजेचा भरणा आहे व इस्माइलखान तिकडेच आहे व दोन किले पहाडी मातबर त्याजवळ आहेत. इकडील मुख्यानी ( दादानी ) गटी संपादिली तरी तिकडे जाऊन बसावयास जागा आहे” ( पेठे द., ले. ९९ ) “इसमाइलखान तिकडेचआहे तोही यास सामील होईल तेव्हा मातबर खूल तिकडे जाहले पुढे थोरले येजमान कलकल पडे ते समई मुकारनामक व ते तिकडे गेल्यास आश्रय मातबर त्यास जाहला.” ( पेठे द., ले. ९८ ). हें सर्व आरशासारखें स्वच्छ दिसत असल्यानें मामानें त्रिंबकराव वर्तक यास दर्याबाईकडे पाठवून दिलें. त्यानें तिजकडे जाऊन बहुतप्रकारें बाईची खातरजमा करून तिला मामाच्या भेटीस आणिलें. तेव्हां मामानें तिला निक्षून सांगितलें कीं, “सात अक्षरे तुमची तुम्हाकडे कायम ठेवितो परंतु निखालसपणे सरल वर्तावे जर करिता काडीमात्र अंतर पडेल तर पारपत्य करूं ( मग ) आम्हाकडे दोष नाहीं. ( पेठे द., ले. ९७ ). तेव्हां दर्याबाईनें मामाच्या लष्करांत राहण्याचें कबूल केलें.

इतक्यांत बातमी कळली कीं पुण्याहून साबाजीच्या नांवें सेनासाहेबसुभा पदाचीं वस्त्रें व शिक्का कट्यार आली. ती बातमी दर्याबाईस समजतांच तिनें मामास आक्षेप करून त्याचा खुलासा विचारला. तेव्हां मामानें ममतापूर्वक तिचें समाधान करून कशीबशी तिची बोळवण केली व नाना बापूनीं साबाजीकडे पाठविलेलीं पत्रें, शिक्का व कट्यार आपल्या ताब्यांत घेऊन ठेवून दिली. ( पेठे द., ले. ९७ ). नाना-बापूनीं असा हा परस्पर व्यवहार व तोही त्रिंबकरावाच्या न कळत करावयास नको होता. मामा मुख्य सेनापति असल्यानें त्याच्या शिबिरांतील प्रत्येक व्यक्ति दुय्यम दर्जाचीच होय; अर्थात त्या व्यक्तीशीं सरकारचा होणारा सर्व व्यवहार मुख्य सेनापतीच्यामार्फत होणेंच रास्त. परंतु अशा तऱ्हेची शिस्त आमच्या मराठ्यांनीं राखली असती तर काय न होतें ! मग या नियमाला नाना-बापू तरी अपवाद काय म्हणून असावेत ! या बाबतींत आनंदराव रास्त्यानें बापूस विनवून लिहिलें होतें कीं, “इकडील कोण्हीयेक सरदारास वगैरे याउपरी लिहिणें ते परभारें न ल्याहावे. जे लिहिणे ते मामास लिहून पाठवावे. हे समजोन करणे तसे करतील बोलणे तसे बोलतील त्यामुळे याचे लगामी सर्व राहून जय बरा पडेल. ” ( पे. द. ५, ११ ). खुद्द मामांनीही ‘जे या उपर लिहिणे ते आम्हांसच लिहून सुचवावे देणे ते आमचे

हातून पावल्याने आला राहील. नाहींतर निरनिराळीं बंडें होतील, " असा स्पष्ट सल्ला दिला होता. (पे.द. ५, २५). परंतु सर्व पालथ्या घागरीवर पाणी ! आनंदराव व मामा यांच्या सल्ल्याप्रमाणें नाना-बापू वागते तर इतके दिवस दर्याबाई व साबाजी यांस एकत्र आणण्याचा खटाटोप मामानें केला त्यावर विरजण पडलें नसतें. अखेरीस मामानें त्या दोघांची समजूत कशीबशी काढून तो पुढें चालूं लागला. ( पेठे द. ९७, ९९ ).

याच वेळीं निजामालाही वश करून घेण्याचें बारभाईचे प्रयत्न चालू होते. त्रिंबकरावांनें ५ मार्च १७७४ रोजीं निजामाची स्वतः गांठ घेऊन त्याची बारभाईस अनुकूलता प्राप्त करून घेतली. ( राजवाडे १०,९८-१०० ). मात्र या कामीं त्रिंबकरावानें निजामाला दर कुचाला एक लक्ष रुपये व दर छावणीच्या दिवशीं पंचवीस हजार रुपये देण्याचें कबूल केलें होतें. अनायासें आलेला हा फायद्याचा व्यवहार डावलण्याइतका निजाम खात्रीनें मूर्ख नव्हता ! शिवाय आजूबाजूच्या प्रदेशावर हात मारून, लुटालूट करून, वर समाधानाची ढेकर देण्यास तो नेहमीं सिद्ध असे, हें निराळेंच ! आणि गंमत अशी की त्याला या कामीं साबाजीचेंही साह्य असे !

साबाजी, दर्याबाई व निजाम या आवळ्यांची एकत्र मोट बांधण्याचा त्रिंबकरावानें प्रयत्न केला खरा; परंतु साबाजीच्या अनुयायांनीं त्रिंबकरावावरच उलट दोषारोप करण्यास सुरवात केली. ठरलेली रक्कम मामा साबाजीस देत नाहीं, साबाजीस दूर ठेऊन त्रिंबकराव दर्याबाई व देवाजीपंत यांस जवळ करून त्यांचा सल्ला ऐकतो, निजामाशीं सल्लामसलत करण्याचे वेळीं साबाजीस मामा बोलावीत नाहीं व अशा रीतीनें त्याचा मुद्दाम अपमान केला जातो, दर्याबाई व साबाजी यांस सारखें वागविलें जात नाहीं व आपल्या रुक्ष भाषणानें मामा सर्व नासतात अशा प्रकारचे आरोप मामावर साबाजीच्या अनुयायांनीं करण्यास मुळींच कमी केलें नाहीं. ( राजवाडे १०; ९५, ९६, ९८, १०२, ११३, १०६ ). हे सर्व आरोप साबाजीच्या अनुमतीनें झाले असण्याचाही संभव आहे, परंतु त्यांत अर्थ मुळिंच नव्हता. साबाजी व दर्याबाई यांचें ठीक नव्हतें ही गोष्ट जगजाहीर असतांही त्यांस एकत्र आणून मामानें अत्यंत ममतेनें वागविलें. मामाचें भाषण रुक्ष व कडवट नव्हतें. तो स्पष्टवक्ता व शुद्ध अंतःकरणाचा असल्यानें त्याच्या भाषणास सत्याची जिल्हई दिलेली असे, तें ऐकणारास कटु वाटे इतकेंच. स्वतः मामाच पैशाच्या पेचांत होता, पुण्याहून त्याला पैसा वेळेवर मिळत नसे. अशा स्थितींत तो इतरांस पैसा कसा पुरविणार ? हें माहीत असूनही त्याच्याविरुद्ध तक्रार करणेंच अयोग्य होय. लष्कराचा कारभार एकमुखीच असला पाहिजे, त्यांत मानपान घेऊन भागणार नाहीं, हें साधें तत्त्वही

साबाजीच्या अनुयायांस न समजल्यानें त्यांनीं मामाविरुद्ध उगाच कोल्हे-कुई करण्यास सुरुवात केली. दादानें त्रिंबकरावाच्या फौजेंत फितूर आरंभिला होता व साबाजी, निजाम वगैरेंस मायावी पत्रें लिहून त्यांस फोड-ण्याचा प्रयत्न चालविला होता. अशा स्थितींत त्रिंबकरावानें तरी कोणावर विश्वास ठेवावयाचा व त्याला महत्त्वाच्या संभाषणाचे वेळीं हजर रहाण्यास सांगावयाचें ? निजामानें 'मौजे दिघी हा गांव लुटून उजाड केला मराठे व ब्राह्मण बाइकांची अब्रू घेतली'. ( राजवाडे १०, १०९ ). तेव्हां निजामास दुखवूं नये अशी साबाजीच्या अनुयायांनीं मामास सल्ला देण्याचा विचार केलेला दिसतो ! कारण तो प्रकार कळतांच मामानें निजामाच्या वकिलास बोलावून आणून "मामाने मन माने तैशी भाषणें केली व त्यास लष्करांतून काढोन दिल्हे" ( कित्ता ) अशी त्यांनीं मामाविरुद्ध तक्रार केली. मामानें असें करावयाचें नव्हतें तर काय त्याची उदोउदो करून 'केलेंत तें फारच चांगलें, असेंच करीत जा' असा उपदेश करून त्यांच्या पाठीवर प्रेमानें हात फिरवून त्यास शाबासकी द्यावयाची होती ? बायकांची अब्रू घेणा-रांसही मामांनीं असें वागवावयाचें नव्हतें तर काय 'मामांनीं असें करावयाचें नव्हतें' असें म्हणणाऱ्या शांतिब्रह्मांच्या सल्ल्याप्रमाणें वागावयाचें होतें ? असल्या प्रकारांनींही ज्यांस निजामाबद्दल तिटकारा व संताप येत नाहीं 'ते के न जानी-महे' याच सदरांत पडतात ? असें असूनही हेच लोक मामाला दूषणें देण्यास सिद्ध होतात हें आश्चर्य नव्हे काय ? तात्पर्य मामाची वागणूक योग्य अशीच होती.

बारभाईनीं चालविलेल्या उद्योगाची बातमी फेब्रुवारीपर्यंत दादाला जवळ-जवळ मुळींच नव्हती. त्या महिन्याच्या सुरवातीस त्याच्या सैन्यांतच फितूर होऊं लागला व पुण्याच्या भडक बातम्या कानीं येऊं लागल्यानें त्याचें मन बेचैन झालें. तेव्हां मुरारराव घोरपडे, हैदरअली वगैरेंची मदत मागण्यास त्यानें सुरवात केली. कृष्णा ओलांडण्याचें दोघांनींही नाकारलें. तेव्हां साबाजी, त्रिंबकरावमामा, निजाम वगैरेंची दादा मनधरणी करूं लागला. साबाजीनें कळविलें कीं, "मामासी भेटलो मामाचे कैदेत उपासी तापासी चार मास तप केलें कीं कोणेही प्रकारें ममतायुक्त पत्र यावें त्यास ती गोष्ट न जाह्ली येकनिष्टपणा योग्य नाहीं ऐसें आपलें चित्तांत आलें...पीडितास सर्व द्वारे मोकली." ( पेठे द. ले. १०८). या उत्तरानें साबाजीबद्दलची दादाची आशा फोल ठरली. त्रिंबकरावमामानेंही सडेतोडपणें त्याला कळविलें कीं, "आम्हीं आपले चाकर नाहींत इतके दिवस खावंद म्हणोन चाकरी एकनिष्ठ केली त्याचें बक्षीस आपण दिल्हे याउपर चाकरी करावयास अनुकूल पडत नाहीं आमच्या मनास येईल तैसे करूं". (पेठे द. ले. ९५ ). निजामानेंही दादास स्पष्टपणें कळविलें कीं, "श्रीमंतांनीं आम्हास सल्ला कोणता राखिला विनाकारण बिघाड करून मुलुख मारिला माधवराव

यांनीं आम्हांसी दाहा वर्षे स्नेह चालविला तैसें जालें नाहीं......जो ( आपले ) राज्य रक्षील त्याचें आम्ही शरीक आहों श्रीमंत ( दादासाहेब ) राज्य रक्षितील असें दिसत नाहीं भलतेच करितात कारभारी कोणी नाहीं आम्ही विश्वास कोणाचा धरावा व बुद्धीही शास्वत नाहीं घटकी येक घटकी येक ऐसे मनसबे करितात." (पेठे द., ले. ९६). निजामाच्या या उत्तरानें दादा सर्दच झाला असला पाहिजे. अशा रीतीनें सर्व बाजूंनीच नकार मिळत गेल्यानें दादा मनांतून कावून गेला असला पाहिजे. याच सुमारास भवानराव प्रतिनिधी, वामनराव पटवर्धन, धायगुडे, विनीवाले वगैरे प्रमुख सरदारांनीं त्याची छावणी सोडली व ते मार्च महिन्याच्या १५ तारखेच्या पुढें त्रिंबकरावाला येऊन मिळाले. या सर्व घडामोडीं-नंतर रघुनाथरावानें हैदराशीं अपमानकारक तह करून धीर न सोडतां पंढरपुराकडे कूच केलें. तें समजतांच त्रिंबकरावमामा आपली फौज घेऊन त्याच्या रोखानें निघाला.

दोन्ही सैन्यांचा तळ पंढरपुरानजीक कासेगांवाजवळ पडला. सैनिक बळ पाहतां मामांचें बळ जास्त होतें यांत शंका नाहीं. परंतु पैशाच्या आशेनें सावाजी व निजाम कूच करण्यांत दिरंगाई करीत. त्यामुळें मामाचा पूर्ण असा जथा कधींही एकत्र झाला नाहीं. मामा पुढें व साबाजी आणि निजाम मागें. अशा स्थितींत ता. २६ मार्च रोजीं मामाच्या हातांत दादाची एक चिठी येऊन थडकली. तिचें उत्तर लिहिण्याच्या तयारींत असतांच गैरसावध अशा मामाच्या सैन्यावर दादाची फौज तुटून पडली व हिरीरीनें लढून त्या सैन्यानें मामाच्या सैन्याचा पराभव करून, जखमी मामाला गिरफदार केलें. दादाचा हा विश्वास-घातकी हल्ला होत असतां साबाजी व निजाम ताबुताच्या उत्सवांत आपल्या सर्व सैन्यासह मजा मारीत होते ही गोष्ट लक्षांत घरण्यासारखी आहे ! ( पे. द. ३६, ४१ ). यावरून त्या दोघांच्या मनाचा ठाव घेण्यास चांगलेंच साधन उपलब्ध होतें. मात्र या विजयानें दादाचा फारसा फायदा झाला नाहीं. त्रिंबकराव कैद झाल्यानें त्याच्या सैन्याची वाताहात न होतां हरिपंत फडक्यानें पळपुट्यांना धीर देऊन त्यांना काबूंत आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या कामीं मामाच्या इतकें त्याला यश लाभलें नाहीं. ( खरे, १३५७ ). कासेगांवच्या लढाईच्या वेळीं मामानें उतावळी केली व लढाई अंगावर घेतली असा त्याच्यावर अनेकांनीं आरोप केला आहे; परंतु त्यांत फारसें तथ्य दिसत नाहीं. इतकेंच या ठिकाणीं नमूद करणें योग्य होय. दादाच्या कैदेंत असतांनाच जखमांमुळें मामा ता. २ एप्रिल १७७४ रोजीं मरण पावला. कैदेंत असतां दादा व आनंदीबाई यांनीं त्याचे फार हाल केले हें सत्य होय. ( पे. द. ३ पान ४५ ). आपण विश्वासघात केला असें मात्र दादाला कधींच वाटलें नाहीं. चोराला आपण

स्वतः चोर आहों असें कधीं वाटतें काय ! उलट दादा लिहितो, 'शत्रूंनीं शौर्य खूप दाखविलें तरी दुर्दैवानें त्याला जय मिळाला नाहीं; आणि थोड्याच वेळा-मध्यें तो नमकहराम ( मामा ) कैद झाला.' ( पेठे द. ले. ८३ ). म्हणजे दादाच्या मतें मामाच निमकहराम ठरला म्हणावयाचा ! उफराटा न्याय असतो तो हा असा !

मराठेशाहींतील प्रथम श्रेणीच्या सेनापतींमध्यें त्रिंबकरावमामाची गणना होणें अशक्य आहे. साहस, काटकपणा धीरगंभीर वृत्ति धारण करून स्वकर्तव्यच्युत न होतां आलेल्या संकटांशीं चिकाटीनें झगडण्यास लागणारा त्याचा उत्साही स्वभाव, सौशिक वृत्ति, कोणासही न दुखवितां त्याशीं मिळतें घेण्याची त्याची रीत वगैरे त्याच्या गुणांमुळेंच त्याला सेनापतीच्या कामांत यश मिळत गेलें. बेडरपणा, त्वरित हालचाली करून शत्रूस चकविण्यास लागणारी बुद्धि, तोडीस तोड काढून शत्रूस नामोहरम करण्याचें कौशल्य वगैरे सेनापतीच्या ठिकाणीं आवश्य असणारे गुण त्याच्या ठिकाणीं अभावानें तळपत होते. गुरुमकोंड्या-सारखा दुर्घट किल्ला त्यानें जिंकून घेतला व मोतीतलावाच्या लढाईत हैदरला त्यानें एका वस्त्रानिशीं पळवून लाविलें; त्यामुळें सेनापति म्हणून त्याची कीर्ति झाली. परंतु आपल्या हाताखालच्या लोकांत तो फारसा लोकप्रिय नसे. आपल्या लष्करांतील अठरापगड जातींच्या लोकांमध्यें एकसूत्रीपणा राखण्याचें कसब त्याच्याजवळ नव्हतें. त्याचा निर्भीड स्पष्टवक्तेपणा व प्रामाणिक निस्पृहपणा त्याला फार नडला. त्यामुळेंच त्याचें भाषण नेहमीं रुक्ष भासे. आपल्या सैन्याची शिस्त चांगली रहावी अशी त्याची धडपड होती. त्याच्या शिस्तीस कंटाळलेले लोक त्याला दूषणें देत यांत विशेषसें आश्चर्य नाहीं. कारण ज्यांस देश म्हणजे काय हेंच माहीत नाहीं त्यांच्याकडून त्रिंबकरावमामा देशभक्ति व देशप्रेम अपेक्षीत होता. 'मी, माझें व आपलें' हाच ज्यांचा नित्याचा व्यवहारमंत्र, लूट मारण्यासाठींच जे सैन्यांत दाखल होत, स्वार्थ साधण्यांतच जे पुरुषार्थ मानीत व हेवा-दावा-मत्सर ज्यांच्या हाडींमासीं खिळलेला होता, अशांना मामा शिस्तीचे व देशभक्तीचे धडे व एकीचे पाठ देऊन त्यांस देशाकरितां झगडण्यास सांगत होता ! व अशांना कामाला लावून तो देशहित साधणार होता ! ! केवळ अवि-चार होय हा ! यामुळेंच पेशव्याला सखाराम हरीस चापावें लागलें ( पे. द. ३७।२३० ), वामनराव पटवर्धनानें आज्ञा पाळीत नाहीं असें (खरे, १०९०) सांगितल्यानें त्रिंबकरावाला मूग गिळून बसावें लागलें, परशुरामभाऊ पटवर्धनास त्रिंबकरावाच्या खाजगी वर्तनावर तोंडसुख घेतां आलें ( खरे ११६६ ) व साबाजी भोसल्याचे लोक मामाचें उणेंदुणें काढून त्याला दोष देऊं शकले. ( राज. खंड १०. ६१-६५ ). अशा स्थितींत कोणताही सेनापति झाला तरी

तो काय करणार ? हें सर्व लोक मामाला जो थोडा मान देत तो मामा त्यांचा सेनापति होता म्हणून नव्हे, किंवा त्यांचें देशप्रेम ऊतास जात होतें म्हणून ते मामाच्याबरोबर छावणींत राहाण्यास तयार झाले होते असेंही नव्हे; तर आपण तसें केलें नाहीं तर पेशवा आपला सरंजाम जप्त करील ही त्यांस भीति होती म्हणून ! ( खरे, ११६५, ११६६ ). वरील प्रकारच्या लोकांनीं देशाभिमानानें प्रेरित होऊन काम केलें असतें व आपल्या शौर्याची, वीर्याची व अनुभवाची त्याला निःस्वार्थ बुद्धीनें जोड दिली असती तर मामाला सेनापति म्हणून जें थोडें फार यश लाभलें त्यापेक्षांही खात्रीनें जास्त लाभलें असतें. पण जरीतरीची ही भाषा सोडून दिली तरीहि बारभाई-प्रकरणीं त्यानें जो उत्साह दाखविला व आपली बाजू जड केली तें श्रेय हरिपंतालाहि साध्य झालें नाहीं, हें विसरून चालणार नाहीं. यावरून सेनानायकाला योग्य असे कांहीं गुण त्याच्याजवळ होते यांत शंका नाहीं.

प्रस्तुत संग्रहांतील कांहीं महत्त्वाच्या गोष्टींसंबंधीं आतांपर्यंत उहापोह केल्यावर दुसऱ्या कांहीं मुद्यांसंबंधीं थोडी चर्चा करणें जरूर आहे असें वाटतें. २३,२४, २५, २७, ३९ व ४१ हे लेखांक सन १७६४ मध्यें दादा नाशिकास असतांना त्याचे उद्योग कसे चालले होते या संबंधीं थोडी फार नवी माहिती देतात. मामा व नाना फडणिस यांस राजी राखण्यास दादा फार उत्सुक होता. तसें करण्यांतच 'तुमचे थोरपण आहे' असें दादा चिंतोपंतास लिहितो. यावरून त्याच्या मनाची स्थिति सहज कळून येण्यासारखी आहे. लेखांक २५ मधील माहिती नवीनशी वाटते. त्यावरून पत्रव्यवहाराचे बाबतींत पेशवे किती दक्षता घेत असत, याचें दिग्दर्शन होतें. पेशवे आपल्या पत्रावर दोन प्रकारच्या मोहोरा करीत असें दिसतें. मातबरास जीं पत्रें जात त्यावर चौकोनी मोहोर वापरण्यांत येई व खास मोहोर पेशवा स्वतः करीत असावा. फारशी पत्रव्यवहारासंबंधीं रघुनाथरावानें दिलेल्या सूचना विचार करण्यासारख्या आहेत. परदरबारीं भलतें सलतें लिहून गेल्यास अनर्थ होणें शक्य असतें; अर्थात तो टळावा म्हणून सर्व प्रकारची दक्षता व तीही एकानें नव्हे तर दोघाचौघांनीं—बाळगणें योग्य होतें. लेखांक ३९ ( अ ) वरून दादाला जंबुरे, तोफा व तोफांचे गोळे तयार करण्याची फारच उत्सुकता लागलेली दिसते. त्याकरितां स्वतंत्र कारखाना काढण्याची त्याची मनीषा स्पष्ट होते.

ले. ३५, ३६ व ४० वरून पेशवे व नागपूरकर भोसले यांच्या संबंधावर बराच नवा प्रकाश पडतो. ते दोघेही एकमेकांवर चढाई करण्यासाठीं काय काय युक्त्या प्रयुक्त्या लढवीत त्याचा थोडासा मासला येथें मिळतो. ले. ४९ व ५२ वरून त्यावेळीं ग्वालेरच्या दौलतीसंबंधीं जे घोटाळे उत्पन्न झाले होते,

त्यावर थोडा विदारक प्रकाश खात्रीनें पडतो. उत्तर—दक्षिण वादासंबंधीं साधकबाधक चर्चा करण्याचें हें ठिकाण नव्हे; परंतु लेखांक ८४ त्या वादांत महत्त्वाची भर घालील यांत शंका नाहीं. " वडिली हिंदुस्थानांत ज्या पक्षी जावे त्यांपक्षी दक्षिणेंत शत्रु कितेक आहेत त्यात कितेकास मैत्र करून घ्यावे कितेकाचे पारपत्य करावे आणि दक्षणेचा बंदोबस्त ठीक करून मला शत्रूचे भये नाही असे केल्यास वडिलासही हिंदुस्थानात क्षुधानिद्रा उत्तम लागून खातरजमेनें हिंदुस्थानचाही बंदोबस्त करील. " हा उतारा पुष्कळ बाबतींत सार्थ दिसतो. म्हणजे त्या काळींही दक्षिणेंत स्थिरस्थावरता स्थापन केल्यावरच उत्तरेकडे वळणें श्रेयस्कर होय असे वारे वाहत होते हें निश्चित होय.

लेखांक १२५ अत्यंत महत्त्वाचा आहे. बारभाईंची स्थापना झाली त्यावेळीं सर्वांकडून राजनिष्ठेच्या शपथा घेण्यांत आल्या व इतकेंच नव्हे तर त्या घटनेंत सामील होणारांचें कांहीं बरें-वाईट झाल्यास त्यांच्यामागें त्यांच्या कुटुंबांच्या योगक्षेमाची योग्य ती काळजी घेतली जाईल असेंही वचन दिलेलें असावें. लेखांक ११७ मध्यें हरिपंत फडके उघड उघड लिहितो कीं, ' मामानी चाकरी जिवाभ्य केली त्यासीं करारमदार केला होता तो पाठीमागें उभयता राहिले याणी निभवावा विसरू नये.' यावरून आमच्या विधानास पुष्टिच येते.

लेखांक ११३ वरून छत्रपतीच्या भेटीच्या वेळीं शिरस्ता कोणता असावा याबद्दल माहिती मिळते; परंतु ती निश्चित स्वरूपाची नाहीं. अमृतराव पेठे यानें तें पत्र नाना फडणिसास लिहिलेलें आहे. अमृतराव सन १७८६ च्या अखेरीस मृत्यु पावला. त्यामुळें हें पत्र त्या काळाच्या पूर्वीचें आहे यांत शंका नाहीं.

या भागांत पेशव्यांच्या रोजकीर्दीतील अनेक उतारे दिले आहेत. ते वाचल्यानें अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, लष्कराविषयक गोष्टींवर नवा प्रकाश व असलेल्या माहितींत नवी भर खात्रीनें पडेल. सन १७७०–१७७२ पर्यंत त्रिंबकरावमामा म्हैसूरच्या युद्धांत गुंतला असतां त्याचे मुक्काम कोठें कोठें पडले होते त्याची, साग्र नसली तरी, महत्त्वाची यादी या भागांत दिलेली आहे. तिचा उपयोगही झाल्याशिवायं राहणार नाहीं.

या भागांतील आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्रिंबकरावमामा याच्या जीवनाची शकावली होय. ती परिपूर्ण आहे असें म्हणवत नाहीं. तरीही सिद्ध ग्रंथांवरून त्याच्यासंबंधीं जी जी माहिती मिळते ती ती त्या शकावलींत आधारांसह देण्यांत आली आहे. सिद्ध ग्रथांतील चुकीच्या तारखांचाही या शकावलींत जरूर व योग्य तेथें दुरुस्त्यासह उल्लेख केलेला आहे. अभ्यासकांस या शकावलीचा बराच उपयोग व्हावा.

पेठे-दप्तराच्या प्रकाशनासंबंधीं ज्यांनीं ज्यांनीं आस्था दाखविली त्याच्या ऋणाचा पहिल्या भागाच्या निवेदनांत उल्लेख केलेलाच आहे. त्याचा येथें पुन्हां उल्लेख करून, पहिल्या भागाप्रमाणेंच हाही भाग भा. इ. सं. मंडळाच्या चिटणिसांनीं छापून उपकृत केल्याबद्दल त्यांचे पुन्हां एकदां आभार मानून पुरें करतों. इतिहाससंशोधक श्री. शंकरराव जोशी यांनीं सूची तयार करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

पुणें शहर,<br>
गुरुवार, ज्येष्ठ वा॥ ९, शके १८७२.<br>
दि. ८ जून, १९५०.

वि. सि. चितळे

# पेठे-दप्तर भाग २ रा

लेखांक ८८ (पेठे)

{शके १६५९
{सन १७३७

महजर सुरत मजलस ब्रहुजुर शरियेतपन्हा .........

(मुतस) दियान जमीदारान व हली मवाली दरकदार ...... पो (गुलशना) वाद सरकार संगमनेर सुभा खुज्यस्ते बुणियाद सु॥ छन हजार ११४७ कारणे महजर केला ऐसीजे येसाजी ब. गिरमाजी वा लखमाजी इ॥ कृष्णाजी व त्रिंबक ...... इ॥ राघोजी गवली नायेल मुंजरी को॥ मार येऊन हजर मजालसी जाहीर केले की आपले घर कसबे मारी खालील जमीन पहिल्या कोटाबाहेर सरस्वतीचे काटी ताडाचे नजीक आहे ऐसीयास आपल्यास लोकाचे कर्ज मबलग देणे जाहाले द्यावयासी काही येवज नाही आणि सबब मग जरूर जाणोन आपण गणेशपंत व बाळाजीपंत व॥ विसाजीपंत इ॥ कृष्णाजीपंत पेठे मोकदम साकीन कसबे गोहगर सुभे दाभोल हली वस्ती को॥ मार याजपासी जाऊन त्याचा मिनतमाना करून सहरहू आपले घराची जमीन आपण आपले खुशरजावंदीनें विकत दिधले घराचे जमिनीची किंमत मोकरा रुपये ४०१ च्यारशे येक जिन्नस चलण तमाम वजनेपुर रोख आपले पदरी घेऊन घराची जमीन मिरासी करून दिल्हे आहे त्याचे खरीदखत आलाहिदे करून दिल्हे आहे हली मशारनिले महजरास उमेदवार यास महजर सादर जाहला पाहिजे म्हणोन जाहीर किले त्यावरून हजर मजालसीजे बमोजीब खरीदखत व हाथे करार येसाजी व गिरमाजी व त्रिंबक गवली मार महजर केला येसीजे गणेशपंत व बाळाजीपंत पेठे येही येसाजी वगैर वारीसान याजपासोन घरजमीन खरीदखत केले आहे तेथे सुखे मणास मानेल तेसी नवी इमारत करून लेकराचे लेकरी नांदणे घराची हद महदूद पुर्वेस रस्ता राजमार्ग व पश्चमेस स्वरसतीचा नाळा व उतरेस केशो चिंतामण दिंडोरकर व दक्षनस अंताजीपंत सावरगावकर जमिनीची गज तजरीज लांबी पूर्वपश्चिम गज इमारतीसिवाय पायेदिवाल गज ४२ बेतालीस व रुंदी उत्तरदक्षणस गज इमारतीसिवाय पायेदिवाल गज १७॥ साडेसत्रा सहरहू हदेची...मबलग मजकूर येसाजी वगैरे वारीसान याणी रोख आपले पदरी घेऊन गणेशपंत व बाळाजीपंतास घरजमीन मिरासी करून दिल्हे येसे आगवाडीयाचा दरवाज्या पूर्वाभिमुख असे मोरीचे पाणी पूर्वेस रस्तास जाते

पिछवाडियाचा दरवाज्या व मोरीचे पाणी पश्चमेस सरस्वतीचे नाल्यात जाते या घराचे बाबे येसाजी वगैरे वारीसान माराचे भाऊबंद दायाज गोत्रज अगर हर कोणी उभ राहिला तर येसाजी व गिरमाजी व त्रिंबकजी गवली मजकुराने निवारने गणेशपंत व बाळाजीपंत यासी काही तालुका नाही हा महजर लि।। सही व ली ४१।। साडे येक तालीस.

नि।। नांगर
येसाजी गिरमाजी त्रिंबकजी

गोही

जगजीवन पवार वा।। मलोजी पवार
व ब्र......रंगो पाटील
को मार नि।। नांगर बि।। दादो
देवजी गुमास्ते मोकादम मार
निशाणी नांगर
संकराजी बांतूर साक्ष
गिरमाजी बांतर आपा केशो
चिंतामण बाबा रेघे

देवजी सिमल देशपांडे ......
केशो अनंत कुलकर्णी को मजकूर
साक्ष म......द भट धर्माधिकारी
कान्होजी चिमणाजी व दिनकर
महादेव कुलकर्णी कसबे मार
संकराजी नाईक रेघे साक्ष
भिमाजी नाईक बर्वे
सकोजी विश्वनाथ गुमस्ते का। मजकूर
राघो विठ्ठल सावरकर

---

**लेखांक ८९ ( पटवर्धन )**

शके १७६६ अश्विन शु ।। ७
सन १७४४ ऑक्टोबर १

श्रीमोरेश्वर प्रसन्न

श्रीमंत राजश्री **त्र्यंबक राऊजी सुभेदार** प्रांत खानदेश स्वामी गोसावी सेवेसी मोरो विनायक पटवर्धन नमस्कार विनंति उपरी सु।। खमस अर्बैन मया अलफ आपल्यापासून प्रा।। रावेर व तरफ बहादुरपुरा प्रां अमेर येथील बाबतीच्या जकाती बिलमक्ता बारमाही साल तमाम मोकरार रुपये २७०० सत्तावीसे पैकी वजा रसद रूपये १२५० साडेबाराशे बाकी रुपये १४५० साडे चवदाशे याचे आत्फा माघ अखेर रुपये ४०० चैत्र अखेर ५०० जेष्ठ अखेर ५५० साडे पांचसे सदरहू येणेंप्रमाणें रुपयाचा झाडा करून देऊं बी।। छ १९ रा। वल ता। छ १८ माहे मजकूर बारमाही आमल करून बहुत काय लिहिणे छ ५ रमजान

---

लेखांक ९० ( पेठे )

{ शके १६८० आश्विन वद्य १३
{ सन १७५८ ऑक्टोबर २९

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** पेठे स्वामीचे सेवेसी—

पोष्य समस्त भाऊबंद पेठे कृतानेक नमस्कार विनंती उपरी पूर्वापार पेठ्यांचे घरचे उपाध्ये ग्वाहागर खरे त्यास वाडवडिलापासून कुळपरपरेनें त्याच्या व आमच्या चालत होते कीं यज्यमान आपले घरीं कोणी येक जण खरा ठेवून सर्वदा उपाध्यपण त्यासच द्यावे अगर खऱ्यामधें चित्तास येईल तेव्हा येका दोघास दिले तरी त्याणीच घ्यावे दुसरे भाऊबंद खरे असतील त्यास वाटा मागावयास प्रयोजन नाहीं कार्य प्रयोज्यनीं सर्व खरे प्रसगी असतील त्याणी यज्यमानाचे घरी येऊन साहित्य करावे यज्यमानास अनुकूल पडेल त्याप्रो कोणास काही पावणे तरी पावावे ऐसे चालत असता बारा पंधरा वर्षांपूर्वी वेदमूर्ती रा **सिऊभट रामभट खरे** तुमचे घरी राहात होते सर्व कारभार येखतियारीनें तुमचे घरी करीत होते तेव्हा तुम्हास युक्तीनें च्यार परियाये समजावून आजपरियेंत उपाध्यपण वाटत नव्हते ते प्रसंगी खरे हजीर असतील त्याणी यथाविभागे वाटून घ्यावे म्हणून पत्र केले त्या पत्रावर तुमची संमत्त घेतली दूरवर विचार करून समजोनही गोष्ट तुम्ही न केली परंतु येका भावाने केलें ते सर्व आम्ही मान्य करुन दाहा पांच वर्षे. सर्वत्र चालले वाटे होऊ लागल्या नंतर येज्यमानाचे घरी कोणीच आस्तेने राहीनातसे जाहले नेहमी राहील त्यास व न राहील त्यास वाटा बरोबर यास्तव अनास्था जाहली संवटी यज्यमानांचे घरी कार्यप्रयोजनी न येता लूटमर्दाईने उपाध्यपण वाटून घेऊ लागले तेव्हा पेठ्यात व खऱ्यात परस्परे कलह होऊ लागले तुमचेच घरी ये गोष्टीचा कलह पुणीयात फार जाहला सिवभट खरे दुराग्रहास प्रवृत्त होऊन हटात्काराच्या गोष्टी सांगो लागले कीं यज्यमानाचे घरी न येता उपाध्यपण बळेच वाटून घेऊ त्यावरून कलह वृद्धि होऊन उपाधीक तुम्ही अमानत टेविले ते येक वर्ष अमानतच जाहाले त्याचप्रमाणें आम्हीही सर्वांनी उपाधीक अमानत ठेविले येंदा पुणीयात श्रीमंतांचे घरी श्रावणमासी दाक्षिणे-करितां कितेक खरे जमा जाहाले तेव्हा सर्वांस तुम्ही सांगितले कीं याज-उपरी उपाधीक अमानत ठेवीत नाहीं पूर्वीपासून तुमचे आमचे वडील चालत आले ज्यास यजमान देईल त्याणेच घ्यावे आपले भावाबंदास वाटून देऊ नये याजप्रमाणे मान्य करीत असाल तरी मान्य करणे नाहींतरी साफ उत्तर सांगणे आम्ही पूर्वापार चालत आल्यास मान्य असता तुम्ही हटनिग्रह

करून कलह वृध्दि कराल तरी आम्ही उपाध्यीकाची वृत्ती दुसरेयासी देऊ याप्रो। बोलणे जाल्यानंतर सर्व खरे सिवभट खरे यांचे घरी जाऊन बहूत प्रकारे सांगत होते उभय कुळी कलह उत्तम नाहीं दुराग्रह कराल तरी वृत्ती नाश होईल आणीकही दोघे चौघे सिवभट खरे याजकडे मिळाले होते त्यासही कितेक प्रकारे सांगितले परंतु न आईकत तेव्हा दाहावीस खरे एकत्र होऊन बोलिले कीं पूर्वापार उपाध्यीक यजमान ज्यास देईल त्याणेच घ्यावे या गोष्टीस सामान्य होऊन सर्वांनी मिळोन तुमच्या नावे व समस्त पेठे याचे नावे पत्र लिहून दिल्हे कीं तुमच्या चित्तास येईल त्यास येकास दोघास चित्तास येईल तितके दिवस घरी ठेवून यासच अगर चित्तास येईल तेव्हा खऱ्यामध्ये हर कोणास उपाध्यपण देणे वरकड खऱ्यास वाटा मागावयासी प्रयोजन नाहीं ऐसे राजी होऊन पत्र लिहून दिल्हे त्याउपरी तुम्ही येक दोघे खरे आपले घरी ठेवून उपाध्यीक देऊ लागलेत आम्ही सर्व भाऊ पुणीयास मिळालो असता सर्वांही तुम्ही केला विचार हा उत्तम म्हणून मान्य होऊन तुम्हास समतपत्र लिहून दिल्हे आम्ही व आमचे वेसीचे लिहिल्या अन्वयाप्रोणेच चालतील अद्यापि सिऊभट खरे वगैरे दोघे चौघे कलहाच्या गोष्टी सांगतात परंतु त्या आम्हास मान्य नाहींत या कलहामुळे बरी वाईट जसी ज्या समई प्रसंगोचित गोष्ट प्राप्त होईल व तुम्ही अवलंबाल त्याप्रों आम्ही सर्वही निभाऊ यात अंतर करील त्यास वडीलाची व गाईब्राह्मणाची शफत असे हे सत्य करून लिहीले असे शके १६८० बहुधान्य नाम संवत्सरे आस्विन कृष्ण त्रयोदशी रवीवार बीकलम कृष्णाजी बापूजी पेठे मोकद्म कसबे गोहागर समस्त भावा-बंदाच्या आज्ञेने लिहीले असे बीकलम ॐ

सह्या

१ गोपाळ लक्ष्मण पेठे लिहील्याप्राो मान्य असे
१ विठ्ठल त्रिंबक पेठे लिहील्याप्राो मान्य असे
१ गणेश हरी पेठये लिहील्याप्राो मान्य असे
१ बाबुराव बल्लाळ पेठे लिहील्याप्राो मान्य असे
१ राघो महादेव पेठे सदरहूप्रों मजकूरास मान्य असे
१ माधवराव बल्लाल पेठये सदरहूप्रो मजकूरास मान्य असे
१ गणेश राम पेठे मुकादम का॥ मजकूर लिहील्याप्रों मान्य असे

लेखांक ९१ ( वैद्य )  { शके १६८१ । सन १७५९ ।

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामाजीपंत** स्वामी गोसावी यासी पोष्ये **त्रिंबकराव विश्वनाथ** नमस्कार विनंती उपर येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असीले पाहिजे विशेष मौजे खोडद ता। तारगांव प्रांत कराहाड हा गाव राजश्री **विश्वनाथभट वैद्य** याजकडे दरोबस्त इनाम पेशर्जीपासून आहे राजश्री प्रतिनिधीच्या सनदा व श्रीमंतांची ताकीदपत्रे आहेत तर आपण तो गाव मारनिलेकडे रुजु होऊन चाले ते करावे बहुत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

———

लेखांक ९२ ( वैद्य )  { शके १७९५ फाल्गुन शु।।५ । सन १७७४ फेब्रुवारी १५
पा। फाल्गुन शु।। १२ अर्बा जिल्हेज

वडिलाचे शेवेसी साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता। फाल्गुन शु।। ५ मुकाम नजीक नांदेड लष्करांत वडिलांचे आसीर्वादे सुखरुप असो विशेष तोडीलीचे मुकामीहून आज्ञा घेऊन स्वार जाहलो तो सातवे दिवशी आंबेश्रीचे येथे आलो त्याज मुकामी नायकू भोई आम्हाजवळ येऊन पोहोचला पुढे यावे तरी लस्कर लांबले मार्गेही आडीचा याकरिता पुढे संभाजी जासूद पत्रे देऊन सेपन्नास स्वार न्यावयाकरितां रवाना केला तो मार्गी चालतो हेही कललीया भारी मजला करून काल चतुर्थी सनिध दोन कोशावर येऊन मुकाम केला राजेश्री सेनासाहेब सुभा याजकडे वर्तमान कललियानंतर राजेश्री **भवानी शिवराम** यासी रात्रौ पाठविले तैसेच घेऊन आले भेटी जाहाली तेथील पत्रे याद शब्दगौरव सकल ध्यानात आले फारच संतोष मानिला वारंवार आपले स्मरणे हर्ष उत्कर्शित आणि राजश्री **बापूही** व राजश्री **नानाही** मोठे अघटित प्रकार घडविले आमचे जागा ममता वसविली सर्व योग तुमचे सारांश आमचे आगमन पूर्वी दोन रोज नानाचे पत्र तात्याचे हस्ताक्षरी साकल्य अभिधानयुक्त आले त्यात आम्हावरही दाखला कितेक सांगितला सारांश सत्वर येऊन पंढरपुरचे सुमारे राजेश्री **मामासह** यावे हे तो उत्कंठितच होते दरमजला चालावेच त्यास मातोश्री **दर्याबाईचे** आगम (न) येथे जाहले त्याची तिढण पडली याजकडील भदे तिणे म्हटले ते मामानी मान्य करून आपणाजवळ आणिली सामोपचारे

कितेक समजाविले पुण्याकडील वृत कलाविले हजारी वगैरे त्याचे वऱ्हाडात पाचचार घुम करीत होते त्याचेही सांग निवृत्ती जाहाली हेही वर्तमान आल्यानें कांहीं मवलोन भेटावे येसे निश्चयात आणून परस्परे भेटी करविल्या यासी तेन समागमे चालावे हेही बोलण्यात आणिले मामा परिछिन्न यांच्याच पक्षी होऊन प्रसंगानुरूप मनोधारण रखून त्यास बरोबर न्यावी मोकली सोडलियास दहाबारा हजार आहेत वैदर्भात गेलियास यासी पायेबंद इकडेस पुष्टता यास्तव पानावर पान ठेऊन पुढे कार्यावर द्रिष्ट त्यासी दिवाकरपंत वृद्धाजवल आहेत त्याचा प्रकार सर्व वडिलांच्या ध्यानांत आहेच वर्तक मातोश्रीस आणावयासी गेले होते रामाजीपंत भाऊ त्याचे आसविशयी या संधानी कांहीं मोह आणि रा मामा संकटात पडिले यासी वचन तेथील तेथील सबल पक्ष त्यास याचेच त्यामुले एक दोन रोज दिरगत दिसते ऐसियासी तेथून मामास वारंवार पत्रे सत्वर आगमनाची येत जावी ऐसी तेविसी धातुपोषण मात्र त्याचे पत्री तूर्त क्षेप कांहींच नसावा सर्वास सेवा घडावी मनोदयानुरूप हेत पूर्ण होतील त्याचा मुजरा आहे सर्व साधन हेच त्रिवर्ग सामानसुद्धा जलद पोहोचावे येसे लिहीत असावे जातीची पत्रे प्रस्तुत दिली नाहींत कासीदा समागमे पाठविली आहेत येतील म्हणून सांगतो प्रसंग पाहून देऊ वाडिलास वर्तणुक अवगत आहे याकरिता लिहिले वरकड सर्व लक्ष अपणाकडेच आहे संशय नाहीं तेथे आपल्या विद्यमानाचे काम आहे ते दृढतरच असावे याची बलकटी असावी कारण तेथील जीर्ण हे जती सूत्र मिलालियास ग्रंथी आपल्याविना न पडे येसे घडावे तेथील संधान पकेपणी आपले हाती असो द्यावे म्हणजे चिंता नाहीं घरचा बंदोबस्त उत्तमरीतीचा करून आपण संनीधच असावे सर्व ईश्वर बरेच करील चिंता नाही येजमानाचे पत्राची उत्तरे शुतरस्वाराबरोबर पा॥ आहेत ही द्यावी राजश्री बाबूरावाचे पत्री येथें पत्रे येण्याविसी लि॥ आहे त्याप्रो व भकारनामकास ममतायुक्त पत्रे येणेप्रो त्वरीत पाठवावें मामाही या लक्षाशिवाय नाहीत परंतु मनात इतर भाव आणल्यास पत्रे सरदारास असावी अतःपर त्वराच येण्याची आहे येजमानाचा प्रकार येथ पावेतो आहे कीं उभयेता मातोश्रीचे पालखी समागमे यावे यापेक्षा विशेष काय सांगावे कराराची याद पाहिल्यानंतर म्हणू लागले कीं या यादीप्रो खर्चाचे आटोपणार नाही आम्ही उत्तर केले की पोट बांधून चार दिवस कालक्रमणा करावी त्याणी उत्तर केले की पोट बांधून मेहनत होणार नाही तथापि आपले तर्फेने करणे तितके करू पुढे त्यासच ममता येऊन पोटास देतील याची काळजी आम्ही करीत नाही यात लबाडिक किमपि नाहीं राजश्री सेनासाहेबसुभा यानी सांगितले की महमद इसफ गाडदी याची मुलें मनुशे रोज्यात आहेत तेथील बंदोबस्त उत्तमरीतीने करून देवगिरीस स्थापना करावी हा निरोप जरूर प्रविष्ट करणे म्हणून सांगीतले त्यावरून सेवेसी लिहिले आहे तर तेथील मुख्यास याप्रो

सांगावे खर्चाचे वगैरे सविस्तर सेवेसी लिहिले आहे. याप्रो त्यासही श्रुत करावे राजश्री बापूस पत्र येयून लिहिले नाही आपण तेथे लिहून घ्यावे सांडणीस्वारास येक दिवस गुंता तेथे पडू न द्यावा त्वरेने माघारा रवाना करावा सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना।

---

लेखांक ९३ ( वैद्य )
पो फाल्गुन शु॥ ११

{ शके १६९५ फाल्गुन शु॥ ५
{ सन १७७४ फेब्रुवारी १५

राजश्री **बाबुराव विश्वनाथ** गोसावी यासी

छ अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री स्नेहांकित **साबाजी भोसले** सेनासाहेब सुभा दंडवत विशेष उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष तुम्हाकडून राजश्री **कृष्णराव नारायेण** आले याच्या मुखोद्गत व राजश्री **सखारामबापू** व राजश्री **बालाजीपंत नाना** व राजश्री **हरिपंत** याच्या पत्रावरून सकलार्थ कलले उभयेता मातुश्रीसमेत किले पुरंधरावर गेलो तुम्ही पत्र पावताच पंढरपूरच्या सुमारे येणे त्यास या उपरी कांहीं गुंता नाही राजश्री **त्रिंबकराव मामा** सुद्धा उदईक कुच करून येत आसो मातुश्री दर्याबाई चिरंजीवसुद्धा फौज घेऊन वराडात जात होती हेही नीट नव्हते तो प्रकार देवाने नीट घडविला वरकड राजश्री तात्यांच्या पत्रावरून कलेल बहुत काय लिहिणे हे विनंति मोर्तबसुद

( पत्राच्या मागे अष्टकोनी शिक्का )

---

लेखांक ९४ ( वैद्य )
पो फाल्गुन शु॥ १२ अर्वा जिल्हेज

{ शके १६९५ फाल्गुन शु॥ ६
{ सन १७७४ फेब्रुवारी १६

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीचे सेवेसी विनंति सेवक **लक्ष्मण बल्लाल** साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ ४ जिल्हेज मुकाम लष्कर नजीक नांदेड स्वामींचे कृपे करून वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीकडून राजश्री **कृष्णराव तात्या** पत्रे घेऊन आले ते काल पोहचले सविस्तर निवेदन केले व ( पत्रे ) दाखविली त्यावरून श्रीमंत राजश्री सेनासाहेब सुभा बहुत संतोषी जाहले

भगवंताजवळ इच्छित होते तो दिवस प्राप्त जाहाला आपणाजवळ येऊन पोहचावे हे उत्कंठा लागली आहे मातुश्री दर्याबाई यांचा पायबंद होता तोही ईश्वरकृपेने निवारण तुर्त जाहला या उपरी काही गुंता राहिला नाही पत्रामागेच येऊन पोहोचतात यास कायावाचामनसा देव तर मातुश्री बाईसाहेब उभयेता आहेत आणखी विचार पहिल्यापासून जाणत नाही सर्वप्रकारे लक्ष आपले ठाई आहे प्रथम दिवसीचे भाशण सेवटपर्येत पोहचून कैलासवासी रावसाहेब यांच्या रिणापासून मुक्त व्हावे चाकरी करून आपणास दाखवावी आपण पहिल्यापासून ममता करितात त्याचे सार्थक व्हावे हाच मनोमानसी भाव आहे दुसरा निज-ध्यास नाही उदईक कुच करून राजश्री **मामासमागमेच** येता गुंता किमपि याचे तेर्फेने नाही मामानी जलदी करावी लांब लांब मजली कराव्या ऐसे स्वामीकडून घडले पाहिजे उदयीक कुच करून मजल दर मजल येतात राजश्री **वामनराव** याजकडे पत्रें पाठविली जे येऊन पोहचलो येसे समजावे येसी वरचेवर आणखीही लिहवितो सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति

---

**लेखांक ९५** ( पेशवा दफ्तर ) { शके १६९६ फाल्गुन शु॥६
पौ. छ ११ जिल्हेज फाल्गुन मास. { सन १७७४ फेब्रुवारी १६

सेवेसी **नारो आनंदराव केसकर** साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ ४ जिल्हेज मु॥ नांदेड आंत...जाणोन येथास्थित असे विशेष स्वामींची आज्ञा येऊन स्वार जालो ते बारावे दिवसी नांदेडावर राजश्री **मामाची** भेट घेतली बीड प्रांत व मनरथ इकडील गांव लष्करच्या लुटालुटीने मार्ग सुरक्षित नाहीं वसती कोठे राहिली नाहीं समागमे समाज थोडका याजकरितां दोन मजली चाकव्या गंगाउत्तरतीरान जाऊन पोहोचलो आपली पत्र दिल्हीं आज्ञेप्रमाण सविस्तर वर्तमान सांगितले राजश्री मामांची मर्जी उत्तम आहे उमेद चांगली संशय काडीमात्र नाहीं अगोदर सरकारचा खिदमतगार येऊन पावला होता जाबसाल देऊन रवाना केले त्याजवरून अर्थ सर्व ध्यानांत आला असल श्रीमंत राजश्री **दादासाहेबी** मामास पत्र सवेशेय पडून राग भरूनच लिहिले होतें त्याचे उत्तर मामानी साफच लेहून पाठविले आम्ही आपले चाकर नाहींत इतके दिवस खावंद म्हणोन चाकरी एकनिष्ठ केली त्याचे बक्षीस आपण दिल्हे याउपरी चाकरी करावयासी अनुकूल पडत नाहीं आमच्या मनास येईल तैसे करूं **साबाजी भोसले** व **दर्याबाई** सर्व आम्ही येक असो आपली आज्ञा मानीत नाहीं स्पष्टच उत्तर पाठविले येथेही मातबर सरदार राजश्री **सिता-**

**जीपंतबापू** त्रिंबकराव नानाचे पुत्र **बलवंतराव धोंडदेव** हुजरात पागा पथक-झाडून **नारो शंकर** याचा चिरजीव **रघुनाथपंतराव** चांगोजी कदम आदी-करून सर्व सहवर्तमान कर्तव्य ते सांगून गंगोदक घेतले साबाजी भोसले व दर्याबाई या उभयताची भेट युक्तीने काही जबरदस्तीने करून लौकरच डेरियासी नेऊन समाधान करून समागम उभयेता घेतली सांप्रत्ये मामानी कारस्तानी बहुत केली मसलतीस उपयोग तितकी साधन केली असत सविस्तर वर्तमान भेटी अन्ती निवेदन करीन आज छ मजकूर आंठा कोशाचा कूच करून उभयेता भोसले व आपण येस गेले उदगीरपासी घाट चढून आंबा जोगाइचे सरकार तालुका चुकाऊन आलंद गुंजोटी उजवी घेऊन सोलापुरावरून श्रीपंढर-पुरच्या रोखे दरमजल येतात याज उपरी गुंता राहिला नाहीं म्यां आज्ञेप्रमाणे येथे ज्ञान सुसल तितक बोलून मर्जी उत्तम राखली कितेक पुढे करण्याचे भाव व तरतूद करावयाची येविषयींची पत्र मजपासी दिल्ही आहेत जबानी बहुत करून आहे दर्शनाअंती निवेदन करीन मी आज्ञा घेऊन माघारा तेरा कोश आज मजल नेमिली असे शंभरस्वारास समागमे आहेत नव येथे ठेऊन राजश्री मामास निवेदन करून समागम आणिले सत्वरच येऊन दाखल होतो सरदार मातबर व लहाण मोठे पागा आदीकरून सर्वास या कामाची उमेद असे साबाजी तरी आपल्या ममतेचे गुंता नाहीं दर्याबाई परभारा जात होती साबाजीबाबा वगैरे त्याजकडील सरदारीयाची मुलमाणसे नागपूर प्रांती याजमुळें गडबड झाली होती परंतु मामानी दर्याबाईस आणून येथे गोविले युक्तीनें आणून जबरदस्तीने भेटी करून समागमे घेतली सेनासाहेब सुभा याचा कारभार मामानी करावा जुने कारभारी जामीन घेऊन ठेवावे त्यानी कारभारात मन न घालावे येसे केले त्याच्या फौजेचा बंदोबस्त दर कुचात करणार आहेत हाल्ला करून बाईस व **रघूजीबावास** आणितात येक दोन कार्याची वचने दिल्ही आहेत बिना त्याज-पासून येक दोन अंतर मातबर वाटल्याखेरीज पारपत्य करतां येत नाहीं आज-पासून पंधरा रोजानी भीमातीरास येतात दोन रात्री येक दिवस नेहमी मामानी मजला आपल्यापासी बसवून घेतले होते बोलण बहुत जाले दिकत काही राहिली नाहीं आपणास येक वेल लष्करांत यावें लागेल श्रीपंढरपूरच्या सुमार मामा येतात कर्नाटकातील फौज त्या सुमारा आणवावी कृष्णा विज्यापूर या सुमार तिकडून इकडून फौज येकत्र व्हावी ईश्वर मसलत सिधीस नेतो ही खातरजमा जाहाली ज्यासी बोलावे तो आनकूल होतो प्रातिकूल कोण्ही नाही बहुत काये ल्याहावे कृपा छत्र असो द्यावे हे विज्ञापना

———

लेखांक ९६ ( पेशवा दफ्तर )

शके १६९५ फाल्गुन शु॥ १
सन १७७४ फेब्रुवारी १९

पौ छ १५ जिल्हेज

श्रीमंत राजश्री राव स्वामीचे सेवेसी विनंती श्रीमंत माघारे फिरोन बल्ला-रीवर आले पुणियाकडील गडबड ऐकोन दरकुच पुणियाकडे जावे ऐसा इरादा होता त्यास आपाजीराम हैदर नाईकाकडून सिरियास आले त्याने सांगोन पाठविले की पुढे न जावे कित्येक बोलावयाचे आहे व खंडणीचा पैकाही आणला आहे त्यावरून श्रीमंतानी मुक्काम केला श्रीमंताकडून पत्रे धोंडोराम यास आली त्यात मजकूर नबाबाचा बेदरावर स्नेह जाला तो कायेम असावा पुणियाकडील फितुरास नबाबानी व रुकनुद्दौलानी मिलो नये त्यांनी आशा दाखविल्यास येकों नये नबाबाची आशा कांही असल्यास इकडोन काय घडने ते घडेल तुम्ही सेवक येकनिष्ट आहा या समयात चाकरीचा मुजरा करोन दाखवणे म्हणून श्रीमंतानी मारनिलेस पत्रे लिहिली व आबाजी महादेवही श्रीमंतानी रवाना केले आहेत येतील नबाबास व रुकनुद्दौलास श्रीमंतानी पत्रे याज अनवये दिली जे लिहिले होते ते आम्ही व धोंडोपंत उभयेता मिलोन नबाबाकडे व रुकनुद्दौलास श्रीमंताचे आशेप्रमाणे व पत्रातील भाव सर्व समजाविले नबाबानी सर्व येकोन उत्तर केले की श्रीमंतानी अम्हास सला कोणता राखिला विनाकारण बिघाड करून मुलुख मारिला बेदरावर सलोखा जाल्यावर तमाम पंच महाल व कलबर्गा वगैरे मुलुख मारून ताराज केला बीडपाथरी वगैरे मुलुक साबाजी भोसले व त्रिंबकराव यांनी लुटिला मुधोजी भोसल्यानें पाइनगाव लुटून वैराण केले ऐसा सलोका राखिला पूर्वीचा श्रेह माधवराव यानी आम्हासी दाद्दा वर्षे येक समत स्नेह चालविला तैसे जाले नाही असो जे जाले ते उत्तमच जाले आम्हास कुम ( क ) करावयास कैसी सोय पडेल सरदार लोक बेदील त्याचा मुलूक लुटिला आम्हात कांही हाल राहिला नाही तुमचे घरचे तुम्ही संभाळून घ्यावे आम्ही त्याची व तुमची कुमक करीत नाही असेही करीता कुमक केली तरी साबाजी व त्रिंबकराव येकत्र होऊन मुलुक मारतील जालतील यास्तव कुमक होत नाही श्रीमंतानी लिहिले होते की रुकनुद्दौलास अथवा तहवरजंग यास फौजसुद्धां कुमकेस पाठवावे हे नबाबानी येकोन उदास-वचने बोल(ले) आणि उत्तर केले कीं तुम्ही आपले राज्य रक्षावयाचे कारण जो राज्य रक्षील त्याचे आम्ही शरीक आहो श्रीमंत राज्य रक्षितील येसे दिसत नाही भलतेच करितात कारभारी कोणी नाही आम्ही विश्वास कोणाचा धरावा व बुद्धीही शास्वत नाहीं घटकी येक घटकी येक ऐसे मनसबे करितात तेव्हा प्रमाण आम्हास कसे पडेल ऐसे कितेक प्रकारे उदास भाषणे केले त्याचा विस्तार

कोठवर त्याहावे ऐसे बोलोन त्याचे पत्राची उत्तरे लिहिली कीं तुर्त त्रिंबकराव साबाजी भोसले हे मुलुख लुटितात त्याची तंबी अगर दबऊन बाहेर काढून द्यावयास तुलजापुरचे सुमारे जातो त्यास तंबी करून पुढे तुम्ही ही येतच आहा जसा मनसबा घडल तसे करून आम्ही स्नेहास आंतर करणार नाहीं येसी पत्रे लेहून सुतरस्वाराची रवानगी छ ३ जिल्हेजी केली येकोन नबाबाचे चित्तांत श्रीमंतांची कुमक करावयाचे नाहीं धातुपोषण मात्र लिहितात येसे दिसते होता काय होईल पाहावे राजश्री **मुरारराव घोरपडे** याचेही गळा पडले आहेत त्याचे बोलणें आहे कीं कृष्णा उतरून येणे होत नाहीं लष्करात फितुर झाला आहे वामनराव भवानराव (व)गैरे फितुरात आहेत ऐसेही येथे वर्तमान ऐकवो आज छ ७ जिल्हेजी नबाब कूच करून भीमेचे पाणी धरून कलबुर्गे उजवे टाकून आलंद गुजोटीवरून आवसेवर वाल्हेचे सुमारे कांहीं तुलजापूर त्रिंबकरावमामा व साबाजी भोसल्याचे तोंडावर जावे ऐसेही आहे मोगल लोक मजला कलो देत नाहींत परंतु येसे करणार आज कूच साता कोसाचे जाले दरकूच जाणार कळावे हे विनंती

---

लेखांक ९७ (वैद्य)
पा० फाल्गुन वा॥ ३ मंगळवार

{शके १६९५ फाल्गुन शु॥ ९, मंदवासर
{सन १७७४ फेब्रुवारी १९

श्री

* अपत्ये तात्याने चरणावरि मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ फाल्गुन शु॥ ९ मंदवासर मु॥ का॥ वरवल पा॥ मजकूर येथे वडिलाचे आसीर्वादे सुखरूप असो विशेष राजश्री **त्रिंकबराव मामा** व राजश्री **साबाजी भोसले** सेनासाहेब सुभा व मातुश्री **दर्याबाई** फौज सहवर्तमान कुच करून खंदारानजीक मुकाम जाहला ते दिवसी मजल भारी जाहली रान दगडी तोफखाना व बाजार आला नाहीं याजकरिता मुकाम जाहला काल भृगुवारी कुच करून मुकाम मजकुरी आले हेही मजल भारीच जाहली रान दगडी तोफखाना मागे राहिला याजकरिता आज मुकाम जाहला उदईक कुच होऊन उदगिरीच्या घाटे तुळजापुरच्या रोखे येत आहेत मातुश्री आठहजार फौजेनसी समागमे आहेत हे उपयोगी आहे नाही हे समजले आहे परंतु उपाय काये मामानी त्यास ममतेत गोविले आहे शाठ(त) अक्षरे तुमची तुम्हाकडे कायम ठेवितो म्हणोन भाषण केले आहे परंतु

* कृष्णराव नारायण जोशी याचे आपल्या वडिलास पत्र

निखालसपणे सरल वर्तावे जर करिता काडीमात्र अंतर पडले तर पारपत्य करू आम्हाकडे दोष नाही येसे भाषणात आहे त्यास तेही सरलपणच तूर्त दाखवीत आहेत मामा आंतराची संद पाहत आहेत यासीही भाशण ममतेचेच करीत आहेत याजकडे यादी कराराची व पत्रे सेनासाहेब सुभा म्हणोन आली हे वर्तमान मातुश्रीस कलले तेव्हा मामासी आक्षेप केला जे हे काये तेव्हा मामानी समाधान केले की माझे ठायी तुमचा विश्वास आहे तेव्हा चिंता काये यादी व पत्रे आपणाजवल घेऊन ठेवितो त्यावरून येथील कारभारीयास व आम्हास बोलावून नेले ममतेच्या गोष्टी सांगितल्या जे फंद नसावा याजकरिता इतका कारभार करीतो त्यास हे तुमचे उपयोगी आहे की नाही माझा मरंवसा आहे की नाही त्यास मी सांगतो त्याप्रो वर्तणूक व्हावी त्यास आम्हास म्हणो लागले की पत्रे व यादी नानासाहेबास[1] दाखविली की नाही आम्ही उत्तर केले कीं दाखविली न दाखविली दोन्ही सारखीच आपले हाते दाखविल्याने उत्तम आम्हास उभयेतांची[2] आज्ञा आहे कीं यादी दाखवून आपणाजवल ठेवावी तूर्त खातरजमा जाहली पाहिजे याजकरिता यादी घेऊन जाणे त्यावरून मामानी उत्तर केले की त्याची यादी व पत्रे त्याजवळ द्यावी आम्ही उत्तर केले कीं आपली आज्ञा होईल तर देऊ द्यावी म्हणोन सांगितले येथील कारभारीयासी बोलिले कीं ज्यापक्षी आमचा विश्वास तुम्हांस आहे त्यापक्षी आम्ही सांगतो हें आईकावे कागद पत्र व यादी आम्हाजवल द्या आम्ही तिचे समाधान करू कीं यादी व पत्रे आम्ही आपल्याजवल घेतली तूर्त तुम्ही सेनासाहेबसुभा हे लिहू नये व सिके कटारही मागितल्यास द्यावी येसे भाषण केले याणी उत्तर केले की आम्ही आज्ञेखेरीज नाही परंतु यजमानास हे विषम वाटेल यादी व पत्रे मागितल्यास देतील चिंता नाहीं खातरजमा आहे परंतु सिके कटार देणार नाहींत येसे वर्तमान आहे कुल फंद जतीचे आहेत मामाच्या ममतेत सिरले आहेत मातुश्रीच्या पक्षी तर सर्वात्मता आहेत येथेही समजले आहे परंतु तूर्त उपाय काये राजश्री मामानी देवाजीपंतास आजम जाबीत जंग धौशे याजकडे पाठविले आहे काल गेले आहेत त्यास आणावे या आन्वयी गेले आहेत सारांश तेथील साधन करणे ते पके राखावे वरकड वर्तमान आलाहिदा पत्री लिहिले आहे त्यावरून कलो येईल **देवाजीपंतास** श्रीमंत दादासो यांची पत्रे आली आहेत की पूर्वीपासून मोठमोठ्या मसलती करीत आला व आपल्या उपयोगी पडत गेला तुम्ही जेथे आहा तेथे दुसरा विचार होणार नाही ही खातरजमाच आहे ऐसी ममता पुरस्कर पत्रे आली आहेत त्यावरून दकारनामक[3] याचे लक्ष

---

(१) साबाजी भोसले यास (२) नाना फडणिस व सखारामबापू यांची
(३) देवाजीपंत चोरघोडे याचे

तिकडेही आहेसे दिसते मामा व दकारनामक ममतेत आहेत सारांश लिखितार्थ पुर्ता मनन करून तिकडील बंदोबस्त करून पत्रांची रवानगी त्वरित व्हावी येणे-करून हे सत्वर येऊन पोहोचतील राजश्री **आनंदराव** दादाची भेट आमची जाहाली त्याचा प्रकार निखालस आहे आपलेच लक्षी येथील सर्व प्रकार फंदाचे त्यास उमजले आहेत तेही विचारांतच आहेत परंतु तिकडील उत्तराची प्रतीक्षा आहे येसीयास ज्यास पत्रे ममतेची ल्याहावयाची असतील त्यास ल्याहावी कार्य पडालियास देऊ नाहीतर आपली आपणाजवल ठेऊन सत्वर आली पाहि-जेत अतःपर गुंता मामाकडे आहे याजकडे किमपि नाही हे येण्याचे उत्कंठित बहुतच आहेत तेथून आज्ञा आलीया मातुश्रीची उत्तमरीतीने सेवा करून निघोन येऊ ऐसीही उमेद आहे लिाप्राो उत्तर सत्वर पाो बहुत काय लिहिणे हे विज्ञापना

---

**लेखांक ९८ (वैद्य)**
पाो फाल्गुन वाा ३ मंगळवार

शके १६९५ फाल्गुन शुाा ९ मंदवार
सन १७७४ फेब्रुवारी १९

श्री

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री **बाबूरावजी** स्वामीचे सेवेसी सेवक **कृष्णराव नारायण** कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा फाल्गुन शुाा ९ मंदवार मुाा नजीक काा वरवल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष इकडील वर्तमान तरी येथे येऊन पोहोचल्यानंतर नांदेडान-जीक मुकाम होता तेथून कूच बारातेरा कोशांचे जाहाले ते दिवशी सांडणीस्वार पत्रे देऊन आपणाकडे रवाना केला तो पोहोचलाच असेल त्या अलीकडील वर्तमान तेथून दोन मजली करून मुाा मजकुरी आलो आज येथे मुकाम जाहला कारण की तोफखाना वगैरे बाजार राजश्री मामाचे लस्कराचा व यांचा मागे राहिला कालची मजल बहुत लांब जाहली याजकरिता आजचा मुकाम जाहला उदईक कूचच आहे राजश्री मामा दर्याबाईस समागमे घेऊन येत आहेत त्याज-कडील भाषणात काय आहे की मी सांगेन त्याप्राो वर्तणूक करावी लागेल त्यांत अंतर पडेल तर परिछिन्न पारपत्य केले जाईल त्यानीही ते मान्य करून बरोबर आहेत एक मुदा मात्र त्यानी घातला आहे आपले चिरंजिवास सेनासाहेबसुभा दिल्हा आहे तो कायम असावा यानीही मान्य केले आहे याची आवंघ त्याज-पासोन अंतर पडावयाची मार्गप्रतीक्षा आहे **दर्याबाईस** बरोबर घेतल्याने वरा-डांतील खूल मोडले नाही तर फौज वराडप्रांते गेल्यास किले दोन जबरदस्त

आहेत व इस्माइलखान तिकडेच आहे तोही यास सामील होईल तेव्हा मातबर खूल तिकडे जाहले पुढे थोरले यजमानास[1] कलवल पडे ते समई मुकारनामक व ते तिकडे गेल्यास आश्रय मातबर त्यास जाहला याजकरिता इतके आर्थ समजोन राजश्री मामानी बरोबर घेतली आहेत अतःपर मामास पत्रे तेथून यावी की दर्याबाईस युक्ति प्रयुक्तीने फौज त्याची हलकी करून त्वरित येऊन पोहोचावे म्हणजे ते राजश्री सेनासाहेबसुभा येसे मजल दर मजल येतात अतःपर याजकडे गुंता किमपि नाही खर्चास याजला पाहिजे याचे तेथून लिहिले आहे की च्यारशे राऊन पा। द्यावे म्हणून लि॥ त्यास येक दोन रोजी राऊतांची रवानगी करून देतां वरकड वर्तमान तीर्थरूपाचे पत्री लि॥ आहे त्यावरून कलेल बहुत काय लिहिणे लोभ करीत जावा हे विनंती

---

**लेखांक ९९ ( वैद्य )**
पो फाल्गुन व॥ ३ मंगळवार

शके १६९५ फाल्गुन शु॥ ९ मंदवासर
सन १७७४ फेब्रुवारी १९

श्री

श्रीयासह चिरंजीव राजश्री बापूरावजी यासी प्रति लक्ष्मण बलाल आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता। फाल्गुन शु॥ ९ मंदवासर मुकाम नजीक का॥ वरवल जाणोन स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष नांदेडनजीक गंगातीराहून बुधवारी कुच होऊन खंदारानजीक मुक्काम जाहला दुसरे दिवसी कुच व्हावे तरी मजल लांब जाहली दगडी रान तोफखाना आला नाही याजकारिता गुरुवारी मुकाम जाहला काल शुक्रवारी कुच होऊन येथे आले हेही मजल चौदा पंधरा कोशांची जाहली दरमियान फौजेच्या मुकामास पाणी नव्हते याजकारिता लांब मजल करणे प्राप्त जाहले तोफखाना काल आला नाही याजकारिता आजचा मुकाम जाहला उदईक कुच करून तुलजापुरचे रोखे येत आहेत मातुश्री दर्याबाई आठहजार फौजेनसी मामानी समागमे घेतले आहे कारण जे ही वराडात गेल्यानें उपयोगी नाहीत फौजेचा भरणा आहे व इस्माइलखान तिकडे आहे व दोन किले पहाडी मातबर त्याजवल आहेत इकडील मुख्यानी गद्दी ( गर्दी ? ) संपादली तरी तिकडे जाऊन वसावयास जागा आहे आणि फौजही आहे आणखी मेलविल्यास मिलेल याअर्थी त्याचे समाधान करून समागमे घेतले आहे त्यानी सात[2] आक्षरे चिरंजिवांची कायेम

---

१ मुधोजी भोसले

२ 'सेनासाहेब सुभा' या पदवीची सात अक्षरे होतात, तेव्हां ती पदवी असा भावार्थ.

ठेवावी येविसी वचन घेतले आहे मामानी सवड ठेऊन वचन दिल्हे आहे परंतु त्यास ये गोष्टीचा संतोष काये त्यानी न थावे तरी उपाय नाही याजकरिता येणे प्रास परतु आपल्या काबूवर आहेत याजकरिता उपयोगी नाहीत समई घालावितील त्यास मामास पत्रे आली पाहिजेत की त्याचे फौजेत फंद होऊन फुटोन आपणाकडे येत ते करावे आल्यास समाधान करून बोली करून ठेवावे येक दोन पथके आली म्हणजे सर्व फौज फुटेल मग असल्यास चिंता नाही प्रस्तुत भरणा भारी आहे हे उपयोगी नाहीं **मामाही** त्याच साधनात आहेत व **रास्तेही** त्याच साधनात आहेत कोणेही प्रकारे फौज फोडून आपणाकडे आणावी सेनाधुरंधर यांचा पक्ष सर्वात्मना देवाजीपंतास आहे हे मामासही समजले असेल व यास तर पुर्तेपणी समजले परंतु मामानी **देवाजीपंतास** ममतेत घेतले आहे यामुले उपाय नाहीं यास म्हणतात की तिकडून पत्रे सेनासाहेबसुभा व यादी कराराची आली आहे ती आम्हाजवल यावी व सिकेकटार मागतील त्यास द्यावी कुल मुलुखाचा कागदपत्र आम्हास समजवावा येसे म्हणतात त्यास कागदपत्र व यादी घेतल्यास चिंता नाहीं याची खातरजमा आहे परंतु सिकेकटार मागीतल्यास देणार नाहीत येसे वर्तमान आहे राजश्री देवाजीपंत यास आजम जाबीतजंग घोंशे याजकडे मामानी पाठविले आहे त्यास आणावे याजकरिता गेले आहेत यास खर्चाची निकड आहे त्यास तिकडून येजमानाची पत्रे आली होती की राऊत पाठविणे म्हणजे येवज पाठवितो त्यास एका दो रोजा राऊत पाठवितील ऐवजाची रवानगी करून द्यावी थोरले फौजेचे वर्तमान काही कलत नाहीं त्यास ल्याहावे येण्याविसी सेनासाहेबसुभा याजकडुन विलंब किमपि नाही याचे लक्ष सर्व तिकडे लागले आहे मामास मात्र वरचेवर पत्र येत असावे म्हणजे जलदीने येऊन पोहचतील वरकड वर्तमान राजश्री तात्याच्या पत्रावरून कलेल बहुत काय लिहिणे सातारियास फौज तिकडून आली म्हणोन आइकिले त्यास वर्तमान ल्याहावे सिंदे होळकर कोंण ठिकाणी आले थोरले फौजेत हे वर्तमान कलल्यानंतर हिकडील पक्षात जे होते त्यानी विचार काय केला मुख्याजवल फौज किती राहिली हे सविस्तर वृत ल्याहावे वरकड अधिकोत्तर वर्तमान असेल ते ल्याहावे वाईस कोणी जाईल तरी आमची पोशाखाची सनगे आणवून ठेवावी राऊत येतील तेव्हा पाठवून द्यावी येणेप्रा तुंबा[1] येक जिगे[2] दोन सेला एक पागोटे येक येणेप्रा पाठवून द्यावी उष्ण काल विशेष याजकरिता आबतागिऱ्या नवा मिळेल तर ठेऊन आमचे आसगीर पाठवून द्यावे लोभ करावा हे आशीर्वाद

---

१ तुमान, विजार २ अंगरखा

लेखांक १०० ( वैद्य ) { शके १६९५ फाल्गुन शु॥ १०
पौ फाल्गुन व॥ ३ मंगळवार सन १७७४ फेब्रुवारी २०

मु॥ पुरंधर

* राजश्री नानाजी कृष्ण व राजश्री **बाबूराव विश्वनाथ** गोसावी यासी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजश्री स्नेहांकित **साबाजी भोसले** सेनासाहिब सुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष राजश्री कृष्णराव आपणापासोन आले ते फाल्गुन शु॥ ४ इंदुवारी नांदेड संनिध गंगातीरी पोहोचले राजश्री **सखारामपंतबापु** व राजश्री **बाळाजीपंत नाना** व राजश्री **हरिपंत** याच्या पत्रावरून व मारनिल्हेच्या मुखोद्गत सविस्तर कळले त्याची प्रत्युतरे सांडणिस्वाराबरोबर पाठविली आहेत त्याजवरून कळले असेल त्यास पंढरपूरच्या सुमारे यावे यैसे लेखनात आले त्याजवरून दोन मजली तीस कोस हेडगुल पो उदगीर येथे आलो उदईक छ ९ जिल्हेज इंदुवारी दाहा कोसाची मजल नेमिली आहे दरमजल येत असो राजश्री **त्रिंबकरावमामा** व आम्ही येक विचारे असो अलीकडे कासीद व सांडणीस्वाराबा दोनतीन पत्रे राजश्री नानाची आली ते प्रविष्ट जाहाली राजश्री **वामनराव गोविंद** याची कुमक व्हावी यैसा मजकूर लेखनात होता त्यास पंढरपुरच्या रोखे जात असो त्याजकडेस पत्र पा। आहेत बातमीस जासूद गेले आहेत तांत्राकडून पत्रे व राजश्री **ज्ञानराव गिरधर** आले त्याचेही मानस पहिले होतेच हाली तिकडून सूत्र लागले खूण पुरली येथूनही सत्वर भेटी व्हाव्या येविसी लि॥ आहे जाबीतजंग धौसे याची पत्रे आली होती येदंनिमित्ये राजश्री दिवाकर पुरुषोत्तम यासी पाठविले आहे की त्यास घेऊन येणे मातुश्री **दर्याबाई** फौजसुद्धां समागमे आहे राजश्री मामा त्याच्या तोडजोडात आहेत संशये आहे परंतु तोडजोड रसायणात नीट उतरावा म्हणून नीटच आहे सांप्रत जो प्रकार मामानी गाठणीस आणिला त्या प्रकारी आम्हाकडे लोकास वगैरे विलक्षण पडोन तीढण फारच बसते त्यास मसलतीवर मदार जे घडता घडेल ते घडो मामाची मर्जी बहाल ठेवणे जरूर त्यात जो थाट मामा करितात तो प्रकार आमचा आब लौकिकी राहात नाही भ्रम जातो आणि खर्चाचीहि निकड अतीशय लोकांचा गवगवा आहे सविस्तर तात्याच्या पत्रावरून कळो येईल रा॥ छ९ माहे जिल्हेज बहुत काय लिहिणे हे विनंती ( मोर्तबसुद ) ( पत्राच्या मागे शिक्का )

---

* पत्राच्या सुरुवातीस डाव्या बाजूस 'श्रीशाहू राजपदांभोज भ्रमराइत चेतसः बाबात्मजस्य मुद्रेशा विराजिते' असा अष्टकोनी शिक्का आहे.

**लेखांक १०१** (पेशवा दफ्तर) { शके १६९५ फाल्गुन शु ॥ ११
सन १७७४ फेब्रुवारी २२ }

विनंती उपरी श्रीमंतांची पत्रे सांडणीस्वारासमागमे छ १० जिल्हेजी मुकाम माके(ले) प्रांत रायेदुर्ग हाळग्रीवा नदी येथील आली **रुकनुद्दौलास** व **घोंडोराम** यास होती त्यातील मजकूर की नबाबानी भीमेवरून कूच करून जाऊ नये आम्ही लवकर येऊन पोहोचतो **साबाजी भोसले** व मामा यानी तुमचे प्रांताची खराबी केली त्याचे पारपत्य तुम्ही आम्ही मिलोन करू पुणियाकडील फितुरियाचे पारपत्य केले जाईल तुमचा आमचा अेहदबंद (भेद) रावर जाला तो पका जाला त्यात अंतर येऊ नये येसे कित्येक प्रकारचे भाव व खातरजमा व काही आशाही दाखवून लिहिले आम्ही लवकर येतो तुमचे आमचे विचारे सला-मसलत केली जाईल नबाबाचा नफाही होईल ऐसे रुकनुदौलासही लिहिले त्याच अनवये पंत मारानिलेस लिहिले होते ते पत्रे मी व पंत मारानिले रुकनुद्दौलाकडे घेऊन गेलो पत्राचे भाव व पत्राचे बोलणे सर्व समजोन त्यांनी उत्तर लिहिले त्यात मजकूर साबाजी भोसले व **त्रिंबकराव** यानी लुटालूट करीत नांदेड सर-कारात गेले जाफ्रीतजंग वगैरे सरदार यानी नबाबास सांगोन पाठविले व येथे सरदार आहेत यानीही अड घातली तेव्हा त्यास दबवून अथवा तंबी करून प्रांतांतून काढून देऊ आपला आमचा दुसरा विचार नाहीं ऐसे शिष्टाचाराचे उत्तर व आपली सर्व प्रकारे खराबी केली हे भाव लेहून उदयीक सांडणी-स्वाराची रवानगी होईल रुकनुद्दौलाचे चित्तात भोसले व मामाची भेट अथवा समीपता होये तो पावेतो त्यास मनसबा कलो नये हे आहे परंतु त्याला गोष्ट लपतील येसे नाहीं **हैवतराव** मिलयाचे बातमी रुकनुदौलास आली त्यात मज-कूर होता पुणियाकडील गडबड ऐकिली यावर त्यानी मनसबा केला येक विचार केला कीं लवकर माघारे फिरून नबाबाची गाठ कोणतेही प्रकारे साम अथवा (दाम) दंड येऊन घालावी हा मनसबा **करीतच आहे** तो **अपाजीराम** आले तेव्हा दुसरा मनसबा केला हैदर नाइकासी सलूक करावा त्याची कुमक व काही पैका द्यावा या अनवये आपाजीराम यासी बोलले त्याचा निश्चये ठरता ठरला वीस लक्ष रुपये करार द्यावे श्रीमंतानी त्याचा मुलुख गुरामकोंडा मदगिरी चेन-रायदुर्ग वगैरे सोडावा कुमकही करावी त्याचा तपसील निमे रुपये दुर्ग द्यावे व निमे वाटणी दाखल जाल्यावर द्यावे ह्या बोलण्यास त्यास मेलवून घेणियाविसी दोनचार मुकाम केले **मुरारराव घोरपड्याचे**ही गला पडले कीं तुम्ही कुम-केस चाला त्यानी साफ उत्तर केले कीं आमचा पहिलाच करार आहे कृष्णा उतरो नये याप्रो बोलणे जाले **रामचंद्र गणेश सखाराम** हरि दाहा हजार फौज

रास्ते वगैरे यांचे प्रांताची जप्ती करावयास पुणियाकडील बंदोबस्त रवाना करावे हा निश्चये केला तयारी जाली तो मागती मना करविले नबाबाकडे कारमारास प्रथ(म) आबाजी महादेव नीमिले मागती मना केले रामचंद्र गणेश सिध केले काये चितात आहे हे न कळे त्यास राहून भिकनखान व राजाराम गोविंद हे सिध केले रवाना करणार येसे आहे सांडणीस्वार याचे जबानी आहे कीं दोन रोज आमचे पुढे भिकनखान व राजाराम गोविंद निघाले जासूद चौकडा आला त्याचे जबानी आबाजी महादेवच येणे हैबतरायाचे पत्री समस्तच यावे आणि नबाबाची घरोब्याची गोष्ट बोलने साधावे येसा येथील मजकूर जाला आहे येक्या दिवसात चार मनसबे ठरतात सेवटी सिद्धांत येकही नाहीं येथे लोक मनास येईल ते बोलतात कीं श्रीमंतांचे लष्करात फितुर जाला आहे चामनर व वगैरे लोक बेदील आहेत हे वर्तमान परस्पर आपणासही कलतच असल नबाब दाहा दाहा कोसाचे कुच करीत नलदुर्ग आवसे तुलजापुरच्या सुमारे येतात मध्ये राहात नाहींत येथेही कितेक आतून बाहेरून लोक तिकडील इकडील बोलण्यांत आहेत परंतु नबाब रुकनुदौला आपल्यासिवाय नाहींत येकवचनी कायेम मिजाज आहेत पुढे ईश्वरी सत्ता प्रमाण हे विज्ञापना

---

लेखांक १०२ (पेशवा दप्तर)
पो छ १६ जिल्हेज

शके १६९५ फाल्गुन शु. १३
सन १७७४ फेब्रुवारी २४

श्री

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी सेवक धोंडो गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता छ १२ जिल्हेज भृगुवारपावेतो मुा किले सोमपूर वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री बालाजी शंकर आपणा-कडे पाठविले होते ते आले त्याणी आज्ञेप्रा सविस्तर सांगितले त्याप्रा वर्तणुक करीत आहो नरसिंगराव कृष्ण व चिमणाजी निलकंठ पेसजी या मार्गे कार्यास गेले होते त्याची पत्रे आली ती शेवेसी पाठविली आहेत पावतील राजश्री मामा व साबाजी भोसले बसमत नांदेडच्या सुमारे गंगातीरी आहेत दोन च्यार दिवसात तुळजापुरच्या रोखे फौजसुद्धा येणार असे वर्तमान आहे नबाब निजामअली फौजसुद्धा कलबुर्ग्यास आले आहेत दोनचार दिवसात नल-दुर्गाजवळ येऊन तेथें दहा पाच मुकाम करणार तेव्हां येथे सावध राहिले पाहिजे या अर्थे आम्ही किले मजकुरी दोनसे प्यादे नवे करार करून ठेविले

प्याद्याविसी दोनतीन वेळा लिहिले हे चगढण दिसते परंतु सरदेचा किंवा प्रांत काटक ऐते वेलेस माणूस मिलणार नाहीं समये कोणी वेलेस कसा येईल हे न कले याजकरितां वरवर विनंती लिहितो शंभर प्यादे नवे ठेविले महिना दोन महिने ठेवून पुढे दुर करावयासी येतील नबाब तुलजापुरचे सुमारे येऊन राहणार न कले कालदेश जाणून शंभर माणूस ठेविले आहे आपण धणी आहेत आपले आज्ञेखेरीज वर्तणूक नाही सिबंदी यास बहुत पाहिजे परंतु सामराज्यांत थोडी असल्यास चिंता नाहीं हाली भरणा पाहिजे नाहीं तरी या स्थलाचा आब्र राहणार नाहीं सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

———

**लेखांक १०३** ( पेशवा दप्तर ) { शके १६९५ फाल्गुन शु॥ १५ सन १७७४ फेब्रुवारी २६

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी विा सेवक **जिवाजी रघुनाथ** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती ता। छ १४ जिल्हेज पर्यंत वर्तमान येथास्थित असे स्वामीनी राजश्री **चिमणाजी निलकंठ** व **नरसिंगराव कृष्ण** या बरोबर वस्त व चिठी पाठविली ते नबाब रुकनुदौला यास देऊन उत्तर पाठविले आहे पावेल इकडील कोणेविसी दिकत राहिली नाही छ मजकुरी नबा(बा) कडे बातमी राजश्री **त्रिंबकराव मामा** व **साबाजी भोसले** यांची आली कीं मातीगडी वजरातीर येथून तीस कोस दास त्यास अंतर येसे असे आज मुकाम होलीकरिता सर्वत्र सावकार व म्हराटे यानी करविला कुच जाल्यावर समीपता होईल बहुत काय लिहिणे कृपा लोभ निरंतर असो दीजे हे विज्ञापना

———

**लेखांक १०४** ( पेशवा दप्तर ) { शके १६९५ फाल्गुन वा॥ १ सन १७७४ फेब्रुवारी २७
पौ छ १६ जिल्हेज अर्बा

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनंती सेवक **रघुनाथ सदाशिव** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। फाल्गुन वा॥ द्वितीया रविवार* तिसरा प्रहर पावे येथास्थित असे विशेष **हरिभक्ति सावकार** याचे दुकानी लष्कराची पत्रे बलारी येथील मुकामाची आली त्यात मजकूर येणे प्रो

* मोडक जंत्रींत फाल्गुन व ॥ १ स रविवार येतो.

१ पत्र तेथून रवाना फाल्गुन शु॥ ५ बुधवार त्यात मजकूर लि॥ आहे कीं **हैदरखानाकडून आपाजीराम** वकील आला आहे त्याचे बोलणे श्रीमंतासी लागले आहे की २५ लाख रुपये देतो आणि १ मदगिरी २ चंद्रायदुर्ग ३ हसकोटा हे तीन किल्ले आम्हास द्यावे सदरहू किल्ले द्यावे म्हणजे २५ लाख रुपये देतो याप्रो॥ अपाजीराम श्रीमंतासी गिजगड करीत होते शेवटी तहात गोष्ट ठरली श्रीमंतानी तीन किल्ले देऊन २५ लाख रुपये द्यावे याप्रो॥ करार होऊन गोष्ट निश्चयात आली हैदरनाईकाकडील फौज वगैरे कोणी मदतीस यावे हे वर्तमान काही लिहिले नाही सदरहू पत्राो॥ शष्टींचें पत्र आले त्यात हाच मजकूर लि॥ आहे.

१ पत्र तेथून रवाना फाल्गुन शु॥ ७ शुक्रवार प्रातःकाल त्यात मजकूर लि॥ आहे की राजश्री **रामचंद्र गणेश व मानाजी फाकडे** याजसमागमे दहा-बारा हजार फौज देऊन पुढें रवाना केले ते तुंगभद्रा उतरोन अलीकडे आले दर मजल इकडे येणार व श्रीमंताची इकडे यावयाची निकड आहे पंधरा दिवसांत खासा स्वारी इकडे यावीसे आहे परंतु अद्याप तुंगभद्रा उतरले नाहीं लष्करात फितूर जाला आहे श्रीमंताचे कह्यात फौज नाहीं खर्चाची वोढी फार आहे सावकार सर्व लष्करांत आहेत ते राजेश्री वामनराव याजकडे जाणार सावकारास रुपये मागितले परंतु कोणी दिल्हे नाहींत याप्रो॥ येथील वर्तमान आहे तुंगभद्रा सत्वरच उतरणार उतरलियावर विशेष वर्तमान लिहून पाठवावे याप्रो॥ पत्रात लिहिले आहे

सदरहू दोन पत्रे मारनिले याची मंदवारी सायंकाली काल आली ती पहावयासी आणिली होतीं त्यात मजकूर याप्रो॥ लि॥ आहे परंतु रामचंद्र गणेश याजसमागमे फौज देऊन पुढे रवाना केले हे गोष्टीचा संदेहच वाटतो परंतु पत्रात लिहिले आहे ते कचे वर्तमान सेवेसी लि॥ आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

———

**लेखांक १०५ ( वैद्य )** 	{ शके १६९५ फाल्गुन व॥ २ सोमवार
पो॥ छ२२ जिल्हेज 	{ सन १७७४ फेब्रुवारी २८

श्री

* आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता॥ फाल्गुन व॥ २ इंदुवासर मु॥ मौजे वांदुलवाडी पा॥ सोलापूर वर्तमान येथास्थित असे विशेष कालचा मुकाम तुलजापुरनजीक होता आज येथें यावयाचा करार नव्हता मुसी प्रा॥ नलदुर्ग येथील मुकाम नेमिला होता तेथे मामा गेले याचा मुकाम देवीदर्शनाचे गडबडीमुले चुकोन येथे आला त्यास यास पाच कोशाचे अंतर पडले उदईक येकत्र होतील कलबर्गेयास आविंध बाराबे तारखेस दाखल होणार म्हणोन पत्रे व कारकून गेला होता तो आला व थोरली फौज त्यासुमारे येते याजकरितां **मामा** जलदी करून आविंधास मेलऊन पुढें होणार याजकारितां कलबुर्गेयाचे रोखे जात आहेत हिकडील बोलणे आमचे होते मामानी घ्यावे ते घेत नाईत परस्परे बोलताव याजकारितां तिकडून प्रेश ममतायुक्त होईल तर उत्तम श्रीमंत राजश्री **नानाचे** पत्र आम्हास अद्यापि आलेच नाही तस्मात त्यास आमचे विस्मरण पडिले येसे दिसते तेथील बंदोबस्त करून घ्यावयाविसी पेसजी लिहिले आहे तो अर्थ ध्यानात असेलच त्याप्रा॥ जाहलियास उत्तम नाहीतर ठीक पडत नाही येथील प्रकार काबूवर सर्व आहे विस्तारे काय लिहावे मसलतीविसी याजकडून किमपि संदेह नाही सर्वात्मना जीवप्राणे हजर आहेत समई कामही सर्वापेक्षा अधिकोत्तर करितील लोकही मातबर मातबर समयोचित जमा जाहले आहेत पदही भारी बालगितात **दर्याबाई** फौजेसह समागमे मामानी घेतली आहे हे उपयोगी नाही याचा बंदोबस्त होईल तर उत्तम परंतु आम्ही लिहिले ऐसे मामास न कलावे सविस्तर अर्थ मागाहून तपशीलवार लिहून पाठवू व संकालित राजश्री तात्यांच्या पत्री लिहिले आहेत त्यावरून कलेल बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीर्वाद

---

**लेखांक १०६ ( वैद्य )** 	{ शके १६९५ फाल्गुन व॥२ सोमवार
पो॥ छ २२ जिल्हेज 	{ सन १७७४ फेब्रुवारी २८

श्रीशंकर

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री **बाबुरावजी स्वामीचे** सेवेसी पोष्य **कृष्णराव नारायेण** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥

---

* कृष्णराव नारायण जोशी यांचें वडिलांस पत्र

फाल्गुन वद्य २ इंदुवार मौजे नजीक तांदुलवाडी पा किले सोलापूर जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असीले पाहिजे विशेष सांप्रत आपणाकडून पत्र आले नाही त्यास शुध येकादसची पत्रे तीर्थरूपांची आली त्यावरून सविस्तर कलले आपण मुंजीस गेले होते तिकडील आर्थ तपसिले लिा पाहिजे आम्हाकडील मजकूर तर मंदवारचा मुकाम तुलजापुरानजीक दोन कोशावर होता काल रविवारी येथे आले आज कुच होऊन पुरापुरचा सुमारे जात आहेत राजश्री मामाच्या व याच्या लष्करास काल च्यारपाच कोशाचे अंतर पडले कारणी देवदर्शनामुलें रवा[1] दोन तीन पडल्या त्याच रवेने याची बिनीवाले निघोन इकडे आले मामाचा मुकाम काल मुसी प्रांत नलदुर्ग येथे जाहाला आज येकत्र होतील वरकड मजकूर संकलित तीर्थरूपाचे पत्री लिा आहे याजवरून कलेल मागाहून सरकारची व आमची पत्रे तपसिलवार येतील त्यावरून कलेल येथील लक्ष पकेच आहे तेथील संधान पके असावे मातुश्री दर्याबाई समागमे आहेत यांचा बंदोबस्त जे रीतीने निघेल तसा करावा येथे खर्चाची निकड फारच आहे त्यास येवजाची व काही कापड पनासपर्यंत सोये करून ठेवावी हे वारंवार सांगता याजकरिता सिद्धता लिा प्रमाणे करून ठेविली पाहिजे खर्चाची बहुत निकड त्यास प्रस्तुत येक जरूर दिल्हा पाहिजे त्यापैकी पंचविसाचे कापड बाकी रोख येणप्रो दिल्हे पाहिजे वरकड मागाहून तावार लिहून पाठवितो बहूत काय लिहिणे लोभ करीत जावे हे विनंती

येवजाचे चिठ्याचा मजकूर तीर्थरूपाच्या पत्री लिा आहे त्यावरून कलेल आपले तेनातीचे वगैरे ठराऊन यादी याची करून घेतो कलावे सेवेसी गणेश नारायण साष्टांग नमस्कार विनंती सर्वेयावर कृपा करीत गेले पाहिजे हे विनंती

---

**लेखांक १०७ (वैद्य)**
पा छ. २२ जिल्हेज आर्बा श्री

शके १६९५ फाल्गुन वा २ सोमवार
सन १७७४ फेब्रुवारी २८

अपत्ये तात्याने चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता फाल्गुन वद्य २ इंदुवासर मुा तांदुलवाडी पा सोलापूर वर्तमान येथास्थित असे विशेष एकादशीचे पत्र सांडणीस्वाराबरोबर पाठविले ते काल तुलजापूरनजीकचे मुकामी पावली सविस्तर कलले येणेयाची त्वरा करावी पंढरपुरचे सुमारे आल्यानंतर आपण लष्करात येऊन पोहचतो म्हणून लिहिले त्यास त्वरेविसी आम्हां-

१ वाटा, चाली, रस्ता,

कडील ग्रहस्ताची उत्कंठाच होती परंतु दयाबाईस मामानी भेटीस आणिले त्यास जाऊ देणे ही सला उत्तम नाही समागमे घेता निशा न पडे याजकरिता त्याचा बंदोबस्त करावया निमित्य दिसगत लागली मामानी तिचे व प्रथक प्रथक सरदाराची इमाने प्रमाणे करून घेतली आणि समागमे घेतले आहे सात आठ हजार फौज तिजपासी आहे परंतु त्यास मामाचा भरवसा पुरत नाही उपाय नाही या अर्थी समागमे आहेत समई उपयोगी पडतील ऐसे दिसत नाही मातुश्रीची व याची भेट होऊन करार मदार काये ठरला तो लिहिणे त्यास बंदोबस्त करून घेऊ म्हणोन लिहिले त्यास मामानी याची तिची भेट केली बहुमानाच्या गोष्टी मात्र सांगितल्या परंतु त्यांत काही वीत नाही मामानी तिच्या मनोदयाकारिता यास ठाणेयाच्या चिठ्या व सिके कट्यार मागत होते तिडण बरीच लाविली होतीच इकडूनही अुत्तर बरेच जाहाले केवल विशम मानावे ऐसे तर केले नाही परंतु आग्रह मात्र राईल मिलणार नाही ऐसे जाणोन ते गोष्ट पुन्हां काढिली नाही वाजरातीराहून देविसीचा अर्थ सविस्तर लिहिलाच आहे त्या पत्रावरून मामास विशाद येई ऐसे उतर न आल्यास उत्तम तेच मुकामी नबाब निजामउदौला याजकडे मामानी कारकून पाठविले होते ते आले याजबरोबर पत्रे होती त्यात त्याणी लिहिले होतें की बारावे तारखेस कलबर्गेयास दाखल होतो तुम्ही त्याच सुमारे येणे व कारकुनाचे सांगणेयांत आले की श्रीमंत राजश्री दादासाहेब नबाबाकडे मजल दरमजल येतात याजकरिता मामाणीहि जल्दी केली लांब लांब मजली करून काल तुलजापूरनजीक आले आज कुच करून मौजे मुसी प्रगणे नलदुर्ग येथे मुकामास गेले आमचे ग्रहस्थानी तेथेच जावे त्यास देवीदर्शनास जाणे यामुले चूकामूक बिनीवाले याजपासून पडली तांदुलवाडीवर मुकामास आले नारो शंकर व विठ्ठल शिवदेव ही दोन्ही पथके येथेच आली आज येथून कुच होऊन मामाचा यांचा मुकाम येके ठिकाणीच होईल कलबर्गेयाच्या रोखे जात आहेत अविंध सुरापुराकडे होता तो आला असेल तर उत्तम आला नसेल तरी उद्याचे मजलीस तहकीक वर्तमान येईल त्यासारिखे त्या रोखे जातील या उपरी मुकाम करावयाचे कारण नाही मजल दरमजल अविंधाचे सुमारे जाऊन त्यास मेलवून थोरले फौजेच्या सुमारे जात आहेत तीन लखोटे सरकारचे आहेत ते मामास नेवून देणे म्हणोन लिहिले त्यास परवा रात्रौ सांडणीस्वार आला काल जावे तर कुच जाहले लष्कराची चुकामूक पडली त्याच्या याच्या मुकामास चारपाच कोशाची चुकामूक पडली आज एकत्र होतील मग पत्रे नेऊन देऊ परंतु मामा आमचे हाते बोलणेचालणे घेत नाहीत परस्परेच कारभारीयास बोलावून बोलणे ते बोलतात देवाजीपंत घऊशे यास आणावयास पाठविला आहेत ते अद्यापि आले नाहीत सरकारची पत्राची उत्तरे उदईक घेऊन पाठवितो खर्चास आणा-

वयास स्वार पाठविले म्हणून पेसजी लिहिले होते त्यास मामाच्या विचारे परभारे न आणावे त्यानी आणून यास द्यावे मसुदे करून देऊन याची व आमची पत्रे लिहून घेऊन पाठविली आहेत ती पावलीच असतील त्यास मामा यास ऐवज निखालस देणे होईल ऐसे दिसत नाही देईल परंतु दिक् करून देईल यांच्या लष्करात खर्चाची निकड भारी परंतु उपाय नाही मसलत थोर जाणे जरूर याजकरिता हातपाय धरून समजावीस करून तिढण न पडता मामाचे मर्जीप्रा कूच करून जातात मामानी पंचवीस हजारपर्यंत यास खर्चास तूर्त कर्जदाखल आजपर्यंत दिल्हे असे त्यास मामास विशाद न येता खर्चाचे परभारे आम्हाकडे येई ते होईल तर उत्तम सविस्तर वर्तमान मागाहून सांडणीस्वाराबरोबर लिहून पाठवितो श्रीमंत राजश्री **दादासाहेब** याचे पत्र नानासाहेबास छ ४ जिल्हेजचे आले त्यांत लिहिले आहे की राजेश्री **त्रिंबकराव** याची तुमची भेट जाहलीयावर येकदोन पत्रे आली की सत्वर येतो त्यास अविलंबे येऊन पोहचावे तुमचा बंदोबस्त तुमचे मनोदयानरूप करून दिल्हा जाईल तरी सत्वर यावे त्या पत्राची उत्तरे दिल्ही नाहींत याच्या देण्याविसी वगैरे कोणेविसी याजकडे गुंता किमपि नाहीं पुर्तेपणी खातरजमा आहे पूर्वी वडिलाकडे चिठ्या साडेसात हजार रुपयांच्या केल्या आहेत तो येवज देवावा हल्ली राजेश्री सेनासाहेब सुभा यानी राजश्री **सदाशिव सोनदेव** यास खर्चास रुपये एक हजार देविले आहेत तर वडिलानी सरकारचे येवजी याचे नावे खर्ची मांडून राजश्री सदोबाचे जमा करावी एकूण साडे आठ हजार रुपयाच्या चिठ्या केल्या आहेत आणखीही सोय पडली तर पंचाविसाचे भरतीच्या करता राजेश्री बापूरावजी वैद्य यांच्या येथील तैनातीचा वगैरे बंदोबस्ताची यादी ठरवून घेतो कळावे बहूत काय लिहिणे हे विज्ञापना

स्वामीचे सेवेसी बाळाजी गणेश साष्टांग नमस्कार विनंती विशेष सेवेसी **लक्ष्मण बल्लाल** साष्टांग नमस्कार विनंती उपरी मजल दरमजल जाऊन पोहोचतात कोणेविसी संदेह नाही दर्याबाई फौजसुद्धा समागमे आहे समई ही फौज उपयोगी नाही याचा बंदोबस्त जाहालियानें उत्तम आम्ही लिहिले ऐसे द्विरुक्त न व्हावे आणि व्हावे हे विनती

———

**लेखांक १०८ ( वैद्य )**
पो छ २६ जिल्हेज

शके १६९५ फाल्गुन व॥ ६
सन १७७४ मार्च ४

श्री

*अपत्ये तात्याने चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता फाल्गुन वद्य ६ भृगुवासर पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष येथील वर्तमान तरी रुकनद्दौले याची व राजश्री **मामा**ची व सेनासाहेब सुभे याची भेट बुधवारी रात्रौ जाहाली बोलणे चालणे ममता पुरस्कर जाहाले नबाब निजामअली यांची भेट आज उद्या होईल उपरात निश्चय होऊन पुढे चालावयाचा ठहराव होणे तो होईल **घोंशे** यास आणावयास राजश्री **देवाजीपंत** गेले आहेत तेही लवकरच येतील त्याचीही पत्रे आज आली श्रीमंत राजश्री **दादासाहेब** याजकडून **राजाराम गोविंद** व **भिकनखान** आले आहेत की या समई साहाय व्हावे गड कोट मुलुख देतो त्यास ते गोष्ट अमान्य केली परंतु अद्यापि निरोप दिल्हा नाही राजश्री **मामानीही** भेटीचे समई मदारुलमाहाम यासही निरोप द्यावा म्हणोन म्हटले त्यानीही निरोप देतो येसे बोलिले आहेत राजश्री दादासाहेब कोणे ठिकाणी आले ही बातमी ठीक नाही बातमी आल्यावर लिहून पाठवू राजश्री **भवानी सिवराम** अविंधाच्या लष्करांत आहेत, निजामअलीच्या भेटी जाहल्यानंतर चालीचा प्रकार ठरविल्यानंतर येतील राजश्री दादासाहेब याची पत्रे सेनासाहेब सुभा यास आली होती की तुमची व मामाची भेट जाहली उत्तम जाहाले त्यास सत्वर येऊन पोहचावे त्याचे उत्तर यानी मामाचे सलेने लिहून दिल्हे की येकनिष्ठित अंतर नसावे यास्तव मामासी भेटलो मामाचे कैदेंत उपासी तपासी चार मासपर्यंत तप केले की कोणतेही प्रकारे ममतायुक्त पत्र यावे त्यास ते गोष्ट न जाहली येकानिष्टपणा योग्य नाही येसे आपले चित्तांत आले उपाय काये पीडीतास सर्व द्वार मोकली हली हे पत्र आले त्यास आम्ही मराठे उ म ज गुप्त काये जाणो याजकरिता उघड ल्याहावे म्हणजे समजेल येसे उत्तर लिहून दिल्हे आहे वरकड वर्तमान सविस्तर वृत्त मसलत ठराव जाहालियावर लिहून पाठवू भवानी सिवराम याचे व रुकनद्दौले याचे बोलणे जाहाले त्यांत रुकनद्दौले यानी दर्शविले की राजश्री **बापूस** व **नानास** आम्ही लिहिले होते की **साबाजी भोसले** याचा मरातब बहाल ( पूर्ववत ) ठेवावा व त्याचा बंदोबस्त करून देणे आम्हास अगत्य आहे त्यावरून त्याणी आम्हास लिहिले

---

* कृष्णराव तात्या वैद्य यांचें हें पत्र आहे. जवळ अवळ असेंच दुसरें पत्र राजवाडे खंड १० क्रमांक ९६ चें आहे. लेखक भिन्न असूनही दोन्ही पत्रांतील मजकूर व भाषा अनेक ठिकाणीं सारखी आहे.

कीं त्याचा बंदोबस्त खर्चाचा व अमरातबाचा करून पाठविलाच आहे त्यावरून याणीही सांगितले कीं आम्ही ही त्यास लिहिले होते कीं कैलासवासी रावसाहेब यांच्या लिहिण्यावरून नबाब आमचे कुमकेस आले त्यामुळे त्याजवर पेच केवढे पडले ते आपणास ठाऊक आहेत त्यासी आपला स्नेह पूर्वीपासून चालत आल्याप्रो असावा व ये मसलतीस साध्य असावे त्यावरून त्याणी आम्हास लिहिले की नबाबाचा व आमचा दुसरा प्रकार नाहीं ये मसलतीस ते साह्य नसल्याने सेवट कैसा लागेल येसे आम्हासही लिहिले आहे येसे याणीहीं भाषण केले कदाचित पत्रे तुमची पाहो म्हटल्यास दाखवावी लागतील याजकरिता पुरवणी पत्रे येथे लिहिली आहेत त्यांच्या नकला आपणाकडे पाठविल्या आहेत त्यावरून कळेल परस्परे ममता वाढावी येसीच पत्रे आहेत परंतु पुढे बोलण्यांत अगर लिहिण्यांत आले तरी इतला असावा याजकरिता राजश्री नानाच्या कानावर घालावे ह्येथील वर्तमान ते मागाहून लिहीन आपणास घोडी येक चांगली जरूर पाहिजे घोड्याविसी नानानी बहुत दिवस चालविले आता घोडी चांगली आमचे उपयोगी असेल ती घेईन म्हणून येजमानानी भाषण केले त्यास त्याचे मर्जीप्रो घोडी येखादी जरूर दोन हजारपर्यंत पडल्यास देऊन जरूर घोडे घ्यावे लागेल सूचनार्थ मात्र लिहिले आहे कळावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति

---

**लेखांक १०९** (पेशवा दप्तर)
पो छ १५ जिल्हेज

{ शके १६९५ फाल्गुन वा ५
{ सन १७७४ मार्च ३

राजश्री हरिपंत गोसावी यासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री **साबाजी भोसले** सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिा जावे विशेष आपणाकडून राजश्री **कृष्णराव नारायण** आले ते फाल्गुन शुा १४ उपरी आम्हाजवळ पोहोचले मुखोद्गत व पत्रावरून सविस्तर कळेल त्याची उत्तरे सांडणीस्वाराबरोबर लिहिली आहे त्याजवरून श्रवण जाले असेल अलीकडे राजश्री **बाजीपंतांची** २।३ पत्रे पावली लेखनार्थ कळला गंगातीर नांदेडाजवळून दोन मजली तिस कोसाच्या करून घाट चढोन हडगुळपाा उदगीर येथे आलो उदयीक छ १९ जिल्हेज इंदुवारी दाहा कोशाचे कुच आहे दर मजलीने येत असो राजश्री **त्रिंबकरावमामा** व आम्ही येक विचारे असो मसलतीस उपयुक्ततेविसी आम्हाकडून अंतर होणार नाही एकाग्र लक्ष आहे हे अर्थ राजश्री **नानाजी कृष्ण** याणी आपणास समजाविलेच

आहेत आणि आपण येथील लक्षास माहीत आहेत संप्रत सविस्तर नाना सांगतील त्याजवरून कलेल अर्थप्राणे आम्ही आपणाजवल असो कलावे ता। छ १९ माहे जिल्हेज ( पुढें निराळे अक्षर ) बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती
मोर्तब सुद

---

लेखांक ११० ( वैद्य )

{ शके १६९६ चैत्र व॥ २
सन १७७४ मार्च २९

श्री

साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ता। चैत्र वद्य द्वितीया पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष आपण राणू सिंदा व राबलास याजबरोबर पत्र पाठविले ते पावले लि॥ मजकूर कलला सोय पाहून करून निघोन येतो म्हणोन लि॥ त्यास लष्कर वर्तमान तह किंवा...असिल्यास प्रयोजन काय आहे तरी येथील शोध करून मग कर्तव्य ते करावे राणू सिंदा यासी पाठविला आहे तरी तटू अथवा प्यारी घोडी पाठवून द्यावी पानाविसी व भीविसी लि॥ आहे त्याप्रो जरूर पाठवून देणे तुकाराम यासी रातअंधाले आहे त्यास दूर करून टाकावे राबलास यासी ठेऊन घेतला आहे मीरखान व लक्ष्मण यासी पाठवून देणे आज येथे वर्तमान बोलतात की माघारे मागती फिरले व **मामा** याचे वर्तमान (म) नस्वी बोलतात त्यास काय वर्तमान तिकडील रास्ते याजकडील जासूद आले असीतील तरी शोध करून लेहून पाठवावे पाने वगैरे सामान पाठवून देणे मीरखान लक्ष्मण यासी पो घोडी प्यारी व येक माणूस पो बहुत काय लि॥ हे विनंती तुकाराम यासी दोन रुपये दिल्हे आहेत त्याशी हिसाब करून बाकी निघेल ती द्यावी

---

लेखांक १११ ( वैद्य )

{ शके १६९६ चैत्र व॥ ३
सन १७७४ मार्च ३०

श्री

विनंती उपरी येथील क्षेम ता। चैत्र वद्य ३ त्रितीया सायंकाल च्यार घटिका दिवस पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष लष्करचे वर्तमान इकडे बोलतात श्री राजश्री **मामा** याचा मोड होऊन पल आला कोठे कोठे व इकडे

स्वारीया दरवडे याच्या कोठे कोठे आढलतात याजकरिता मिरेखान व लक्ष्मण व बाहिरव व जिवाजी यासी देखतपत्र पाा देणे तटू व प्यारी व तीन बैल कोवालासमेत बरोबर मानसे दोन तीन देऊन राणू व गणोजी व चिल्या यासी सत्वर पाठवून देणे तुम्ही बहुत सावधपणे राहणे येक दोन माणसे लागली तरी ठेऊन घेणे रात्रींचे बहुत सावधपणे राहणे आम्ही सोय बघून सर्व मंडली खाली जाणार तुम्हास कलावे दुसरा तटूचा शोध करून विकत घेऊन आम्हाकडे देखत पत्र पाा देणे मग पत्र वाचून......पालखीचे भोई कोठे......निंदा सा स मागपुढे आता पाठवू नये ठेऊन पाो जरूर जाणोन लिहिले आहे आलस करावयाचे दिवस नाही पत्रार्थ ध्यानात आणून सत्वर पाो बहुत काय लिा हे विनंती तेथील प्रकार करावयाची सोय प्रस्तुत नाही करणे ते वि(चार) पुर्ता करोन करावे बहुत काय लिहिणे हे विनंती

---

**लेखांक ११२ (वैद्य)**

{ शके १६९६ चैत्र वद्य ४
सन १७७५ मार्च ३१

साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ताा चैत्र वद्य चतुर्थी दोन प्रहर पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष इकडील वर्तमान तरी राजश्री गडबोले याचा कागद आला त्यांत राजश्री त्रिंबकराव मामा धरले म्हणोन लिा आहे त्यास तुम्ही तेथील रात्रीचा दिवस करून खाली आणून शेपाचे मस्तकी दोन तीन पुरुषावर घालून प्यारी घोडी व तटु व घोडा आणखी येक तटु व दोन तीन माणसे व मिरेखान व लक्ष्मण व बहिरू बाजी व च्यार बैल देखत पत्र पाा देणे एक घडीचा विलंब न करणे जरून जाणोन लिा आहे चिरंजीव बापू यासी घरी ठेऊन तुम्ही देखतपत्र बंदोबस्त करून सत्वर यावे पालणे यांस माणसे भोई आठचार मिलाले तरी आणावे माणसे दोन पत्रदर्शनी पाठवणे जरूर जरून जाणोन लिा आहे माणसे तुम्ही ठेऊन काय करतां हे काहीच कलत नाही या उपरी माणसांची येक घडी खोलंबा न करणे गडबोले याचे गडीयाबरोबर पत्र पाो आहे त्याचे प्रति उत्तर सत्वर गडीमजकूर याजबरोबर पाठवावे बहुत काय लिा हे विनंती

---

**लेखांक ११३** ( पेशवा दप्तर )
पौ छ. १७ राखर सन खमस ज्येष्ठ मास

{ शके १६९६ वैशाख व॥ १
{ सन १७७४ मे २६

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी महाराजांचे सेवेसी आज्ञाधारक **भिकाजी कृष्ण** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथी जें पा हरसूल सातारे येथील वर्तमान छ१४ माहे रविलोवलपावेतो साहिबाचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे महाराजाही छ२ रावलचे आज्ञापत्र सादर केले कीं पां मजकूर येथील पेस्तर सालचे रसदेचा भरणा करावयाबद्दल हे पत्र सादर केले असे तरीं भरणा करावयास जलद हुजुर येणे सालाबाद रसदेचे भरण्याविसी पत्र जाऊन महिना पंधरा दिवसाच्या अवकाशे करून येता तैसे नव्हे सालमजकुरी सरकारात यैवजाची गरज आहे हे जाणून देखतपत्र हुजूर येणे विलंब लावित्यास मामलतीची घालमेल होईल हे पष्ट समजोन जलद येणे म्हणोन आज्ञा त्यास साल मजकुरी येऊन पाच मुक्काम गीर्दनवाईत जाले तेव्हां खरीफ दरोबस्त कही-मुले नेले त्यामागे राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** दौलताबादेस आले मग उभयेता फौजा येक होऊन पंघरा दिवस आसपास मुक्काम केले त्यामुळे राहिले खरीफ सरपणास घरे मोडिली तमाम परगणाचे लोक जीव घेऊन गेले लोकांची समजाविसी करून गावगना श्रीमंत **दादासाहेब** स्वारी शहरानजीक आली त्यामुळे पंचवीस तीस गाव जालिले गुरेदेखील वलणी करून नेली त्यामागे सरकारच्या फौजा व नबाबसाहेब उभयेता शहरानजीक येऊन पाच मुक्काम केले राहिले गावची घरे उचलून सरपणाखाते नेली बागाईत लोकांनीं थोडेबहुत कोठे कोठे केले होते पायेखाली खाले आले यावर लोकास कौलपत्र देऊन गावावर वस्तीस आणावे घरेदारे लोकांची गेली खायास कोणास गुरुढोरदेखील नाहीं तगाई दिल्हियावाचून उस्तवारी होत नाहीं याप्रो वर्तमान महालचे आहे आज्ञेप्रमाणें सेवेसीं येऊन पोहोंचतो कलावे श्रुत होय हे विज्ञापना

———

**लेखांक ११४** ( पेशवा दप्तर )

{ शके १६९६ आषाढ व॥ ८
{ सन १७७४ जुलै ३०

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री **अप्पाजीपंत** दादा स्वामीचे शेवेसी पोष्य **विश्वासराव रामचंद्र** कृतानेक साष्टांग नमस्कार येथील कुशल ज्येष्ठ व॥ १४ पावेतो येथास्थित असे विशेष बहुत दिवस जहाले आपणाकडील वर्तमान कलत नाहीं येणेकरून सचिंत असो कृपा करून सविस्तर वृत्त-

लेखनाज्ञा केली पाहिजे आमचे वर्तमान सालमजकुरी अवलसालापासून गरदीचाच प्रसंग तो आजपावेतो तैसाच आहे राजश्री साबाजी भोसले व श्रीमंत राजश्री त्र्यंबकरावमामा घाटमाथा आल्यानें आवाइनेच मुलुख वैराण होऊ लागला याजकरिता सिबंदी वगैरे सरंजाम करून मुस्तैद राहिलो फौजेचा तह होऊन पलाकडे गेली तो मागून नवे सुभेदाराचे नायेब आमचे सिवसेवरी राबनार पेसजी मामलीयेतीचे उमेदवारीतच होते तेच देवदशेकरून सुभेदार जाहले त्याणी मुधोजी भोसल्याचे खंडणीची चौकसीस महालची चौकसी मागील भ्रम त्यास बहुत याअर्थी माहाली दीड महिना अखेर माघ फाल्गुनाचे दाहा दिवस चौकसी खडानखडा निसून पाहून खंडणीच्या देण्याचे आसामीवर चौकसी करून घ्यावयाची नेमणूक करून दिल्ही त्याप्रमाणें महालाचा वसूल आल्यावर ऐवज द्यावा महालाचे काम सुरू जाहले जमा आकारावियासी येक मास लागला येक मास हसेबंदी करून वसूल घ्यावा तो श्रीमंत राजश्री दादासाहेब घाटावर आले त्यानी आसाम्या निवडू(न) ठलक माणूस धरून पैका घ्यावा आग्र गावगना द्यावा हेच आरंभिल्यानें कोणासही धैर्य पुरेनासे जाहले चहुकडे येकच प्रकार जाण्यास ठिकाण नाहींसे पाहून माहालच्या व आपली अब्रू राहीसी तजवीज आलग राहून लाहेसाहेसा बंदोबस्त होईल तरी करावा नाहीतर देशांतरास जावे ऐसा प्रकार योजून बंदोबस्त थोडाबहुत करून येत्किंचित बच्याव मोठेमोठे गावचा जाला बाकी अगदी लुटोन जालून फस्त केले त्याजकडे वसूलही पावला मागून राजश्री हरिपंततात्या आल्यावर भेटीस गेलो बहुत रोज राहिलो फौज परगना फार करून निरोप घेऊन यांव तो त्याणीही ऐवज मागितला रदबदली करून तात्याची मर्जी रक्षणार्थ दाहाबारा हजार रुपये नक्त रोकडे लष्करात वोलख नाहीं म्हणून भनोती कबूल करून पैका दिल्हा माहालाचे कचे वर्तमान सविस्तर कागदोपत्री येथास्थित समजाऊन कृपा संपादून काल माहाली आलो आत्फीचा झोला तगदीरचा महत्प्रलय अगोधर आकार कमी त्यात वसुलाचे हंगामी फौजाची गरदी खुंतली माल माझ्या देवे पालवे (देव पाल्ये) अगदीं गेल्याने पैका झाडून आला नाहीं आला तो फौजेच्या दंग्यांत खर्च जाला आतां तगाई विशई पोटगी चारा व पांघुर्णे चिरगुटे देऊन लोकास ममतीचा कौल देऊन लावणीस लावावे पाऊसही स्वल्पच आहे आपला प्रेत्न आहे सत्वरच येऊन पोहोचतो आमचा कारभार गरिबीचा आमचे वगवसीले आमचे इमान स्वामी चरणी दृढोत्तर आहे तरी कोणाच्यानेहि काही होणे नाहीं आपण अंगीकार केल्याप्रो निर्वाह केला पुढे ही उमेद स्वामी चरणाचीच आहे.

———

**लेखांक ११५** ( पेशवा दफ्तर ) सन १७७४

यादी कर्जपटी पो ऐवज आला तो अजमासे बेरीज सन खमस रुपये

१०००० महादाजी रघुनाथ काळे
२०००० कृष्णाजी महादेव गोडबोले
४०००० गोपाल कृष्ण तांबेकर
७०००० विश्वासराव त्रिंबक पेठें
२०००० कृष्णराव त्रिंबक पेठे
४००० आपाजी नारायेण
१०००० सिवराम रघुनाथ
५००० गोपाळ माहादेव
५०० दिवाजी सोनार रविवारकर
२०० जिवाजी पाथरव(ट) सोमवारकर
६७०००० तुकोबा सिंदे याजप्रो तुर्त वसुलीखेरीज

८४९७००

येकूण आठ लक्ष येकूण पन्नास हजार सातसे रुपये कर्जपटी बदल जमा धरून रदकर्ज व तसलमातबा यादी आलाहिदा नावनिसीप्रो खर्च जिकडून तिकडे लिहून जमाखर्च बराबर करावा कर्जपटीबा ऐवज सालगुा म्हणोन जमा करणे.

---

**लेखांक ११६** ( पेशवा दफ्तर ) { शके १६९६ पौष शुा ३ / सन १७७५ जानेवारी ४ }

सेवेसी त्रिंबक विश्वनाथ * कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १ जिल्काद तरफ प्रकार मुा नजीक फैजपूर प्राां सावदे येथास्थित श्रीमंत धारेवरून दरकुच मौजे पेटलावद प्रो मालवा धारेपासून पंचवीस

* हा पेठे नव्हे.

कोस आहेत तेथून मागे बारा कोस बादणावर येणार लौकर तरी राजश्री हरिपंत-तात्या फौजसुद्धा धारेवर पाठविणे वर्तमान आले आहे कागद तिकडून पाच-सात दिवसात आले नाही आलीयावर सविस्तर लेहून पाठवून बहुत काये लिहिणें कृपा निरंतर असो द्यावी

---

**लेखांक ११७** ( डे. कॉ. पा. सं. ) {शके १८०२ / सन १७८०

* विज्ञापना **त्रिंबकरावमामा** यांचे नातु व पुत्र यांची वाटणी जाहली घरगुती समज पडली पुढे तुमचे चालावे त्यास खर्चाचा प्रकार अमृतरावाकडे राहिला मातुश्री **येसूबाई** व **अमृतराव** मजकडे आले होते मामानी चाकरी जिवाभ्य केली त्यासी करारमदार केला होता तो पाठीमागे उभयता राहिले याणी निभवावा विसरू नये मी उत्तर केले की त्यास स्मरण आहे चुकणार नाही जागीर देणेघेणेचा प्रकार तर दौलतीत काय राहिले तथापि तुमचे चालविण्यास अंतर करणार नाही त्यांचा आग्रह की तुम्ही इकडे असता म्हणजे काय करणे ते करून द्या नाही तर साफ सांगा मी बोलिलो की मजपेक्षा उभयतास अगत्य आहे परंतु खातरजमा होत नाही माझे मते सेवटील प्रकार येदोनचे राऊतांचा सरंजाम अमृतराव यास द्यावा व तैनात इनामगावसुद्धा कमकसर पस्तीस राहतात त्यात देवाचे खर्च व संसार चालत नाही ते साठ करून द्यावे **बाबूराव** ( कृष्णराव त्रिंबक पेठे ) यास पंधराचा जागीर इनामसुद्धा वाटणीस झाली त्यास काही देणे तर द्यावे या गोष्टी जरूर जाल्या पाहिजेत मामा सरकार कामास आले पाठी-मागे आपण व त्यांचे कुटुंबाचे संरक्षण करावे यात लौकिक चांगला आहे या-खेरीज शागीर्दपेशाचे माणूस त्याजकडे होते त्याप्रो द्यावे अमृतरायास तेथे न्यावे शाहाणे करावे कर्जदार आहेत घरात विषय कांहीं राहिला नाही आता तैनातेची सोय करून दिली तरच आब राहील नाहीतर राहत नाही मी येते समई विनंती केलीच आहे ध्यानात आणून आज्ञा करावी पुण्याजवळील गांव वाटपात गेले येक पेंढीची सोय नाही सर्व सोय आपण करून द्यावी ही विज्ञापना

---

* हें पत्र हरिपंत फडक्यानें नाना-बापूस लिहिलेलें

**लेखांक ११८** ( पेशवा दफ्तर ) { शके १७०२ मार्गशीर्ष व॥ १ सन १७८० डिसेंबर १२

श्री

राजश्री हरिपंत स्वामींचे सेवेसी विनंती उपरी त्रिंबकरावमामाचे पुत्राची व नातवाची वाटणी घरगुती समजूत पडोन जाहाली पुढे मुलाचे चालावे खर्चाचा प्रकार अमृतराव याजकडे आहे त्यास त्याचें बोलण्याचा प्रकार फारच आहे परंतु माझे मत सेवटील प्रकार सेदोनसे राऊताचा सरंजाम अमृतराव यास द्यावा व तैनात इनामगावसुद्धा कमकसर पस्तीस राहतात त्यास देवाचा व संसाराचा खर्च चालत नाही ते साठ हजार करून द्यावे बाबुराव यास इनाम गांवसुद्धा पंधरा हजाराची वाटणी आली त्यास अधिक कांही देणे ते द्यावे अमृतरावास शागीर्द पेशाचे माणूस पूर्वी होते त्याजप्रो द्यावे शाहाणे करावा येविसीचा मजकूर लिहिला तो सविस्तर कलला ऐसियास तुम्ही मामाचे नातवाचे तैनातेचा व स्वाराचा व पुत्राचे तैनातेचा प्रकार लिहिला तो फार उत्तम आहे तरी तुम्ही राजश्री बापूस लेहून करार करून द्यावे रा॥ छ १५ जिल्हेज हे विनंती

---

**लेखांक ११९** ( पेठे ) { शके १७०० ज्येष्ठ शु॥ १४ सन १७७८ जून ८

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री **अमृतराव विश्वनाथ** स्वामी गोसावी पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष मौजे समनेर पो नासीक हा गाव **बाबूराव गणेश पेठे** याजकडे आहे त्यास मारनिलेचा व **पांडुरंग बलाल पेठे** याचा विभागाविसी काजिया आहे सबब मौजे मजकूरची देखरेख तुम्हाकडे सांगितली असे तरी गावचा वसूल तुम्ही करून येवज अमानत ठेवणे उभयतांचे कजियाचा निवाडा जाहाल्यावर आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करणे जाणीजे छ १२ जमादिलावल सु॥ तिसा सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

---

लेखांक १२० (पेशवा दफ्तर) { शके १७०३ मार्गशीर्ष शु॥ ५ / सन १७८१ नोव्हेंबर २०

यादी वाटणी बाबूराव गणेश व सदाशिव गणेश पेठे यांचे चुलतबंधु पांडुरंग बलाल पेठे हे एकत्र होते त्यास शके १६९८ दुर्मुखनाम संवत्सरे बाबुराव गणेश व सदाशिव गणेश हे उभयता पांढुरलीस राहिले नैवेद्य वैश्वदेव भिन्न करु लागले त्यापासून वाटणीचा गर्गशा आजपावेतो पडला होता त्यास हाली त्रिवर्ग पुणियास येऊन श्रीमंत राजश्री अमृतराव विश्वनाथ पेठे यासी विनंती केली की आमचे वाटणीची फडशा करून द्यावा त्यावरून अमृतरावजी याणी चौघे मेलवून ठेराव केला कीं बाळाजी विश्वनाथ यांचे पुत्र पांडुरंग बलाल यानी वडिलांचे वेळेचे व बाबूराव गणेश यांचे कारकीर्दीचे कर्ज लोकांचे देणे व लोकाकडे येणे त्याची वाटणी निमे पांडुरंग बलाल याणी घ्यावी ती न घेता सारे देणे व येणे बाबूराव गणेश याजकडे लावून पांडुरंग बलाळ याणी आपले स्वसंतोषे उक्ती वाटणी घेतली व बाबूराव गणेश याणी देणे लोकांचे करावे व येणे लोकाकडे ते घ्यावे येणे प्रमाणे आपले श्वसंतोषे मान्य जाले त्याजवरून उभयतांची वाटणी त्याची कलमे बीतपसील

**बाबूराव गणेश व सदाशिव गणेश याजकडे वाटणी**

१ देवस्थान नवरात्र वडलाकडे—कलम

१ जुनी हवेली विष्णु महादेव गद्रे याच्या हवेलीजवळ आहे ती नासीकच्या गांवातील-कलम

१ भोगूरची जागा घराची-कलम

१ पांढुरलीचा वाडा राहता व त्या वाड्यापुढील आसामी बा। जागा -कलम

१ श्री त्रिंबकाचे घराची जागा आहे ...जवळ आहे ती-कलम

१ मौजे धामणगाव प्रां। नासीक येथील कुलकर्ण

**पांडुरंग बलाल याजकडे वाटणी**

१ हवेली नाशीकची पुन्यातील दुकानसुद्धा श्रीमंत राजश्री अमृतराव विश्वनाथ पेठे यांचे हवेलीचे मागे आहे ती—कलम

१ मौजे समनेर प्रां। नाशीक हा गाव दरोबस्त आपल्यास इनाम आहे त्यास मौजे मारचा अनुभव बाबूराव गणेश यानी घेऊन दरसाल रुपये १५० दीडशे पांडुरंग बलाल यासी देविणे सरकारची कर्जपटी वगैरे काही बाब आलियास मौजे मारची जमाबंदी होईल त्या प्रां।

१ मौजे समनेर प्रा। नासीक हा गाव आपल्यास इनाम आहे त्याजपैकी दीडसे रुपये दरसाल पांडुरंग बलाल यासी देऊन बाकी दरोबस्त -कलम

१ इनाम जमिनी प्रा। नासिक येथे
१ मौजे आगारखिंड
१/२ मौजे बेटू

१ पांडुरलीची बाग वावर सान्याने आहे ते दरोबस्त

१ झाडे आंब्याची इनामी गावगना आहेत सुमारे १३पैकी वजा दिल्ही पांडुरंग बलाल याजकडे सुमारे ८ बाकी तपशील विंचुरी ३ आगारखिंड १ बेटू १ येकूण ५

१ कुलंबिणी कस ६ पाच पांडोबाकडे

१ हत्यारापैकी पांडोबाकडे
१ अफदागीर १ तरवार २ बंदुखा बाकी दरोबस्त

१ घोडी रास तीन प्रा। पांडोबाकडे दोन

१ भांडी दरोबस्त पो। पांडोबाकडे शंभर पात्राची हरजिनसी पितळ तांबे लोखंड मिळोन देऊन बाकी दरोबस्त

१ ग्वाहागरचे वतन आहे ते समाईक असे

१ गुरांपैकी म्हशी पांडोबाकडे बाकी दरोबस्त

१ महजर घराचे प्रां। नासीकचे नवे हवेली पांडोबाकडे

१ नग नगोटे असेल ते ज्याचे त्याज-खेरीज वाटणीसिवाय ऐन राहिले असेल ते अलाहिदा

हिस्सेरसी दीडसे रुपयावर होईल ती वजा करून बाकी द्यावे आफत पडून गावची जमाबंदी कमी पडली-यास देवीच्या उछोहाचे अडीचशे बाबूराव गणेश यानी घेउन बाकी राहिला ऐवज त्याजप्रमाणे दीडशे रुपये द्यावे देवीचे खर्चाचे सदरहू अडीचशेच राहिले तरी पांडुरंग बलाल यासच द्यावे

१ आंबे झाडे ह मा मी (हंगामी) सुमारे १३ आहेत त्याजपैकी भगू-रची झाडे ५ व वडगावची २ व राहुरीचे १ एकूण ८

१ हत्यारापैकी बंदुका २ तलवार एक ढाल आत्फागीर येकूण ४

१ भांडी शंभर पात्राची तांबे पितळ लोखंडी मिळोन ६ यावी

१ कुलंबीण बर्चा राहते ते जागा पांडुरलीच्या वाडयाच्या दक्षिण-कडील

१ महजर पुन्यांतील हवेलीचे दुकान-सुद्धा

१ वेगळे निघाल्यावर आम्ही कर्ज केले असे ते आमचे आम्ही वारू बाबूराव यासी संमंध नाही

१ ग्वाहागरचे वतन आहे ते समाईक असे

१ नग नगोठे ज्याचे त्याजकडे यासी जे राहिले असेल ते अलाहिदा अकरा कलमाखेरीज दरोबस्त बाबूराव याजकडे
सदरहू अकरा कलमे पांडुरंग बलाल पेठे याजकडे येणेप्रो करार

१ कलमाखेरीज दरोबस्त बाबूराव याजकडे

पांडुरंग बलाल पेठे वर लिहिल्याप्रो सही

सदरहु १९ कलमे बाबूराव गणेश व सदाशिव गणेश पेठे याजकडे येणेप्रो करार वर लिहिल्याप्रो पांडुरंग बलाल पेठे मान्य

हस्ताक्षर पांडुरंग बलाल पेठे मिति शके १७०३ प्लवंग नाम संवत्सरे मार्गशीर्ष शु॥ ५ इसने समानी न मया व अलफ

साक्ष

१ अमृतराव विश्वनाथ पेठे
१ सदाशिव बाबाजी आवडेकर कुलकर्णी ग्वाहागार
१ बालकृष्ण केशव वर्तक
१ बाळकृष्ण हरि का। ग्वाहागार
२ सदाशिव गोविंद बापये

---

लेखांक १२१ ( पेठे )

शके १७०३ मार्गशीर्ष शु॥ १०
सन १७८१ नोव्हेंबर २५

श्री

१/२ बंद रास च्यार

यादी वाटणी बाबूराव गणेश व सदाशिव गणेश पेठ्ये हे उभयता बंधु येकत्र असतां हाली आपसमध्ये न बने सबब विभक्त व्हावयाचे ठरले सुहूर सन समानीन मया व अलफ माहे जिल्हेज सु॥ मार्गशीर्ष शुद्ध १० शके १७०३ प्लवनाम संवत्छरे वाटणी बीतपसील

बाबूराव गणेश याजकडे येणे प्रो कलमे

१ देव दरोबस्त पो येक पंचायतन सदाशिव गणेश याजकडे देऊ— कलम १ मौजे संगमनेर प्रो नासीक हा गाव सरकारातून इनाम दरोबस्त आहे त्याचे कास सबंधीचे बिघे सुमार ८०० पो वजा समाईक बिघे सुमार

सदाशिव गणेश याजकडे येणे प्रो कलमे

१ श्रीदेव प्रो पंच्यायतन येक घेऊं— कलम
१ मौजे समनेर पो नासीक हा गाव सरकारांतून दरोबस्त इनाम आहे त्याचे कासबंदीचे बिघे सुमार ८०० प्रो वजा समाईक बिघे

१६७ श्री देवीचे उछाहास नेमणूक
१०० पांडुरंग बलाल यास दीडसे रुपये दरसाल द्यावयाचा करार आहे त्याची जमीन बिघे.

२६७

१६७ श्रीदेवीकिडे उत्छाहाची नेमणूक
१०० पांडुरंग बलाल यास दीढसे रूपये द्यावयाचा करार दरसाल आहे त्याची जमीन बाबूरायाकडे बिघे

२६७

## तपसील

१३३॥ उगल्याचे तरफे प्रा॥
१३३॥ जाधवाचे तरफे प्रा॥
२६७

## तपसील

१३३॥ उगल्याचे तरफे प्रा॥
१३३॥ जाधवाचे तरफे प्रा॥
२६७

बाकी जमीन राहिली त्याप्रा॥ निमे जमीन जाधवाची तरफ समाईक वाटणी जाऊन बाकी राहिली ती देऊं उगल्याची तरफ वाटणी जाऊन बाकी राहिली ती आम्ही घेऊ—कलम

१ ता॥ कानवई येथील आसामी हशम फडणिशीची आहे ती निमे—कलम

१ मौजे धामणगांव येथील कुलकर्ण आहे ते निमे—कलम

१ नासिकची हवेली निमेनिम आड कनिष्ठाकडे जातो त्याचा पैका या चौ(घा)चे मते होईल तो निमे घेऊ—कलम

१ पांढोरली येथील घर राहाते ते निमेनीम आड कनिष्ठाकडे जातो त्याचा पैका निमे—कलम

१ पांढोरलीचे आसामी बा॥ जागा निमेनीम घेऊ—कलम

बाकी जमीन राहिली त्याजप्रा॥ निमे जमीन जाधवाची तरफ समाईक वाटणी जाऊन बाकी राहिली ती घेऊ—कलम

१ कानवईची असामी हशम फडणिशीची आहे ती निमेनीम—कलम

१ मौजे धामणगावच कुलकर्ण आहे ते निमेनीम—कलम

१ नासिकची हवेली निमेनीम आडाचा पैका चौघाचे मते ठरेल तो निमे देऊ—कलम

१ पांढोरलीचे घर राहते निमेनीम अडाचा पैका निमे देऊ—कलम

१ पांढोरलीचे आसामीचे घर निमेनीम—कलम

१ श्रीत्र्यंबकचे घराची जागासुद्धा निमेनीम—

१ दस्तक व नसराबाजची आसामी सरकारांतून करून घ्यावयाची आहे

१ श्री त्रिंबक येथे जागा आहे ती निमेनीम घेऊ
१ मोगूरचे घराची जागा इमल्यासुधा निमेनीम—कलम
१ दस्तक व नसराबाजची आसामी सरकारातून करून घ्यावयाची आहे त्यास खर्च पडेल तो निमेनीम देऊन करार जाल्यास निमेनीम घेऊ—कलम
१ मौजे आगारखिड येथील इनाम जमीन आहे ती निमेनीम—कलम
१ मौजे बोटू येथील जमीन इनाम आहे ती निमे—कलम
१ हत्यारे निमेनीम—कलम
१ भांडी पांडोबाची वाटणी वजा करून बाकी राहील ती निमे-कलम
१ गुरे नवी गाय वजा करून बाकी राहिली ती निमेनीम—कलम
१ घोडी असतील त्याजप्रो सदाशिव गणेश यास वाटा द्यावयाचा नाही कलम
१ श्रीचा उत्छाहाकडे
२ समया चिक्ष्याच्या
२ लोखंडी समया
१ गालिच्या
५
कलम

त्यास खर्च पडेल तो निमेनीम देऊन करार जाल्यास निमेनीम घेऊ—कलम
१ मौजे बोटू येथे जमीन इनाम आहे ती निमेनीम घेऊ—कलम
१ हत्यारे निमेनीम घेऊ—कलम
१ भांडी पांडोबाची वाटणी जाऊन बाकी राहतील ती निमेनीम घेऊ —कलम
१ लोकांचे कर्ज देणे व लोकाकडे येणे ते दत्पर रुजु असेल ते निमेनीम द्यावे घ्यावे कुले सरसनिरस वाटून घेऊ—कलम
१ गुरे नवी गाय वजा करून बाकी राहतील ती निमे घेऊ—कलम
१ घोडी असतील ती बाबूरायानी घ्यावी
१ श्री देवीच्या उत्छाहाकडे वाटणीसिवाय दागिने उभे रासीस घ्यावे
२ समया चिक्ष्याच्या
२ लोखंडी समया
१ गालिच्या
५
—कलम

१ लोकाकडे कर्ज येणे व लोकाचे देणे ते दत्पर रुजु असेल ते उभयतानी निमेनिम द्यावे व घ्यावे कर्ज येणे ती कुले सरसनिरस वाटून घ्यावी—कलम

१ इनामी आंब्याची झाडे सुमार ५ त्याजपो बाबूरायाकडे दोन बाकी आम्हाकडे

१ इनामी झाडे आंब्याची सुमार ५ पो विंचुरीची आम्ही घेउ सुमार
 १ तुप्या
 १ साखरखडा
 २ येणेप्रो कलम.

१ वीत विशय हिसेब रुजु असेल तो बायकाच्या व सुनाच्या वस्ता ज्याच्या त्याजकडे दऊन बाकी मोघम असेल ते निमेनिम — कलम

१ कुणाबिणी कस ५ पो सदाशिवपंताकडे.
 १ जनी
 १ रतनी
 २
बाकी — कलम

१ गुहागरचे वतन व आगर समाईक — कलम

१ घराचे महजर व दस्ता येवजी व इनामी कागदपत्र असतील ते वडलाकडे ठेऊन नकला कनिष्ठाकडे द्याव्या व कागदपत्र आपणाजवल आहेत असे वेगले पत्र लिहून देउ व असल कागदाचे काम लागल्यास देऊन आपणाजवल घेऊन ठेऊ — कलम

१ गाडे व गाडल्या असतील त्यापो निमेनिम — कलम

१ खासगत वेव्हारसमधे देणे व घेणे असेल ते निमेनिम द्यावे व घ्यावे — कलम

 १ विंचुरीचा श्रावण्या
 १ आगरखिंड
 १ बोटू
 ३
कलम

१ वीत विशय हिसेब रुजु असेल त्या प्रो बायकाच्या वस्ता वजा करून बाकी निमेनीम -- कलम

१ कुणबिनी कस ५ प्रो वडलाकडे
 १ बची
 १ संती
 १ नंदी
 ३
बाकी आम्हाकडे -- कलम

१ गुहागरचे वतन व आगर समाईक — कलम

१ घराचे महजर व दस्तायेवजी व इनामी कागदपत्र असेल तो वडलाकडे ठेऊन नकला आम्ही घेऊ व कागदपत्र आम्हाजवल आहेत असे वडलाचे पत्र लिहून घेऊ व कागदाचे प्रयोजन पडल्यास असल पत्र घेऊन काम जाल्यावर जेथील तेथे देऊ अथवा आम्ही टेऊ -- कलम

१ गाडे व गाडल्या असतील त्या निमेनिम घेऊ — कलम

१ पांढोरल्याच्या बागाची जमीन तेल्याबाा सान्याने आहे त्याजपो निमि व आंब्राई लोकांस झाडे

१ पांढोरलीचा बाग तेल्या वा। वावर सान्याने आहे त्याची वाटणी
१ जामिनीची वाटणी दुर्गाबागची जमीन बिघे ३ आम्हाकडे व अंब्राईचें पश्चमेकडील जमीन बिघे ३ सदाशिव गणेश याजकडे — कलम
१ आंब्राईची वाटणी इरसाल आंब्याची झाडे आहेत त्याच्या यादी दोन करून दोघानी घ्याव्या बाकी झाडे राहिली ती निमेनिम घ्यावी कलम

२ कलम

दिली आहेत ती वजा करून निमेनीम घेऊ
१ आंब्राईचे पश्चमेकडील तुकडा बिघे ३ आहे तो आम्ही घेऊ
१ आंब्याची झाडे इरसाल आहेत त्याच्या यादी दोन करून येक आम्ही घेऊ बाकी झाडे राहिली त्याजपो निमे घेउ—

२
कलम

१ खासगत वेव्हार आहे त्याचे देणे व येणे आहे ते उभयता घेऊ देउ —— कलम

१ वर कलमे लिहिली आहेत यासिवाय कलम राहिले असेल ते निमेनिम घ्यावे व द्यावे लढ्याचे कलम निघाल्यास चौघाच्या मते ठरेल त्याप्रमाणे करावे — कलम

२७

१ वर कलमे लिहिली आहेत त्याजखेरीज कांही कलम राहिले असेल तर निमे घेउ देउ लढ्याचे कलम निघालियास चौघाच्या मते ठरेल त्याप्रमाणे करु —— कलम

२७

येकून कलमे सतावीस यास बाबूराव गणेश पेठे मान्य सदाशिव गणेश याची व आमची विभगतता होऊन वाटणीची यादी हेच याप्रो उभयेतानीं चालावे याउपर वाटणीविशई लढा कोणेविशई राहेला नाही वर लि।। प्रा।। बाबूराव सही

येकूण कलमे सतावीस यांस सदाशिव गणेश पेठे मान्य बाबूराव गणेश याची व आमची विभक्तता होऊन वाटणीची याद हेच याप्रो उभयतानी चालावे याउपरी वाटणीविसी लढा व कोणेविसी राहिला नाही वर लि।। प्रो सदाशिव गणेश सही

हस्ताक्षर महादाजी विश्वनाथ म्हैसकर

साक्ष

अमृतराव विश्वनाथ पेठे
१

बाळकृष्ण हरि गद्रे का। गुहागर
१

महादाजी विठल दातार मौजे
पोहुर्ले ( पांढोरली ? ) १

परशराम नारायण सोवनी
१

गणेश माहादेव रिसबूड
१

बाळकृष्ण केशव वर्तक
'

दिनकर बाबाजी आंब्रेडेकर
कुळकर्णी का। गुहागर बोधनी
१

माहादाजी धुंडिराज पेठे

---

लेखांक १२२ ( पेठे ) 	{ शके १७०४ मार्गशीर्ष व।।४
सन १७८२ डिसेंबर २३ }

श्री

राजश्री विसाजी रंगनाथ गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री तुकोजी होलकर दंडवत सु।। सन सलास समानीन मया व आलफ मौजे मुंगसरे पो। दिंडोरी हा गाव राजश्री अमृतराव पेठे याजकडील आहे तेथील पाटलास बाबाजी सिंदा खिजमतगार नि।। सरकार याणे धरून मौजे मखमलाबाद येथे नेले त्याजपासून मसाला वगैरे येवज मनमानेलसा घेतला म्हणोन येथें बोभाटा आला त्यावरून हे पत्र सदर केले आहे तरी तुम्ही ये विषयीचा करीणा मनास आणून मुंगसरेकर पाटलापासून खिजमतगाराने मसाळा वगैरे जो ऐवज घेतला असेल तो दामदाम त्याचा त्यास परतोन देववून पाटीलही सोडून देवाविणे पुन्हां पेठ्ये मारनिलेकडील गावचा तिलमात्र बोभाटा येऊ न देणे दुसरे मुंगसरकर कोणी पाटील पाटिलकी यावयाशी म्हणोन बाबाजी सिंद्यापासी आले होते त्याजपासून पन्नास रुपये सिंद्याने घेतले म्हणोन पेठ्ये याजकडील कारकून याणी सांगितले त्यास त्याची चौकशी करून पाटलापासून खरेच पन्नास रुपये खिजमतगाराने घेतले असल्यास तोंही ऐवज सिंदे मजकूरकडून त्याचा त्यास देवाविणे लढा न ठेवणे जाणीजे छ १७ जिल्हेज बहुत काय लिहिणे

---

**लेखांक १२३** ( डे. कॉ. सं. मं. ) सन १७८६ च्या पूर्वी

श्री

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी पो **अमृतराव विश्वनाथ** साष्टांग नमस्कार विनंती विशेष आपण पत्र पाठविले ते पावले **श्रीमंत महाराज** याचे भेटीसमई डेरे द्यावे किंवा घोड्यावरच भेटी घेऊन वाडियात यावे याचा सिरस्ता कसकसा तो लेहून पाठवावा म्हणून लिहिले त्यास येथे शोध केला परंतु येकनिश्चयाचे ठिकाण लागले नाही राजश्री **सदाशिव दीक्षित** व बाबूराव याचे मते आईसाहेबाबरोबर आहेत यापक्षी डेरे द्यावे महाराजांचा डेरा वेगळा व आईसाहेबांचा महाल दोन मिळून तीन डेरे अथवा येके सेन्यात तीन कोटयामध्ये पडदे लाऊन कराव्या आज गुरुवारी सायंकाली बेटूचा मुकाम जाहाला कलावे रा गुरुवार अवसीचा दीड प्रहर रात्र बहुत काय लिहिणे हे विनंती

---

**लेखांक १२४** ( डे. कॉ. सं मं. ) * शके १७०८ मार्गशीर्ष वा। २ सन १७८६ नोव्हेंबर ७

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री **नाना** स्वामीचे सेवेसी **अमृतराव विश्वनाथ** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान ता। छ १५ मोहरम पावेतो क्षेम जनस्थान येथे यथास्थित असे विशेष आपण छ १० माहे मजकूरचे पत्र पाठविले ते छ १३ मिनहूस पावले तुम्हाकडून गेलिया ता। पत्र न आले त्यास येथून गेल्यावर नासिकास अगोधर गेला किंवा टोक्यास शरीरप्रकृत कशी आहे हे लेहून पाठवावे जाते समई बोलण्यात होते कीं दसऱ्याचे सुमारे पुण्यास यावे त्यास दिपवाली व कार्तिकी पौर्णिमाही जाली अद्याप येणे जाले नाही त्यास याउपर तरी लौकर येणे व्हावे म्हणोन व लष्कराचे छाप्याचे वगैरे वर्तमान लिहिले ते सविस्तर कलले म्हणजे त्यास प्रथम आपली आज्ञा घेऊन निघालो ते समई पूर्वी नासिकास जाऊन तेथून टोक्यास जाईन असे बोललो परंतु निघाल्यानंतर मनात आले जे पावसाच्या दिवसात नासीकची हवा वाईट असेल याजकारिता टोक्यासच पूर्वी जाऊन चार दिवस तेथे राहून नंतर पाऊस उघडला म्हणजे नासिकी यावे त्या अन्वये प्रथम टोक्यास गेलो तेथे दीडमहिनापर्यंत राहून पाहिले प्रकृत होती तसीच होती परंतु वायूने पाय थोडथोडा जड वाटू लागले ते समजले नाहीत अशक्तपण याने जड वाटतात असे भासले नंतर तेथून निघोन आश्विन वा।१ येथे आलो तो दुसरेच दिवसी पायास कमरेखालती सूज समजली व मुंग्याही येऊ लागल्या त्या

* यानंतर थोड्याच दिवसांनीं अमृतराव पेठे मरण पावला.

आठा दहा दिवशी अधिकच वाटल्या म्हणून तेव्हापासून स्नान करीत नाही व वाऱ्यावर जातयेत नाही व येथे येक धनगर वनस्पतीचा जाणता फार चांगला आहे त्याचे गुण बहुतास येतात त्याची तारीफ फारच केली आहे म्हणोन त्यास आणून तो औषध देत असतो ते घेत असतो व पायासही लावीत असतो त्याचे उपायास प्रारंभ करून आठ दिवस जाले अद्याप जसे आहे तसेच आहे आपली आज्ञा आली जे लौकर यावे त्याप्रा पत्र पावताच निघावे परंतु प्रस्तुत सदरहू लिहिली अशी प्रकृत आहे

---

**लेखांक १२५ ( डे. कॉ. सं. मं. )** सन १७७६ ?

* सेवेसी विज्ञापना राजश्री **विसाजी कृष्ण** यांचे बोलणे येथे अल्यावर जाहले त्यात खुलासा जे समई राजकारणास प्रारंभ केला ते समई मजपासून शफत घेतली व आपण उभयतानी वचन दिल्हे त्याप्रो तुमचे लक्ष धरून चालिलो दादानी मुलापासून पैका घेतला येथे गुदस्ता फौज ठेविली माहाल काढून मोगलास दिल्हे याहून कर्जदार जाहालो सर्व प्रकारे उपयोगी पडलो असता जुने होते ते गेले मग उर्जिताचा प्रकार कललाच आहे हिंदुस्थानात पाच वर्षे श्रम केले तेथून आलो तो खावंद गेले खावंद असते तर पुष्कळ देते व मीही मागतो परंतु कशाला ठिकाण नाही उभयतानी वचन दिल्हे तुम्ही मध्यस्त त्यास आलीकडे हा लाभ जाहला तेव्हा बोलण्यास स्मरण नाही असे वाटते असो तुम्ही मध्यस्त आहा एक वेल खावंदाकडे घेऊन चला कार्य करून घ्यावे नाही तर स्नानसंधेस निरोप द्यावा असी कितेक बोलणी जाली त्यावरून मी त्याची बहुता प्रकारे खातरजमा केली की तुमची चाकरी व निष्ठा उभयतास ठाऊक आहे व मी बोलिलोही आहे तुम्ही किल्ल्यास गेल्यावर तुमचे समाधान करितील सोय करून देतील त्याचे बोलणे—

तैनात चालीस हजार आहे त्याणे निर्वाह होत नाही हिंदुस्थानची चाकरी करून आल्यावर श्रीमंत असते तर लाख रुपये तैनात करते ती गोष्ट राहिली यासाठी जरूर जे करणे ते करावे जागीर मोगलास दिल्ही त्याचे मुबदला जसी घेतली तसी देसी द्यावी

इतके दिवस चाकरी केली परंतु बिघाभर जमीन मागितली नाही श्रीमंत असते तर दाहा हजारांचे मागतो आता मर्जीस येई ते... किला येक मुले माणसे ठेवण्यास ......मुलास दंड पडला व गुा फौज ठेवून माहाल दूर केले कर्ज जाले त्याची वाट काय

---

* हरिपंत फडक्याचे पत्र नाना फडणिसास

या प्रमाणें बोलणी आहेत पाहता वावगे बोलणे कोणते ते प्रथम यास वचनास गोविले इकडे राहिले यामुळें चिरंजीव पेचात आले पैका दंडला पुढे स्वामी-जवल राहून चाकरी केली त्याचे महाल गेले त्यास ठिकाण नाही जाजती मिल-ण्याची गोष्ट राहिली परंतु पुा विज्ञापना पूर्वी होते ते असावे याची हिंदुस्थानांत चाकरी थिरा जाहली आहे इनामाची विनंती आहे त्या सर्वांस असावे आणि यास नसावे असी चाकरी नाही येक स्थल असावे येसे बोलणे याची सोय काढावी मोगलास महाल दिल्हे त्याचे मुबदला देऊन संतोष राखादा स्वामी म्हणतील राखिले काय द्यावे काय तर वरकडाचे घेतले त्यास कोण्ही दिल्हे यास का नाही प्रारंभापासून आपले लक्षात असे असता त्याचे विस्मरण नसावे सोय करून द्यावी विसाजीपंताप्रमाणे मेहनत कोणी केली नाही व पुढेहि चाकरी करितील सरकार कार्यास अंतर नाही आपण उभयतानी विचार करून विसाजीपंताची चाकरी ध्यानात आणून विसाजीपंतास बरे वाटे असे करावे मी फार समाधान केले परंतु शुष्क गोष्टीने काय पहिल्यापासून बोलण्यांत मी आहे मजला लाजवि-तात की तुम्ही वचन घेतले तेव्हापासून येकच गोष्ट असा प्रकार असता स्वामीनी त्याची अनास्था करू नये इतरही जे काम देऊ ते करावयास सिध आहेत सोय करून दिल्यास चिरंजीव लष्करांत पाठवावे असे मानस आहे त्याच्यात कसे करावे ते मजला आज्ञा करावी तपसील लिहिला म्हणून कंटाळा करू नये जे मनुष्य आपले लक्षात राहिले त्याची उमेद राखावी ये विहित आहे मजला फार को (का) उतात उत्तर पाठवावे त्यासी कसे बोलावे ते निराळे पुरवणीस लिहावे हे विज्ञापना

---

लेखांक १२६ (रायरीकर)

श्री

दुर्जनसिंग याने सवस्थान मांडवी याजकडील वकील नजराणा घोडी व वस्त्रे घेऊन आले आहेत त्याची भेट होऊन विनंती करावयाची की सरकारातून सरंजाम राज्यास नाही व सालाबाद राज्यापासून घ्यावयाचाही धारा नाही ऐसे असतां स्वराज्याचा सिरस्ता असेल तो आम्हाकडे द्यावा म्हणून इंग्रेजाचे बोलणे राज्यासी आहे त्यास सिरस्ता सालाबादी नाही राज्याकडील सरदार पंनास स्वा-रानसी चाकरी सरकारात करावी आणि दरमाहा साडेसातसे रुपये सरकारातून पावावे त्याप्रो चाकरीस सिध्द आहो आज्ञा असावी व इंग्रेजास निवारण पत्राविसी आज्ञा असावी * मांडवीकर राजे याचे वकील येथे आले त्याजवरून मांडवीकर संस्थान दुर्जनसिंग राजेयाकडून

---

* निराळें अक्षर

लेखांक १२७ ( पेठे ) { शके १७३९ वैशाख व॥ ६
सन १८१७ मे ४ }

श्री

शेवेसी त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना सरकारांतून माझे जातीस व कुटुंब व पालखी व शागीर्दपेशा वगैरे बिलकुल बेगमीस दोन हजार रुपये सालीना नेमणूक केली आहे त्याप्रो साल मजकूर सन सबा अशर मयातेनचे पोताहून राजश्री जनार्दन कोंडदेव गाडगीळ पोतनीस याजकडून देविले ते रुपये दोन हजार चांदव (ड) भरून पावलो मिति वैशाख व॥ ६ सके १७३९ ईश्वरनाम संवत्सर सु॥ सबा अशर मयातेन शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना *

---

## पेशव्यांच्या रोजकीर्दीतील महत्त्वाचे उतारे

लेखांक १२८ सन १७५१ डिसेंबर ९

राजमंडळ रोजकीर्द सन छ ३१ मोहरम दफाते पत्रे कसबे गाधली पा॥ अमलनेर प्रां॥ खानदेश यास कौल दिल्हा की कसबे मजकूर दमाजी गायकवाड याणे लुटला त्यामुले गावाची खराबी जाहली याजकरिता तुम्ही हुजूर येऊन विनंती केली की निदान माफीला खंडणी केलीयास गावची लावणीसंचणी करून यावरून लावणीवर नजर देऊन जागीर व मोकासा व देखोल बाबती व सरदेशमुखी कुलबाबसुद्धा खंडणी रुपये तीन हजार ( ३००० ) करार केला असे सदरहू ऐवज जिकडून तिकडं वसूल देऊन सुखरूप राहणे जासती उपसर्ग लागणार नाही म्हणोन कौल लिहून दिला असे.

---

* सर्व हस्ताक्षर खुद्द त्रिंबकराव अमृतेश्वराचें. दुसऱ्या बाजीरावानें त्याचा सर्व सरंजाम सन १८०२ मध्यें वसईहून परत आल्यावर जप्त केला होता; कारण त्रिंबकराव अमृतेश्वर बाजीरावाच्या विरोधी पक्षांत सामील होऊन चिमाजी आप्पाकरितां साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें त्यानें आणिलीं. हें एक तात्कालिक कारण होय. पुढें त्रिंबकरावानें क्षमा वगैरे मागून जप्ती उठविण्याची विनंती केली, परंतु बाजीरावानें तें न ऐकतां त्यास फक्त वार्षिक दोन हजारांची नेमणूक करून दिली.

लेखांक १२९ सन १७५२ जून १४

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंतप्रधान सन इसने खमसेन मया अलफ छ ७ रबिलालावल जमा रुपये ४५।= बा येवज तर्फे बापूजी सिंदे पुणे कडून राजश्री त्रिंबक विश्वनाथ याणी येवज रवाना केला त्यास...दिल्ही होती त्याच्या खर्चास रु. ६० साठ फक्त होऊन दिल्हे होते त्यापैकी मार्गी खर्च जाहला रु. १४॥= त्याची यादी पुणेयास पाठविली बाकी शिलक राहिली तो ऐवज जमा—

१५०००० हा ऐवज तो बापूजी सिंदे पैकी याजकडे पुण्याहून राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यासी त्रिंबक रघुनाथ याजबरोबर येथून रवाना केला तो जमा असे.

---

लेखांक १३०

छ २१ जमादिलावल इसने चैत्र वा। नवमी

कमाविसबदल वेणूबाईने[1] कामाबद्दल पैठणास जासूद पाठविला असता तिजकडून रोजमुरा देविला असे

२० घोडेबा। दावलखान बारगीर घोडी रास ४ बा।

१४॥ हरभरे ०।=॥। १। दर ८॥॥

६।= बाजरी ०=॥। १ दर ४॥=

२०॥।= पैकी ५॥= जमा

४०० जिन्नसाबदल

३०० रास १०० दर ३

१०० सिगला बा।

४००

४२०

---

लेखांक १३१ सन १७५२

सन इसने खमसेन मौजे जलालपूर प्रांत नाशीक येथे साल मजकुरी मोगलाचा दंगा जाहाला व मौजेची खराबी जाहली रयत परागंदा जाहली असे तेव्हा स्वामीनी कृपाळू होऊन साल मजकुरी...पेस्तर सालापासून कौल

[1] ही त्रिंबकरावमामाची स्त्री

दिल्हा-र्यंत उमेदवार होऊन मौजे मजकूरची आबादानी करितील म्हणोन तुम्ही अर्ज केला त्यावरून मनास आणून पेस्तर आबादानीवर नजर देऊन पंचसालाईस्तव कुलबाव तनखा रुपये २२०० बावीसशे सा साले बीा।

सालमजकुरी ० सन आर्बा ४०० गुदस्ता ४०० स्लास खमसेन ४००
खमस खमसेन ८००+४०० साल गुदस्त साली = १२०० =२४००

---

३१३१।॰ बाबती प्रांत खानदेश नि॥ त्रिंबकराव विश्वनाथ याजकडून माघ वद्य पंचमीचा हप्ता येणे त्यापैकी विनायक दीक्षित याजकडून देविले नि॥ गोविंद हरी

---

## लेखांक १३२ सन १७५८

गणेश विश्वनाथ सरंजामी सरदार होते सु॥ सन समान सरंजाम पागा नि॥ गणेश विश्वनाथ दफाते पत्र छ १२

पैकी वजा साहोत्रा नि॥ पंतसचीव रु. ७१

११९० बाकी पाचवा हिस्सा

| | | |
|---|---|---|
| ११११ मोकासा ऐन | ७३१० ऐन बेरीज | |
| ७९ साहोत्रा | ११११ मोकासा | |
| ११९० | ८४२१ | |
| | एकूण ८५०० | |

---

## लेखांक १३३ सन १७५१ मे ४

राजमंडळ स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ सन इहिदे सरंजाम नि॥ त्रिंबकराव विश्वनाथ दफाते पत्रे छ २४ जमादिलाखर मशारनिलेचे तांदूळ वगैरे जिनस खेरीज फिर्गाण कोकणांतून खरेदी करून पुण्यास आणितील त्याचे जकातीविसी साल गुदस्ताप्रो साल मजकुरी दस्तक हरयेक घाटे आणितील त्यास आणून देणे दस्तके

१ प्रांतांतून तांदूळ खंडी ९ नऊ मीठ १ मण बैलसर १०० शंभर येविसी एक

१ बैल सर पन्नास तांदूळ खेपा सहा येविशी

२

---

लेखांक १३४ सन १७५१ जानेवारी २३

राजमंडळ स्वारी पंत प्रधान सु॥ सन इसने सरंजाम दफाते पत्रे नि॥ त्रिंबकराव विश्वनाथ कारकून छ ६ रावल खासा स्वारी किले बहुले ता। कानवई त्रिंबक विश्वनाथ याजकडे दिल्हा असे तरी मारनिल्हेकडील कारकून बालकृष्ण हरि याचे हवाली करून कबजा घेणे किल्यावरील लोक व हवालदार कारकून खाली उतरून किला याचे हवाली करणे किल्यावरील दारू गोला जमी सामान असेल ते असो देणे वरकड दाणा असेल तो उतरणे आणि किल्याचे हवाली करणे किल्याचा बंदोबस्त–

१ खंडो गणेश यांस किला स्वाधीन करणे म्हणोन १

१ बालकृष्ण केशव यास की पा। नासीक किल्याचे सरंजाम जे...ण्याचे हवाली करून किल्याचा खर्च लिहिणे म्हणोन १

१ हवालदार व कारकून किला मजकूरी यास किल्याचे स्वाधीन करून हुजुर येणे म्हणोन सनदा ३

५ पाच सनदा असेत रवानगी यादी

---

लेखांक १३५ सन १७६४ जून १४

राजमंडळ स्वारी पंतप्रधान सु॥ सन खमस सरंजाम त्रिंबक विश्वनाथ दफाते पत्रे छ १३ जिल्हेज अखेर राजश्री दादा (व) माधवराव विश्वनाथ उभयता बंधु येकत्र असोन सरकार सेवा उभयेता करीत असता...साल मजकुरी उभयता बंधूची विभक्तता जाहली तेव्हा तुम्ही माधवराव यास सदर सरंजामापैकीं तिजाई सरंजामाचा ऐवज इतलाख दरसाल देत जावा...............

---

लेखांक १३६ ता. २८ मे १७५९

राजमंडळ स्वारी पंतप्रधान वि॥ त्रिंबकराव विश्वनाथ माहे सवाल ता॥ १ रोज ज्येष्ट शु॥ २ इंदुवार (ता. २८ मे १७५९) मुकाम शाहूनगर नजीक किले सातारा सितैन मया व आलफ

दफाते पत्र—विठल आपाजी सुभेदार किले वंदनगड दि॥ राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यास सनद कीं किले मजकुरी गस्तीस व चौकीस पाहारे यास दोन मशालजी ठेवावयासी आज्ञा केली आसे तरी पेस्तर साल सन इहिदे सितैनपासून दोन मशालजी दरमहा दर आसामीस रुपये ५ प्रमाणे करार करून बारमाही चाकरी यास माही करून दीडमाही रोजमरा याप्रमाणे करार करून ठेवणे चाकरीस लागलियावरी हुजुरचा मशालजी आहे तो हुजुर पाठवून देणे त्यास तुम्हाकडोन आदा किले मजकुरीहून जाहला असेल तो लिहून पाठवून देणे म्हणोन सनद १

———

लेखांक १३७ ता. २ ऑक्टोबर १७५९

विठल आपाजी सुभेदार किले वंदनगड दि॥ त्रिंबकराव विश्वनाथ यास सनद कीं जदीप केला करार नि॥ गंगाजीराव खानविलकर याजकडून किले मजकुरी रवाना केले असेत असामी येकूण तैनात दरमाहे पैकी रोजमरा बीतपसील रुपये—

| दि॥ रंभाजी भोयकर | आग | अडाव | बा॥ | तैनात | रोजमरा |
|---|---|---|---|---|---|
| १ संताजी नाईक...तेकर ३५ | १ | १ | ० | १० | ७ |
| २ बाजी चवाण ३० | १ | १ | ० | १० | ७ |
| ३ जानोजी पवार बा॥ पेटकरी ३० | १ | १ | ० | १२ | ८ |
| ४ भिकाजी सिंदे २० | १ | ० | १ | ८॥ | ५॥। |
| ५ धोंडजी नाईक धामणकर २५ | १ | १ | ० | १० | ७ |
| कृष्णाजी नाईक नराठेकर १० | १ | १ | ० | ९ | ६ |

४

| दि॥ रंभाजी भोयकर | आग | अडाव | वा॥ | तैनात | रोजमरा |
|---|---|---|---|---|---|
| रामनाथ सोमनाथ आरवलकर २५ | १ | ० | १ | ९ | ६ |
| दि॥ गुणाजी घाग | | | | | |
| सोननाथ कल्याणकर ३५ | १ | १ | ० | १० | ७ |
| काननाम जोगनाथ ३५ | १ | १ | १ | १० | ७ |
| पानाम गंगनाथ सतीकर ३५ | १ | १ | ० | १० | ७ |
| बाबानाथ फटनाथ धामणकर ३५ | १ | ० | १ | १० | ७ |
| बाळनाम काननाथ जाहूरकर | १ | १ | ० | ९ | ६ |
| | १२ | ९ | ३ | ११७॥ | ८०॥। |

एकशे साडेसत्रा रुपयापैकी रोजमुरा पावणे येक यासी रुपयेची रवानगी केली असे किले मजकुरी तरी किल्यावर घेऊन हजेरी घेणे.

---

## लेखांक १३८

ता. २४ सेपटेंबर १७५९, शके १६८१ आश्विन शु॥ ३

दफाते पत्र—चिंतो कान्हो यास सनद कीं श्रीमहादेवी कैलासवासी शहाजी ( शाहू ? ) महाराजाच्या वृंदावनाची पूजा नंदादीप व नवेद्य नऊ दिवस नवरात्रांत सालाबादप्रो सालमजकुरी करावयासी तुम्हास आज्ञा करून सनद सादर केली असे तरी नव दिवस नवरात्रांत नंदादीप व नैवेद्य व पूजा दसरीयाचे दिवसी नैवेद्य पूजा करणे आणि खर्चाचा जो आकार होईल तो हुजूर लिहून पाठाविणें त्याप्रो सनद सादर होईल म्हणोन सनद—१

---

## लेखांक १३९

ता. २५ सेपटेंबर १७५९, शके १६८१ आश्विन शु॥ ४ भौमवासरे

जामदारखान्यापैकी खर्च आंख

देणे हुजरात खर्च श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब तसलमात आपाजी बाबूराव सनगे येकूण आंख

| | | | |
|---|---|---|---|
| २१७॥ | पाटाऊ जनानी | १५१८= | जामेवार किसपाफी फर्द नग ४ |
| १९६। | तिवटे जालनापुरी १५ | ११९॥– | धोत्र जोडे नागपुरी १५ जोड |
| ३५५॥ | सेले गोलदार बालापुरी ४ | २३८॥= | लुगडी नारायण पेठी १५ नग |
| २३ | मुगटा जनानी १ | ७० | शालू पैठणी साधा १ |
| | | २१॥।' | शालू नारायण पेठी १ |

एकूण रु. १४५८॥।≡

---

लेखांक १४०

रघोजी मोहिते हवालदार व कारकून किले सातारा यास सनद कीं किले मजकुरी श्री मंगलाईजवल नेहमी नवरात्रांत नव दिवस गोंधळी गोंधळ घालवात त्यास उलफा करोन आसामी एकूण पाच आकार वजनप्रो ८८=।।' कणिक ८८१।।।९ तांदूळ मोठे बारीक सडीक ८८।।९ दाल तुरीची ८८११।' तूप ८८१४।। गूळ येणेप्रो दररोज नवरात्रांत दसरापर्यंत सदरहूप्रो किले मजकुरीचे कोठीपैकीं देणे

---

लेखांक १४१ ता. २८ सेपटेंबर १७५९

देणे ५००० श्रीमंतर महाराज मातुश्री आईसाहेब याजकडे पोत्यास छ१ स हुजुरचे रोजमरीयाबद्दल ता। खंडोबा नाईक पोतदार रुपये

देणे हुजरात श्रीमंतर माहाराज मातुश्री आईसाहेब याजकडे ता। संताजी चव्हाण जामदार नग ४ रु. १८० सेले साधे ६४।।। एकूण रुपये २४४।।।

रघो(गो)जी मोहिते हवालदार व कारकून किले सातारा यास सनद कीं किले मजकुरी दसरीयास विड्यांची मोईन सालमजकुरी करार पाने हिरवी सुमार ४००० सुपारी ८८= कात ८८८ एकूण ८८२८८ सदरहूप्रो दसरीयाचे दिवशी किले मजकुरी लोकास विड्यास खर्च करणें म्हणोन सनद—१

देणे नजर श्रीमंतर माहाराज मातुश्री आईसाहेब याजकडे दसरीयाचे दिवशी नजरेबद्दल वि॥ राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ रु. १४॥ मोहोरनाणे १——

---

लेखांक १४२

ता. २१ ऑक्टोबर १७५९ कार्तिक शु॥ १ भानुवासरे मु॥ शाहूनगर

विठल आपाजी सुभेदार किले वंदनगड नि॥ त्रिंबकराव विश्वनाथ यास सनद की कासी खंडेराव कारकून दिमत हुजरात याची बटीक बनाय केसरी उमर वर्षे ३० हिजला किले मजकुरी रवाना केली आहे तरी हिजपासुन किले मजकूरचे कोठीस कामकाज घेऊन पोटास येक शेर दाणे दालसुद्धा देत जाणे आणि किल्याखालील येक घर ठेवून देणे म्हणोन सनद १--

---

लेखांक १४३

ता. १६ ऑक्टोबर १७५९ आश्विन व॥ ११ भौमवासर मु॥ शाहूनगर

श्रीमंत महाराज आईसाहेब यासी सन सलास खमसैनांत विनंती केली त्याजवरून श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब आम्हावर कृपाळू होऊन कैलासवासी शाहूमाहाराज यांची पत्रे आपणाजवळ होती ती मनास आणून त्याप्रो साहेबी आपली पत्रे भोगवटीयास करून दिल्ही आहेत ती स्वामींनी मनास आणून त्याप्रो सरकारांतून पेटा मजकुराचे चौधरकीचा अमल व मोकदमी अमल दरोबस्त करार करून देऊन चालविला पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणिता कृष्णाजी नाईक जोशी याजकडे पेटा मजकूरचा चौधरकीचा व मोकदमीचा अमल पेशजीपासून चालत आला असता दरम्यान तुझे बापाने व तुवा निमे अमल बलचे रेटाई करून नेत होतास तो हली दरोबस्त श्रीमंत मातोश्री आईसाहेब याणी.........सनद करून नाईक मारनिलेतर्फेने चौधरकीचा व मोकदमी अमल दरोबस्त गुमास्ता करील त्यास सुखरूप करून देणे.

---

लेखांक १४४

ता. २९ रोज वैशाख वा ३० भृगुवासरे शके १६८५ सुभागुमान (ता. १३ मे १७६३) कमाविस भेट बा मल्हारराव रुसून गेले त्यास आणावयास स्वारी गेले त्यास वस्त्रे पोशाक दिल्हे ते जमा सनगे येकूण रुपये

१५५ राजश्री राव यास
    ४५ तिवट, ६० जाफरखान, २५ किनखाप
    २५ जामेवार कलसपाकी १ एकूण ४
२०५ राजश्री दादास गुा जटलोजी कटका खिजमतगार
    ४० तिवट १ १०० दुपटा घुवट १ ३५ महमुदी जरी १
    ३० किसनराव १ एकूण ४
१०६ राजश्री सखाराम भगवंत यास गुा मल्हारी खिदमतगार
    ३० तिवट ६० जाफरखानी ८ गजनी
    ८ सेला साधा १ एकूण ४

रु. ४६६ एकूण १२

कमाविस भेट राजश्री सखाराम भगवंत यास बाा मल्हारजी होळकर रुसून गेले त्यास आणावयास गेले तेथें दिल्हे ते जमा
कडें सोन्याचें तोले १८॥१।~

---

## लेखांक १४५

ता. १९ सेप्टेंबर १७६३ शके १६८५ भाद्रपद शु॥ १३ छ ११ रबिलावल

त्र्यंकटराव नारायण यास पत्र कीं आणाजी तमाजी याची आसामी तुम्हाकडील तालुक्यात होती ते सन इसनेत राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ याणी दूर केली होती ते हली करार करून सनद सादर केली असे तर याजपासून हरयेक कामकाज घेऊन वेतन पेशजी प्रा पावत होते त्यापैकी निमे करार केले असे तरी निमे वेतन पाववीत जाणे म्हणोन सनद—१

---

## लेखांक १४६

ता. २२ मे १७६५ छ १ जिल्हेज सन सीत सितेन
१०० इंद्रपुरी गोसावी याची वस्त्रभाव चोरीस गेली त्याची मुदा कादर बोहरी पेठ रविवार याजकडे लागला त्यास बोहरी मजकूरी

पालोन गेला त्याचे दुकान सरकारांत जप्त केले होते त्या दुका-
नाचा माल नावेसी गोसावी मजकुरास दिविला सा सरकारची
नजर करार केली ते जमा गुा त्रिंबक विश्वनाथ नि॥
फरासखाना रुपये

---

लेखांक १४७

ता. ३० सेपटेंबर १७६५ ता. १४ रोज आश्विन वद्य १ इंदुवासरे शके १६८७
कमाविस भेट राजश्री राव यासी गुा तुकोजी चिंचवडा
खिदमतगार सनगे सुमार येकूण रुपये

३४० हा राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांचे घरी भोजनास
गेले ते समई वस्त्रे दिल्ही ती जमा
७५ तिवटे पैठणी १ १५० जाफरखानी सेला १
४० झगा छिटी बऱ्हाणपुरी १ ७५ तुंबकी किनखापी १

रु. ३४० एकूण सनगे ४

---

लेखांक १४८

ता. ५ डिसेंबर १७६६ छ २ मार्गशीर्ष शुा ३ भृगुवासर शके १६८८

सिवाजी बलाल याचे नावे सनद की बाबूराव गणेश पेठे
यास माताहार पुरियानजीक घर बांधावयास जागा हात सुमार
६० लांबी हात ४० रुंदी हात येकून शंभर हात जागा घरास
दिली असे तरी मारनिलेनी घर बांधिल्यास सदरहूप्रो जागा
देणे म्हणून सनद १

---

गणेश हरी पेठे मजमदार-खमस-खर्च बद्दल मुशाहिरा कारकून
नि॥ गणेश हरि पेठ्ये-तालुके रत्नागिरी नि ॥ मोराजी सिंदे पैकी
आदा औषधाबद्दल मध वजन ८८७॥।=

---

**लेखांक १४९** सन १७६६ डिसेंबर २०

राजमंडल स्वारी राजश्री पंतप्रधान सन सबैन सरंजाम त्रिंबक विश्वनाथ दफाते पत्रे छ ७ रजब सदाशिव गणेश पेठे निा त्रिंबक विश्वनाथ यास तालुके काबनई येथील हशमाची फडनिशी सांगोन वेतन म्हणून रुपये १२५ सवाशे करार करून पाठविले असेत तरी याजपासून तालुके मजकुरचे हाशमचे फडणिशीचे काम करून घेऊन सदरहू सवाशे रुपये पावीत जाणे म्हणोन खंडो गणेश यासी सनद १

सन १७६६

सरंजाम बाबूराव गणेश याजकडे मौजे समनेर प्रांत नासीक हा गाव पेशजीपासून आहे त्यास तुम्हास प्रांत मजकूरची जत्फीची आज्ञा केली होती याजकरिता हे पत्र सादर केले आहे तरी मौजे मजकूर खुदामत सरकारचे सनदे-प्रमाणे मारानिलेकडे चालावणे नवीन उपसर्ग न करणे.

---

**लेखांक १५०** सन १७६१ मार्च ११

इसने सरंजाम माधवराव बल्लाळ पेठे दफाते पत्रे छ ३ साबान मारनिले यानी विदित केले की मौजे जांब पा वण येथे मुकासा बाबती राजपत्नी इनाम आहे येविसी श्रीमंत कैलासवासी रावसाहेब व कान्होजी भोसले याची पत्रे आहेत व सरदेशमुखी कैलासवासी रावसाहेब याणी देऊन पत्रे करून दिल्ही एकूण मोकासा व बाबती सरदेशमुखी श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांचे वेळेपावेतो चालत आले अलीकडे गडबडीमुळे बाबती सरदेशमुखी चालत नाही येविसी ताकीद देऊन पेशजीची पत्रे पाहून सदरहू तिन्ही अमल आपलेकडे चालते करावे म्हणोन त्याजपासून हे पत्र सादर केले असे तरी तीर्थरूप कैलासवासी नानासाहेबाचे वेळेस सरदेशमुखी व बाबतीचा अमल मारानिलेकडे चालत आल्यापो चालविणे म्हणोन चिटणिशी पत्रे

---

**लेखांक १५१** सन १७७५ ऑक्टोबर २१

छ २७ साबान सीत सबैन विश्वासराव त्रिंबककडे विसापुरची सबनिसी आहे त्याजकडून रसद तुम्ही मागू नये म्हणून रामराव नारायण याचे नावे सनद १

---

लेखांक १५२ सन १७७५ डिसेंबर

रमजान सरकार विजयागड येथील फडनिशी पेशजी त्रिंबकराव विश्वनाथ याजकडे सांगोन तैनात सालीना पाचशे रुपये करार केला होता ; त्याप्रो हाली विश्वासराव त्रिंबक यास सांगोन तैनात सालीना रुपये पाचशे करार केले असेत तरी सरकार मजकूर येथील फडणिशीचे काम मारानिलेकडे कारकून याचे हाते घेऊन सदरहू प्रो तैनात पावत जाणे म्हणोन तुकोजी होळकर यास सनद १

---

लेखांक १५३ सन १७८१ ऑगस्ट १४

इसने जमासाल छ २३ साबान श्रावण मास अमृतराव विश्वनाथ याचे नावे सनद की कृष्णराव त्रिंबक याजकडे सरंजामास गाव होते त्यास ते मृत्य पावले सबब त्यांचे गांव तुम्हाकडे सरंजामास करार करून देऊन त्याचे ऐवजी तुम्हाकडील सरंजामी बोटवद माहाल सरकारांत ठेऊन त्याची कमाविस मोरो गंगाधर यांचेकडे सांगितली आहे

---

लेखांक १५४

श्री

यादी मातुश्री अन्नपूर्णाबाई कोम माधवराव मोरेश्वर पेठे याजकडे पहिलेपासून मौजे भांब्रवडे ता। हवेली प्रांत पुणे हा गाव इनाम होता तो सरकारांत ठेवून त्याचे मोबदला मौजे पिंपळगांव ता। माहाळुंगे प्रांत जुन्नर व मौजे वणजारवाडी प्रांत नासीक हे दोन गाव अन्नवस्त्राचे बेगमीस दिल्हे असे

---

लेखांक १५५ सन १७६९ डिसेंबर २७

तेरीख २८ रोज मार्गशीर्ष बा। अमावास्या शके १६९१ विरोधीनाम संवत्सरे त्रिंबकराव विश्वनाथ कारकून याणी जवानखान बाके याजपासून बाजारांत उंट १ एकूण किंमत ३०० तीनसे रुपयास खरीदी केला आहे त्याचे जकातीचा आकार होईल तो याचे नावे खर्च लिहिणे म्हणोन रामाजी कासी कामादार जकात बाजार लष्कर याचे नावे सनद १

---

## लेखांक १५६

ता. १९ मे १७७० शके १६९२ वैशाख व॥ ९ मंदवासर

व॥ देणें बलवंतराव महादेव यास ता॥ सिरे येथील दिवाणगिरी सांगोन नवे आस्फागीर करार करून दिल्ही असे अस्फागीरीचे सामानाबद्दल रुपये २५ तालुके सिरे नि॥ महिमाजी शिंदे याजकडून देविले एक साला आड द्यावयाचे करार करून तुर्त देविले

दिमत तोफखान्याकडे बेगमीस जिन्नस वजन—

८॥. सोरा ८॥ गंधक ८॥ मेण १ काथा येकूण १८१॥. तोफाचे गोले सुमारे १ सातशेरी १ पाचसेरी एकूण २ दोन गोल्याचे प्रतीचे गोले असतील ते देणे—कलम १ एक खंडी दीड मण जिनसाचे प्रयोजन आहे तरी सदरहू प्रा॥ जितका जिन्नस असे तो देणे—कलम १

येकूण दोन कलमाचा जिन्नस आणावयासी कारखान्याकडील कारकून बैल घेऊन येईल त्याचे पदरी घालोन रवाना करणे म्हणोन महिमाजी शिंदे तालुके सिरे यास सनद १

महिमाजी सिंदे यास सनद कीं किले सिरे मजकूर येथे तोफखान्यापैकी तोफाचे गोले ठेवावयासी पाठविले आहेत गोले सुमार

३०० दीडशेरी + ७५४ दीडशेरी एकूण १०५४

एकूण दहाशे चोपन गोले पाठविले असेत तरी सदरहू गोले वजन करून सुमारी भरतील ते घेऊन किले मजकुराचे कोठीस जमा करणे म्हणोन मारानिले यास —सनद १

---

## लेखांक १५७

सन १७७० ऑक्टोबर २४

राजमंडळ रोजकीर्द स्वारी पंतप्रधान इहिदे वि॥ राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ माहे रजब तेरीख रोज कार्तिक शु॥ षष्ठी शके १६९२ विकृतिनाम संवछरे किले गुरामकोंडा—रुपये सिलक बंद पोते इहिदे सबैन मया व अलफ

३१६३।= शिलक

१६९ जमा मजकूर

मियन फरास दि॥ फरासखाना गुरमकोंडावरील जखमी बरा जाला पाणी घेतले साहा जखमेची वस्त्रे रा॥ यादी चिठी छ मजकूर

बतलापूर येथील नायर किले गुरमकोंडा येथे मीर रजा अलीखान याच्या वंदांत होते त्यास सोडून निरोप दिल्हा समई वस्त्रे सदरेस सनगे येकूण आख ८०॥

दि॥ मीर रेजाअलीखान याजकडील लोक गुरमकोंड्यांत होते त्यास निरोपाची वस्त्रे सदरेस सनगे ऐकूण आख ३२३॥

---

## लेखांक १५८

ता॥ ६ रोज कार्तिक शुद्ध ७ सह अष्टमी शके १६९२ गुरामकोंडा (ता. १६–१०–१७७०)

१ गुरामकोंड्याच्या पेठेतील पूर्वेकडील दरवाजाची सरनोबत सांगितली हैबतराव नलावडा ता॥ आपाजी कोंडदेव खिजमतगार

२ विभूतराव याचे नावे सनद गुराम कोंड्याच्या मोर्च्यात आपले प्यादे ९० चाकरीस होते त्याबद्दल पोटखर्च ७०० रु. देविला असे

---

## लेखांक १५९

ता. ३०–१०–१७७०

(१) रुपये वीस धर्मादाय खर्च गुरामकोंडा येथून कूच केले ते दिवशी प्रस्थान समई रूबरू दिले

(२) बाळोजी कदम यास किले गुरामकोंड्याची सरनोबती सांगितली

(३) बाजी रघुनाथ नामजाद सा॥ गुरामकोंडा वगैरे प्रांत कडपे यास सनद की किले गुरामकोंडा येथे कलविले की बंदोबस्ताकरिता नेमणूक केली

१ सिके मोर्तब सिवाय काम चालणार नाही तुम्ही आपले नावे मोर्तब करणे

१ श्री नरसिंह देव येसी नैवेद्य व नंदादीपाचे साहित्य पेशजी सरकारतर्फे

१ सैदापूर व मौजे पपलकुट हे गावातील गावकरी यास किले मजकुरी आणून कौल देऊन गावाची लावणी करणे वसूल होईल तो सरकारी हिशोबी जमा करणे

---

### लेखांक १६०

ता. ३१–१०–१७७० कार्तिक शु॥ १२

खिलकबंद ८५९११।= + जमा १३६५१३=१४५१०४।= एकूण जमा ४५०००१ दुबेर्जी खासा स्वारींपैकी भवानजी वाघ याजबरोबर

नक्त चार लक्ष पनास हजार एक रुपये पाठविले त्याचे माफ गु॥ बालोजी काव्या जामदार व रावजी नारायण मजमदार पागा दि॥ भवानजी वाघ—रु.

५४९८३१॥. ऐन मोजदाद
१६९॥. कमी मोजदाद

४५०००१

सदरहू पारख गु॥ अेकनाथ नाईक दि॥ पोतदार—

७१० तलेगावी ४३३०१४॥ चांगले ७८२६ भिलवाडा ७६२२ नीलकंठी ४५८ होलकरी ९४ नागपुरी १८ हुकेरी २८ फुटके ५९ तांब्याचे १६९॥ कमी पैकी जमा धरिले चांगला ऐवज

छ १ छ २४
१००००० + २५०००० = ३५००००
३६०५९।= हरजी सेट (गा) जामदार पैकी खर्च जमा नाणे येकूण
३५२॥= कमाविसी वर्तीला खर्च मुले जमा नाणे

१४५१०४।=

---

### लेखांक १६१

ता. १ नोव्हेंबर १७७० कार्तिक शु॥ १३

पांडुरंग गोविंद यास किले गुरामकोंडा येथील कारखानिसी सांगितली

ता. ४ नोव्हेंबर १७७० कार्तिक व॥ १

गणेश महादेव नि॥ जिवाजी बलाल गुरामकोंड्याचे कोतवालीचे काम सांगितले

ता. ८ नोव्हेंबर १७७०

व्यंकटेश दर्शन खर्च रुपये ८०६ वस्त्रे वगैरे +५७८||= रुपये वस्त्रे वगैरे=१४१०|| एकूण रुपये

ता. ७ नोव्हेंबर १७७०

सखाराम हरी याजबरोबर पथके देऊन चिकबाळापुरास पाठविले होते त्यास रोजमुरे आठवडे व दीडमाहीबरोबर पागेचे चंदी-वा। येवज मारनिलेचे तसलमातीस दिल्हा होता ते जमा रुपये २६४०२

---

## लेखांक १६२

ता. १९-११-१७७०

संताजीराव ढमाले यास किले गुरामकोंडा येथील सरनाईकी सांगितली

ता. २४-११-१५७०

स्वारी पंतप्रधान सन इहिदे वि॥ राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ छ ६ साबान दफाते पत्रे-

गोपाळराव गोविंद याचे नावे सनद की तुम्हाकडे तोफ-खान्याकडील तोफा व लोक सरंजामसुद्धा पाठविला आहेत त्यास तोफेबरोबर लोक आहेत त्यास रोजमरा दीडमाही येकमाही मिलोन असामी १३९ एकूण रोजमरा रुपये १०८२||| येक हजार पावणे त्र्यायसी रुपये व कारेगार व कामाठी यास अडसेरी व पीठ-पैसा याचा जाबता अलाहिदा पाठविला आहे त्याप्रा। लोकांची हेजेरी घेऊन आसामीस जाबत्या.त लिहिल्याप्रा। रोजमरा व अडसेरी पीठ-पैसा देत जाणे.

ता २६-६-१७७० माहे इहिदे सबैन छ २ रावल

प्रांत कोलार सरकार सिरे येथील ठाणी सरकारात घेऊन सालमजकुरापासून तुम्हास कमावीस सागोन सालगुदस्ता हैदर अलीखान याचे अमली मुलकाची जमाबंदी ठरावून त्याप्रा। वैशाख फलाची ऐवज त्यानी कांही वसूल घेऊन रयेतीलकडे बाकी राहिली आहे त्याचा करार...कृष्णाजी चंदी व होनो गिरमाजी कादर प्रांत कोलार यासी सनद १

ता. २६-६-१७७०

कृष्णाजी गोविंद कमाविसदार गुरामकोंडा यासी कमाविसी सांगितली.

---

लेखांक १६३

ता. १६ एप्रिल १७७१ शके १६९३ चैत्र शु॥ १ मु॥ कालगरे नजीक श्रीरंगपटण

जमा दुबेर्जी कापड पुण्याहून बालाजी जनार्दन फडणीस यानी भिकाजी केशव कारकून सिलेदार व धोंडजी कांबला जामदार बा। ते जमा...

सनगे १५८४०॥ येकूण आंख ३१७६९९॥ जमा

६६१११॥।≈ तिवटे सनगे ३४७६ आख मोजदाद ६६११६।≈

| | | |
|---|---|---|
| ४४४०८८– | जाफरखानी मोजदाद | ४४४०८॥– |
| ६८०७५८= | सेलनाटे | ६५७० |
| ९३१२ | पासोड्या ताडपत्री | २२० |
| ८५६४॥।= | धोत्र जोडे | ३०० |
| २००९० | गजन्या मोजदाद २००९१८– सनगे | ७९८ |
| ९०६४॥ | किनखापे सनगे | १०१ |
| १४१८ | पीतांबर मर्दानी | १० |
| १४४९४। | शाला | २४० |
| ३८० | सुशा ऐरंगनब्रया | १६ |
| १००० | ताफे कद | १०० |
| २९९॥। | पातळे साधी | ९ |
| ७८४। | चिटे जनानी हगपुरी | २७ |
| १०९४। | तिवटे कलसपाकी | १९ |
| ९८॥ | सेले कलसपाकी | ३ |
| ११५ | पातल कलसपाकी | १ |
| १८३ | जामेवार कलसपाकी | २५ |
| १४२९॥। | खाद याप्रा | ५५७॥. |
| ११० | छिटे नीच | ५५ |
| रु. ३१७६९३॥।. | | १५८४०॥ |

---

ता. ७ मार्च १७७१

कमावीस नजर खाशास छ १९ जिल्कादी हैदरनाईक याचे लढाईत जखम जाहली होती जखमेचे पाणी घेतले सा। वस्त्रे दिल्ही ती ( या पुढें त्रिंबकरावमामांस अनेकांनीं वस्त्रे दिलीं त्याचा तपशील आहे. )

---

लेखांक १६४

ता. १९ मार्च १७७१ शके १६९३ चैत्र शु॥ ३ सोमवार कलगटे नजीक श्रीरंगपटण

महिमाजी सिंदे ता॥ सिरे यांचे नावे सनद की किले मिडगिसी येथें मोर्चे लाविले आहेत त्यास तेथे तोफा पाहिजेत येैशास लष्करांतून तोफा तुम्हाकडे सिऱ्यास पाठविल्या आहेत त्याप्रो लक्ष्मण बलाल याजकडे दोन तोफा थोर बिडी दारु गोळी सरंजामसुद्धा व गोलंदाज व तोफांचे बैल मारनिलेकडील कारकून व प्यादे येतील त्याचे हवाली करून तुम्ही आपलेकडील दरोबस्त राऊत देऊन किले मिडगिसी येथे पोहोचऊन देणे म्हणोन सनद १

---

लेखांक १६५

ता. ६ मे १७७१ शके १६९३ वैशाख वा॥ ६ रविवार चेनरायपेटण

महिमाजी सिंदे यास सनद की भगवंतराव श्रीनिवास कानगो सरकार सिरे वगैरे याणी हुजूर येऊन विनंती केली की कृष्णाजी शेषो आपले गुमास्ते हे नायबीविसी कज्या सांगोन हिशेब द्यावयाची खलेल करून आम्हासी येथास्थित वर्तेनात याजकरिता वाजवी मनास आणून मारनिलेकडून नायबी दूर करून त्याचे हातचा कागद लिहून घेऊन आपण यास देविला पाहिजे म्हणोन त्यावरून उभयतांचे वर्तमान मनास आणोन कृष्णाजी शेषो याची नायबी दूर करून त्याचे हातचा कागद कानगोस देविला सा॥ याजकडे सरकारची नजर रुपये ११०० करार करून येवजाचा वसूल तुम्हाकडे येक महिन्याचे मुदतीने देविला असे तरी पो॥ सिरे येथील रूसुमाचा ऐवज सरकारात वसूल होऊन मग मारनिलेस पावतो त्या पेशजीचे नजरेचा ऐवज दोन वर्षांत सरकारात रुसुमाप्रो घेतला बाकी राहिली नाही असे कानगो म्हणतात त्यास मागील नजरेचा यैवज वसूल जाला असल्यास हालीचे नजरेबाबत अकराशे रुपये रुसमाप्रो घेऊन सरकार हिशेबी जमा करणें—

---

लेखांक १६६

ता. ७ मे १७७१ शके १६९३ वैशाख वद्य ७ सोमवार

कृष्णराव त्रिंबक यास सरकार गुरामकोंडा वगैरे प्रांत कडपे येथील मजमु सांगितली आहे त्यास मारनिलेचे तर्फेने विनायक महादेव कारकून पा आहेत तरी याचे हातून सरकार मजकूरचे मजमूचे लिहिण्याचे कामकाज घेत जाणे व आफदागिराचे सामानाबा येक साल आड द्यावे ते साल मजकुराचे रुपये ३० देविले असेत पावते करणे म्हणोन बाजी रघुनाथ नामजाद सरकार मजकूर यास सनद १

---

लेखांक १६७

ता. १७ मे १७७१; शके १६९३ ज्येष्ठ शु॥ ३

अजरीनवस चिदानंदाश्रम संन्यासी श्रीरंगपट्टण प्रांती होते त्यांची भेट जाहली बहुत थोर तपस्वी यास चातुर्मास्यात येकत्र वास केला पाहिजे येविसी बहुतप्रकारे प्रार्थना केली त्यास स्थल त्याचे चितास येता नामदगिरीचे पेठेत श्रीमलेश्वर देवस्थानाजवल मठ स्वामीचा आहे तेथे निवास करतील त्यास ज्येष्ठ बहुल प्रतिपदेपासून दररोज ०८=॥ तांदूळ ०८=॥ कणीक ०८॥ दाल तुरीची अगर मुगाची ०८।· तूप येकूण सहा शेर वजनाचे दररोज देत जाणे किरकोळ शाकभाजी पानपत्रावळी चिंच मीठ वगैरे जे जे कोणे केविशी स्वामी करितील त्याप्रो साहित्य करून दोन तीन दिवसाआड तम्ही दर्शनाला जाऊन ज्या गोष्टीनें स्वामीचे चित्त प्रसन्न राहील आणि संतोषपूर्वक चातुर्मास्य समाप्त होईपर्येत स्वामी सुखे करून प्रसन्न होत तो प्रकार जरूर जरूर करणें

---

लेखांक १६८

ता. २६ मे १७७१; शके १६९३ ज्येष्ठ शु॥ १३

( १ ) हणमंतराव नारायण यास हायपाईन घाट पो चिकबाळापूर येथील कमाविसी साल मजकुरापासून चौसाल सांगोन करार करून मारनिलेचे नावे सनद लिहून दिल्ही आहे त्यास सा॥ मजकूरचा ऐवज तुम्हाकडे वसूल देविला

असे तरी सिबंदी वगैरे नेमणूक सालीना करून दिल्ही आहे त्याप्रा। हिसेरसीनि ऐवज वजा करून बाकी ऐवज दरसाल हसेबंदी हा। वसूल घेऊन सरकार हिसेबी जमा करणे व मौजे मणीवल आग्रहार हा गाव ब्राम्हणाकडे इनाम पूर्वीपासून आहे त्याप्रा। करार धरून अलाहिदा सनद करून दिल्ही आहे

( २ ) १००००० कर्ज गु॥ बाळाजी नाईक भिडे याजपासून लष्करात ऐवज घेऊन पुणियास येका महिन्याने बंदी मुदत ज्येष्ठ व॥ ५ स द्यावे पुढे राहिले तरी व्याज एकोत्राप्रा। सरकार सिरस्त्याप्रा। द्यावे येणेप्रा। करार केला

---

## लेखांक १६९

ता. ७ जानेवारी १७७२ शके १६९३ पौष शु॥ ३ भौमवार
मु. वारेपली पा। कावेरीपाक

कृष्णराव बलवंत छ १ ते छ १० टिपुमियाची शालभाचे ( सालेमचे ) बारीत गाठ पडोन छ २७ रमजानी लढाई जाली तेथील जखमीयांस खर्चास रुपये

३० पोतेसिंग बारगीर ४५ नि॥ सखाराम हरि २५ हैबतराव पणदरकर ४० खंडोजी काळे वगैरे

ता. १० जानेवारी १७७२ शके १६९६ पौष शु॥ ५

बापूजी सिंदे प्रांत सिरे यांचे नावे सनद की तोफखान्याकडे तोफांचे गोले नवे तयार करावयाविशी तुम्हास पेशजी आज्ञा जाली होती त्याप्रा। गोले तयार केले असतील त्याप्रा। कारखान्याकडे गोले तोफांचे लोखंडी सुमार

| | |
|---|---|
| १२१६ | ९ शेरी नेमणुकेप्रा। |
| २०८ | ५ शेरी नेमणुकेप्रा। |
| ९०० | अडीच शेरी पावणे तीनसे नेमणुकेप्रा। |
| २३२४ | येकूण दोन हजार तीनशे चाळीस गोले देविले असेत तरी सदरहूप्रा। गोले कारखान्याकडे पत्र पावताच पावते करून पावलियाचे कबज घेणे |

याखेरीज सरकारात पन्नास खंडी दारूचे प्रयोजन आहे त्याप्रा। किले गरुडागिरी येथून सिरे यास दारू आली असेल तीस पूट देऊन तयार करणे बाकी पन्नास खंडीचे भरतीस दारू पाहिजे त्यास दारूचा कारखाना घालून नवी दारू तयार करणे म्हणोन सनद १

---

## लेखांक १७०

ता. १९-१-१७७२

तोफखाना कारखान्याकडील लोक हुसकोट्यात आहे त्यास रोजमरा अडसेरी

| | | |
|---|---|---|
| २१८॥ | दीडमाही आगथस रोजमरा आसामी | १८ |
| ६१० | येकमाही रोजमरा आसामी | ८० |
| रु. ८२८॥ | | ९८ |

सुतार २
लोहार २
४

| सिरस्त्याप्रो। आसामीस गहू | कैली वजन | तूप | मीठ | पीठ |
|---|---|---|---|---|
| ८८१ | | ८८॥। | ८॥ | ८॥= |

| कणीक | दालमूग | सुपारी | पाने विड्याची | तमाखू |
|---|---|---|---|---|
| ८८४ | ८८१ | ८८। | (लोहार सुतार) १५० ३०० | ८८। |

---

## लेखांक १७१

ता. ५ सेपटेंबर १७७१ शके १६९३ श्रावण व॥ ११

जानराव धुळप यास जातीस सालीना मोईन आठ हजार आहे त्यापैकी आरमारचा...चकरा जाहाला ते समई सदरहू तैनातपैकी सरकारांत पाच हजार रुपये घेऊन बाकी तीन हजार रुपये घेऊन जावे याप्रो करार आहे त्यास मारनिलेस कर्नाटकप्रांती राहून दोन वर्षे जाली व मागील एक साल मोइनीचा ऐवज पावला नाहीं सा। तिसाला मोईन पैकी तुर्त रुपये ४०००+१०००=५००० मारनिले याणी माहाली तसलमातीस ऐवज घेऊन कर्ज केले आहे अजमासे देशास जातात सबब वाटखर्च वगैरे मिळोन अजमासे रुपये एकंदर पाच हजार देविले असे तरी सदरहू रुपये चिकबालापुरपैकी मारनिलेचे नावे खर्च लिहिणे.

१ सखाराम हरी सिलेदार याणी बाजारांत उंट नफर १ येकूण किंमत तीनशे चालीस रुपयास खरीदी केला ता. २७-११-१७७१ रोजी

२ माधवराव रामचंद्र याणी घोडा रास १ किंमत रुपये ३६० विकत घेतला.

३ मदकेरी नाईक सा। चित्रदुर्ग याणी (ता. २७-६-१७७२) हणमंतराव ढमढेरे याजकडून हती नग १ किंमत साडेचार हजार रुपयास विकत घेतला.

---

## लेखांक १७२

शके १६९४ श्रावण व॥ ६ सौम्यवार (ता. १९ ऑगस्ट १७७२)

बाजी रघुनाथ नामजाद सरकार गुरामकोंडा वगैरे प्रांत कडपे याचे नावे सनद तालुके मजकूर येथील मामलत तुम्हास सन इहिदे सबैनात सांगोन रोजमरा दुमाही मात्र पेशजी चालत होता त्याप्रमाणे दीडसे रुपये नेमून दिल्हा होता मातबर काम सांगितले स्वरूपाप्रमाणे तैनात असावी ते केली नाहीं त्यास तुम्ही दोन साले श्रमसाहास करून सेवा येकनिष्ठपणे केली व पुढे यानतदारीने वर्तणूक करावी सबब सालमजकुरी अवलसालापासून तैनात

| | | |
|---|---|---|
| ३३०० | जातीस | आंख १००० |
| २०० | दिवसा आरकागिरा व पोर्गे व चवरीबारदार मिळोन | सदरहू प्रा॥ नक्त कापड आख तालुके मजकूर येथील ऐवजी घेत जाणे. |
| रु. ३५०० | | |

---

## लेखांक १७३

शके १६९४ भाद्रपद शु॥ ३
सन १७७२ ऑगस्ट ३१

शके १६९४ भाद्रपद शुद्ध ३ दि॥ हिंदुराव घोरपडे सेनापति यास निरोप समयी सदरेस दागिने.

१ माळ मोत्याची किं. रु. १५१६ शंभर दाणे

१ जेगा घाट साधा भेट ह॥ महमदआली खान अरकाट

१ सिवराम घोरपडे यास पदक घाट साधा भेट ह॥ महमद अलीखान खान अरकाट छ १७ रजब सबैन किंमत ३५०

छ २१ राबिलावल
४२ हिरकण्या
२६ माणिक १० चुण्या १६
२ मो. कलम खडे
८ दाऊस चुणी बारीक
७८ किंमत सुमार ३७५

१ खंडेराव घोरपडे यास कंठी सोन्याची दुहेरी अष्टपैलू हा। किलेदार देवरायदुर्ग वा। त्रिंबक विश्वनाथ किंमत रुपये ३००

१ अबदुल हकीमखान सावनुरकर याचे पुत्रास निरोपसमयी शिरपेच हा। भेट नवाब महमद आली खान अरकाटकर घाट मिनेगार फुलाचा फुलेसुद्धा किंमत रुपये ३५०

१ रणदुलाखान कर्नूल यास निरोपसमयी सिरपेच घाट साधा हा। नबाब महंमदअली आरकाटकर छ १७ रजब हा। त्रिंबकराव विश्वनाथ किंमत रुपये ३००

दि। हैदरखान यास खंडणीचा बहुमानाची वस्त्रे पाठविली त्याबरोबर ता। आपाजीराम वकील दि। मजकूर रुबरूपासून दागिने

१ खासा हदैरखान यास. सिरपेच घाट साधा भेट हा। नबाब महमद अलीखान रुजु मदेगिरी नाईक संस्थान चित्रदुर्ग छ १ किंमत रुपये ४५०

१ टिपुमिया पुत्र यास जेगा घाट मिनेगार हा। गंगाधर यशवंत खासा स्वारी पैकी किमत रुपये २००

१ त्रिंबक विश्वनाथ कारकून यास लोलकयाचे मणी थोर रवाना गु॥ जीवबा नाईक शाहाडे पाचमणी १ येत किंमत रुपये २३०

१ मनहर चिंतामण कारकून सिलेदार यास निरोप समयी सदरेस चौरी दांडी रुपयाची वजन तोले १५

१ आनंदराव घोरपडे दि। दौलतराव घोरपडे यास निरोप देते समयी सदरेस कंठी मोत्याची दुहेरी रवाना गु॥ जिवबा नाईक शाहाडे कंठी किंमत रुपये १०७३८-

१ आपाजी गोविंद कारकून पागा दि। महिपतराव विश्वनाथ बिनी यास छावणीत दोन वर्षे स्वारीबरोबर चाकरी चांगली केली बक्षीस चौकडा खरेदी गु॥ जिवबा नाईक शाहाडे चौकडा एक १ मोती दाणे ४ किंमत ६६८।≤ सोने वजन ताळा येक १

सांडणी स्वारांस बक्षिसे ४२१ रु. आसामी १२ मुख्य कासम हस्ते सोन्याचे कड्या ॥ २५० तिचास रु. २५ बाकीच्यास ८ जणास रु. १२ प्रमाणे

———

लेखांक १७४

{शके १६९४ भाद्रपद शु॥ १४
सन १७७२ सेपटेंबर १०

शके १६९४ भाद्रपद शु॥ १४ गुरुवार मुक्काम मौजे थेऊर प्रांत पुणे त्रिंबकराव विश्वनाथ यास खाशा भेटीचे समई रुबरू पाहून दिले (श्रीमंता द्यावयास ) शालफर्द ऐकूण आंख

१. ३८७॥ राजश्री राव १९३॥' + १९३॥' = ३७८॥ दोन २
२. ३१५ राजश्री नारायणराव यास १८७॥+१८७॥= ३१५दोन २
३. ३५० राजश्री दादास १७५ + १७५ = ३५० दोन २
४. २८० मातोश्री गोपिकाबाई गंगापुरास पाठविले शालफर्द
१४० + १४० = २८० दोन २

एकूण रुपये १३९२॥' एकूण नग ८

धर्मदाय श्रीधरणीधर देव वास्तव्य चिंचवड रुबरू पाहून दिल्हे शालफर्द २ रुपये १६६ प्रमाणें आंख ३३२

---

त्रिंबकराव विश्वनाथ यास मोईनप्रमाणें रुबरू पाहून घेतली सनगे अेकूण आख

| | |
|---|---|
| ११९० शालफर्द येकूण नग ६ | १६२॥ + १६२॥ = दोन २ नग |
| ॥।' शेला साधा | २२० + २२० = दोन २ नग |
| ३७५ किनखाप १ | २१२॥ + २१२॥ = दोन २ नग |
| १५६५॥।' | १५६५॥।' ६ नग |

---

प्रोख्त खर्च आपाजी गोविंद कारकून पागा दि॥ महिपतराव विश्वासराव बिनी यानी त्रिंबकराव विश्वनाथ यास जखमेची वस्त्रे द्यावयाबद्दल घेतली त्या आखाचे निमे नख्त धरून प्रोख्त खर्च घातले ता॥ खुद्द सनगे येकूण आख २४० रु. ४० तिवटे १ २०० जाफरखानी १ = २४० रु. + १८ जामेवार जरीचा = २५८ रुपये

---

प्रोख्त आनंदराव गोपाळ दि॥ माधवराव नीलकंठ याणी छावणींत सनगे घेतली ती उगविली नाहीत प्रोख्त खर्च घातली ता। चिंतो आनंदराव कारकून सनगे निमे नख्त धरून आंख २४० जाफरखानी २ नग ४२॥। शेले जोड २ नग ७८ शालफर्द १ एकूण ३६०॥।'

---

लेखांक १७५

कमावीस लूट हैदरखानाचे लढाईत टिपूची सनगे सापडली त्यापैकी गु॥ माणकोजी सेलके व फिरंगोजी जाधव शिलेदार नि॥ खंडेराव बापूजी जामदारखान्यांत सनगे अनामत होती ते जमा धारिली बा। यादी सनगे येकूण किमत

२१० जाफरखानी ७५ तुंबा गजनीचीजरी १ १०चोळणा
२१५ झगे निमे ३ लुंग्या एकूण ५१३

---

लेखांक १७६

कमाविस भेट हैदरखानाचे लढाईत गुरामकोंडा घेतला ते समई आनंदराव भिकाची रास्ते व आनंदराव गोपाळ यास मीर रेजा अलीखान याजकडून पोशाख आले ते मारनिलेने घेतले नाहीत याजकरितां जामदारखान्यात अनामत होते ते हली जमा सनगे रुपये किंमत ४० तिवटे २ दर २० ६० शालफर्द २ दर ३० ८० शेले साधे वर काम बारभी सोनेरी २ दर ४० २० गजन्या २ दर १० एकूण २०० रु.

---

लेखांक १७७

शके १६९४ नंदननाम संवत्सरे भाद्रपद ब॥ १ (ता. १२ सेपटेंबर १७७२) मुकाम मौजे थेऊर प्रांत पुणे सलास सबैन मया व आलफ

१२४७२२ सिलक रोज गु॥
२९९७२००।≈ जमा
रु. ३१२१९२२।≈

जमा

| | | | |
|---|---|---|---|
| १४६३२॥ | हरपनहली संस्थान | २०० | कमाविसी गुन्हेगारी |
| २८६ | कमाविसी ,, | ५०७२४१।- | हरजीसेठ जामदार |
| २११ | कर्ज जमा | १६४३।।।॰ | कमाविसी वर्तोळा |
| २००० | ,, | १८०३।।।॰ | कमाविस बाब |
| ११॥ | चेनरायटण | १७७१९८९।।।- | खंडणीबद्दल हैदरखान या सिलकबंद अलाहिदा |
| ६८६८।= | कमावीससूट | ६८२३२५।।।= | अंतस्त वगैरे तपशीलवार अलाहिदा |
| ५० | वानगस्त जमा | ५३५४।- | यशवंतराव बाबुराव |
| २२६४८= | कमाविस हरपनहली | ३१७।।। | किता |

एकूण रुपये २९९७२००।≋

---

## लेखांक १७८

हैदरखान याचे खंडणींत जवाहीर आले त्याचा जमाखर्च मुकामी जाला त्यासा स्वारीत दागिने खर्च जाले ते जमा होनी किंमत ४२६२ रुपये दागिने सुमार

९ जडाव दागिने किंमत ४१५१ त्रिंबकराव विश्वनाथ याजकडे वा।
आंगठी पाचेची रु. ४२॥ जेगा १ रु. ४२५
४ पदके रु. ६५० ३ पोंहोच्या ९२१

७४ मोकले जवाहीर मोत्ये व॥ बाजुबंद जोड मोडिला त्याची होनी किमत १११ रु.

८३ एकूण रुपये ४२६२

---

## लेखांक १७९

खासा स्वारी प्रा। त्रिंबकराव विश्वनाथ याजबरोबर सिके दऊत वगैरे दिल्हे ते जमा

सिले दऊत ये॥ दागिने

३ रुपे दागिने

१ दऊत ८५॥
१ सिका
१ मोर्तब

३

१ कटार हरगोजी
सरपोस तापत्याचा २ व गजनी २॥ ये॥ सु॥ २

---

**लेखांक १८०**

ता. ८ सेपटेंबर १७७२ सन सलास सबैन ( शके १६९४ भाद्रपद )
छ १० मिनहू
जमाखर्च जामदारखान्यापैकी
सिलेदार व पागा यास निरोपाची वस्त्रे सदरेस

**१ बावाजी सावंत** सिलेदार सनगे
येकूण आंख

१२॥ तिवटे १
४० सेला साधा $\frac{1}{2}$

रु. ५२॥

**१ दि॥ मुरारराव जाधव** भुईजकर
सिलेदार

२८३॥· खासा
७५॥ तिवट १
११९ जाफरखानी १
२९ छीटबारी १
६० किनखाप ·॥·

रु. २८३॥ ३॥

१०८।॥· कारकून तिवटे शेले
४७।॥ ६१

एकूण रुपये ३९२।·

**१ निळकंठराव थोरात** एकूण आंख
१९६।॥ खुद निळकंठराव थोरात
छीट १८

**१ सटवोजी गावडे** यास
११४॥· गोविंदराव गावडे तिवटे
३७॥
जाफरखानी ७७
६३ नरसिंगराव गावडे
तिवट १२॥
सेला ५०॥·
५४ हणमंतराव गावडे
तिवट रुपये १२
४२ सेला
६७ हैबतराव गावडे
७४ हणमंतराव आटोळे

३७२॥·

**१ यशवंतराव घायगुडे** यास सनगे
एकूण आंख
२२ तिवट १
४६ सेला साधा १

रु. ६८ २

तिवट जाफरखानी गजनी
५५॥ ९९ २४।°

९७ घनाजी थोरात
१०१॥ भुजंगराव थोरात
११९॥ सुभानराव थोरात
७७॥ गुणाजी निकम

रु. ५९२।°

१ मलणा वा॥ गंगाराम आंख
८॥ लुगडे गजनी ३॥= रु. १२

१ सिलेदार नि॥ सखाराम हरि
सनगे
एकूण आंख
४८॥।° खंडेराव धोपटे
५१॥° हणमंतराव धोपटे
३१ बहीरजी बोधे

रु. १३७।

१ सितोळे कुसेगांवकर सरंजामी
यास आंख
६४॥ खंडेराव सितोळे
५३ अनसोजी सितोळे
५१॥ सखाराम सितोळे

रु. १६९

१ निमा वा॥ दावलजी आंख
७ तिवटे + ३ गजनी = रुपये १०
१ चंद्रराव जाधव आनंदराव जाधव परिंचेकर यांचे पुत्र सनगे एकूण आख ६१ तिवटे १९ जाफरखानी ४२
१ छट्टू वा॥ सेख हसन
१५।. तिवट ६॥।. सेला साधा ८॥
१ सेख अली वा॥ सेख मुराद
१० तिवट ६॥. गजनी ३॥.

---

## लेखांक १८१

ता. १ सेपटेंबर १७७२

पागा दिमत वामनराव गोविंद याजकडील पागे यास निरोप समई वस्त्रे सदरेस सनगे
७९ माणको बल्लाल
तिवटे जाफरखानी
३४॥ ४४॥
७९॥ गणपत बाजीराव
३० तिवट १ जाफरखानी
४९॥.

आपाजी गोविंद कारकून पागा दि॥ विसाजी कृष्ण नि॥ त्रिनी यांस निरोप समई सदरेस सनगे—आंख

| | | |
|---|---|---|
| ४३ | तिवट | १ |
| ९१ | जाफरखानी | १ |
| २३ | छीट | १ |
| २३ | गजनी | ·॥· |
| रु. १८० | | ३॥ |

लेखांक १८२

ता. १ सेपटेंबर १७७२

खिजमतगार यासी कर्नाटकचे स्वारीबा छावणीत चाकरी मेहनत फार पडली सबब बक्षीस सबब यादी चिठी छ ३ जमाकर सलास सबैन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महादजी नाईक आंख | २५ | चिमाजी निकम | ५० | सेटी भगत | १५ |
| रत्नोजी धावडा | २५ | संभाजी सिंदा | २५ | सिवाजी जाधव | १५ |
| कावजी तालवणा | ५५ | सिदोजी जऊकरा | १५ | बहिरजी कदम | १२ |
| वेंकोजी कदम | २५ | नरसोजी शेटगा | ७५ | संताजी जमदाडे | २५ |
| विठोजी कदम | ३० | सूर्याजी थोरात | ५० | खंडोजी आगला | २५ |
| संताजी सबाणा | १५ | आवजी घरट | १६ | मल्हारजी कापशा | १५ |
| जावजी दगडा | २५ | रंभोजी मराल | ५० | | |

एकूण रु. ५६५॥.

---

## पेठ्यांची वंशावळ

लेखांक १८३

३० डिसेंबर, १७१६

शके १६३८ दुर्मुखीनाम संवत्सरे पौष वा॥ १३ रविवार ते दिनी वेदमूर्ती राजश्री विष्णुभट आग्निहोत्री वास्तव्य श्रीत्रिंबक यांस विद्यार्थी विसाजी कृष्ण पेठे मोकदम कसबा गुहागर सुभा दाभोळ नमस्कार विनंती उपरी तुम्हास श्रीत्र्यंबकीचे तीर्थ पुरोहितनामा लिहून दिले आहे आम्ही व आमचे वंशीचे कोणी यात्रेस येतील ते आपल्या यथाशक्ति तुमची पूजा करितील यास अन्यथा नाहीं हे लिहून दिले सही.

२७ डिसेंबर, १७१८

शके १६४० विलंबीनाम संवत्सरे मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा ते दिवशी लिहून दिधले वेदमूर्ती गोपाळभट अग्निहोत्री यांसी त्र्यंबक विसाजी अजे कृष्णाजीपंत माता भवानीबाई उपनांव पेठे प्रांत दाभोळ गाव गुहागर सदाशिवभट पटवर्धन उपाध्ये महादेवभट खरे समागमे आले होते.

८ डिसेंबर, १७३०

शके १६५२ साधारणनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध दशमी ते दिवशीं वेदमूर्ती राजश्री वेंकटभट अग्निहोत्री श्रीत्र्यंबककर तीर्थयात्रेस येऊन तीर्थ उपाध्ये लिखित त्र्यंबकराव विश्वनाथ अजे कृष्णाजीपंत पेठे पणजे बहिरोपंत बंधू माधवराव माता वेणूबाई उपनाव पेठे गांव गुहागर मोकदम चुलती उमाबाई समागमे आली होती आपले वडिलांचे लिहिले देखोन हे लिहून दिले असे आपले वंशीचे येतील ते तुम्हास पूजितील हे लिहून दिले सही

---

## १ याद्री वंशावळ पेठ्ये यांची

| | |
|---|---|
| | १ विसाजी कृष्ण पेठे मृ. १७२८ |
| १ मूळ संपादक त्रिंबकराव विश्वनाथ पेठे | |
| १ बंधू धाकटे माधवराव | १ त्रिंबकराव विश्वनाथ ज. १७१३ ? मृ. ३-४-१७७४ |
| २ पुत्र दोन | |
| १ विश्वासराव ऊर्फ आबाजी | |
| १ कृष्णराव ऊर्फ बाबूराव धाकटे | १ त्रिंबकरावाची बहीण रखमाबाई हिचें लग्न चिमाजीआप्पाबरोबर झालें. तिचा मृत्यु सन १७३०. तिचा मुलगा सदाशिवराव भाऊ. |
| २ | |
| २ स्त्रिया | |
| १ वडील येसुबाई इचलकरंजीकर घोरपडे यांची कन्या | १ येसूबाई ऊर्फ वेणूबाई मृ. २-४-१७९२ |
| २ धाकटी पार्वतीबाई पांडववाडीकर कोलटकर कन्या | १ पार्वतीबाई किंवळें येथें सती गेली, स. १७७४. |
| २ | |
| २ कन्या दोन | |
| १ चिमाबाई मोरोबादादा फडणीस यास दिली | |
| १ ठमाबाई इंदूरचे जोग यांस दिली | |
| १ विश्वासराव, त्रिंबकराव यांचे चिरंजीव | १ विश्वासराव त्रिंबक जन्म १७३५, मृ. १७८०. त्याचा सापत्न भाऊ कृष्णराव त्रिंबक ऊर्फ बाबूराव मृ. १८-५-१७७१; त्याची स्त्री राधाबाई सती गेली. |
| २ स्त्रिया | |
| १ लक्ष्मुंबाई वडील १ गंगाबाई धाकटी | |
| १ पुत्र अमृतराव | |

| | |
|---|---|
| १ अमृतराव, विश्वासराव यांचे चिरंजीव<br>१ स्त्री सावित्रीबाई, हरिपंत फडके यांची कन्या<br>१ पुत्र त्रिंबकराव १ कन्या<br>२ | १ अमृतराव विश्वासराव ज. १७६१ ! मृ. १७८६ वयाच्या २५–२६ व्या वर्षी वारला |
| १ त्रिंबकराव, अमृतेश्वर यांचे चिरंजीव<br>३ स्त्रिया १ वाईकर बळवंतराव वैद्य यांची कन्या काशीबाई वडील<br>२ राधाबाई कोळथरेकर जोशी यांची कन्या<br>३ रमाबाई धाकटी गोंधळेकर जोशी यांची कन्या<br>२ पुत्र<br>१ अमृतराव वडील<br>२ गणपतराव धाकटे | १ त्रिंबकराव अमृतेश्वर जन्म १७८१, मृत्यु १८४०. याचा सर्व सरंजाम दुसऱ्या बाजीरावानें जप्त केला; पुढें त्याला वार्षिक दोन हजाराची नेमणूक मिळाली. त्याची स्त्री काशीबाई ऊर्फ ताई पेठी. |
| १ अमृतराव, त्रिंबकराव यांचे चिरंजीव<br>३ स्त्रिया<br>१ सावित्रीबाई परांजपे यांची कन्या<br>२ राधाबाई ढमढेरे यांची कन्या<br>३ वाराणशी लिमये यांची कन्या<br>१ पुत्र बाबूराव ऊर्फ अनंतराव | १ अमृतराव त्रिंबक ज. १८०३ मृ. १८७२ |

---

१ माधवराव त्रिंबकराव विश्वनाथ यांचे सापत्न बंधु
१ पुत्र मोरेश्वर ऊर्फ मोरोबादादा

१ मोरेश्वर माधव
१ स्त्री सत्यभामाबाई
१ दत्तपुत्र माधवराव

१ माधव मोरेश्वर
१ स्त्री अन्नपूर्णाबाई
१ चिंतामणराव दत्तपुत्र

## पेशव्यांच्या वंशावळीसंबंधीं दीक्षित पटवर्धन यांच्या कीर्दींतील उतारे

**लेखांक १८४**

१. शके १६९४ ज्येष्ठमास (८ जून १७७२) आबाजी[१] (विश्वनाथ) त्रिंबक पेठे (यांच्या) पुत्राचे लग्न झाले सबब देहेनगी कापड रु. ६२।।।=

२. शके १७०० कार्तिकमास (१६ नोव्हेंबर १७७८) अमृतराव विश्वनाथ पेठे याचे बायकोचे गर्भादान जाहले त्याकडे देहेनगी रु. १९।।।=।।

३. शके १७०० पौष व।। ६ (८ जानेवारी १७७९) येसुबाई पेठे बा। खत व्याज आकार ।।' प्रो रु. ३०००

४. शके १७०० फाल्गुन शु।। ४ (२० फेब्रु. १७७९) कृष्णराव पेठे मातुश्रीच्या उत्तरकार्यास पुणे सिक्का रुपये १०००

५. शके १७०१ खासगत फालगुन मास शु।। १२ (१७ मार्च १७८०) (कृष्णराव) बाबूराव त्रिंबक पेठे मौजे धोम येथे देवसेवेस राहिले होते त्यांचे कारकून मन मानेल तसा कारभार करूं लागले सबब नाना फडणीस यांनीं बंदोबस्त करण्यास सांगीतले सबब मोरो गोविंद पटवर्धन यास त्याजकडे पाठविले त्याबद्दल रु. १०।।

६. शके १७०३ वैशाख (१८ मे १७८१) वद्य ११ स कृष्णराव पेठे वारले स्त्री सहगमन केले त्यासमई वाटले रोख पोते चालू रुपये १००० व अधेल्या १००० बा। ५०० माधवराव मोरेश्वर पेठे

७. शके १७०३ मार्गशीर्ष व।। ६ (६ डिसेंबर १७८१) अमृतराव विश्वनाथ पेठे पुत्राचे बारसे जाहले त्याकडे देहेनगी खर्च रु. १०

---

१ खरे, लेखांक ८२ व १०० व इचलकरंजी संा इतिहास लेखांक ८२ व १०० यांत 'आवा' असें नांव आलें आहे. तें त्रिंबकरावमामाच्या नातवाचें असें खरेशास्त्री समजतात; तें चूक असून आवा उर्फ आबाजी हें विश्वासरावाचें म्हणजे त्रिंबकरावाच्या मुलाचें टोपण नांव होय.

८. शके १७०६ मार्गशीर्ष शु॥ ४ ( १६ नोव्हेंबर १७८४ ) अमृतराव पेठे यास कन्या जाहाली सबब साखर घेऊन खिजमतगार आला त्यास रु. ·॥·

९. शके १७०७ माधवराव मोरेश्वर पेठे यास गोळयांची कन्या दिली

१०. शके १७१० त्रिंबक अमृत पेठे याचा व्रतबंध जाहाला सबब भिक्षावळ मोहेर १ चैत्र व॥ ५ ( २५ एप्रिल १७८८ )

११. शके १७१४ चैत्रमास ( शु॥ १० सोमवारी; ता. २ एप्रिल १७९२ ) मातुश्री येसुबाई[1] यास देवआज्ञा जाहली सबब देहेनगी देणे त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे.

१२. शके १७१६ चैत्रमास ( सन १७९५ ) ( त्रिंबक अमृतराव पेठे ) यांचे लग्न वाईस जाले

---

## म्हैसूर-कर्नाटक युद्धाच्या वेळचे त्रिंबकरावमामाचे मुकाम

### इ. स. १७७० ते १७७२

लेखांक १८५

| | |
|---|---|
| ता. १३ मे १७७० रविवार ते १६ मे | मौजे कंचनहल्ली प्रांत सिरें. |
| ता. १७ मे १७७० गुरुवार ते २१ मे | परशुरामपूर सां नीलदुर्ग |
| ता. २२ मे १७७० मंगळवार | मौजे तलपली सां रायदुर्ग |
| ता. २३ मे १७७० बुधवार ते २४ मे | मौजे चितलपली नजीक कोल्हार सां रायदुर्ग |
| ता. २५ मे १७७० शुक्रवार ते २६ मे | मौजे कैरव सां रायदुर्ग |
| ता. २७ मे १७७० रविवार ते २९ मे | मौजे नगर तपली सां रायदुर्ग |
| ता. ३० मे १७७० बुधवार ते ३ जून | मौजे केत कंचनहली सां नीलदुर्ग |
| ता. ४ जून १७७० सोमवार | मौजे जवल ग्यानहलीनजीक पावागड |
| ता. ५ जून १७७० मंगळवार | मु. किल्ले उटकूर ता. पेनगोंडा |

---

१ ही त्रिंबकरावमामाची बायको.

| | |
|---|---|
| ता. ६ जून १७७० बुधवार | मु. लेपाक्षी ता. पेनगोंडा |
| ता. ७ जून १७७० गुरुवार | इंपासमुद्र ता बालापूर |
| ता. ८ जून १७७० शुक्रवार ते ११ जून | केरीसमुद्र प्रां बालापूर |
| ता. १२ जून १७७० मंगळवार ते १४ जून | तिलासमुद्र प्रां बालापूर |
| ता. १५ जून १७७० शुक्रवार ते २१ जून | मु. चेटूर सां गुमनाडपाले |
| ता. २२ जून १७७० शुक्रवार ते २८ जून | मौजे गोलपल्ली ता. बुरुडकोटे |
| ता. २९ जून १७७० शुक्रवार | का वांचिनिटकोटे ता. सुणकल |
| ता. ३० जून १७७० शनिवार ते ६ जुलै | का रामसमुद्र सां पुंगपूर |
| ता. ७ जुलै १७७० शनिवार ते ९ जुलै | मौजे बेडवारपली सां पुंगपूर |
| ता. १० जुलै १७७० मंगळवार ते ११जुलै | किल्ले मदनपल्ली ता. गुरुमकोंडा |
| ता. १२ जुलै १७७० गुरुवार | कुरबारकोट सां गुरुमकोंडा |
| ता. १३ जुलै १७७० शुक्रवार | मौजे तंबलपली सां गुरुमकोंडा |
| ता. १४ जुलै १७७० शनिवार | मौजे छपक पा सोपनपली |
| ता. १५ जुलै १७७० शनिवार ते २१ जुलै | मौजे कुंबल |
| ता. २२ जुलै १७७० रविवार ते २४ जुलै | बेबल दवलचरु प्रां कुंबल |
| ता. २५ जुलै १७७० बुधवार | उचटकुल |
| ता. २६ जुलै १७७० गुरुवार ते २९ जुलै | तलपुल |
| ता. ३० जुलै १७७० सोमवार ते ३१ जुलै | कुमारकालव |
| ता. १ ऑगस्ट १७७० बुधवार | का दीनपाड प्रां कडपे |
| ता. २ ऑगस्ट १७७० गुरुवार | का राचोटी सरकार गुरुमकोंडा |
| ता. ३ ऑगस्ट १७७० शुक्रवार | का दीनपाड प्रां कडपे |
| ता. ४ ऑगस्ट १७७० शनिवार | का। राचोटी सरकार गुरुमकोंडा |
| ता. ५ ऑगस्ट १७७० रविवार ते १३ ऑगस्ट | किल्ले प्रतापदुर्ग प्रां राचोटी |
| ता. १४ ऑगस्ट १७७० | मौजे जबाब पटे |
| ता. १५ ऑगस्ट १७७० बुधवार ते ३० ऑक्टोबर अखेर | किल्ले गुरुमकोंडा |
| ता. ३१ ऑक्टो. १७७० बुधवार ते १ नोव्हेंबर | मौजे नबाबपेठ सां गुरुमकोंडा |
| ता. २ नोव्हेंबर १७७० शुक्रवार | का। गुंटसूर |
| ता. ३ नोव्हेंबर १७७० शनिवार ते ४ नोव्हें. | का। पिलेर |
| ता. ५ नोव्हेंबर १७७० सोमवार ते ६ नोव्हें. | पुलचर लमेटा पा कटूर |
| ता. ७ नोव्हेंबर १७७० बुधवार | नागपटण नजीक तिरुपति |
| ता. ८ नोव्हेंबर १७७० गुरुवार ते १० नोव्हें. | गोविंदराज पटण |
| ता. ११ नोव्हें. १७७० रविवार ते १२ नोव्हें. | तिरुपति |
| ता. १३ नोव्हेंबर १७७० मंगळवार | गोविंदराजपटण |

ता. १४ नोव्हेंबर १७७० बुधवार ते १५ नोव्हें. पुलचलेसी
ता. १६ नोव्हेंबर १७७० शुक्रवार ते १७ नोव्हें. ताडगुपाले
ता. १८ नोव्हेंबर १७७० रविवार मौजे ताडगुव्या
ता. १९ नोव्हेंबर १७७० सोमवार ते २० नोव्हें. मौजे तुडपाले
ता. २१ नोव्हेंबर १७७० बुधवार ते २३ नोव्हें. कंदुर पो पुंगपूर
ता. २४ नोव्हेंबर १७७० शनिवार ते २५ नोव्हें निवालपली पा मदनपली
ता. २६ नोव्हेंबर १७७० सोमवार ते २८ नोव्हें. बोडवारपली पा पुरदूर
ता. २९ नोव्हेंबर १७७० गुरवार ते ३० नोव्हें. तुमरकी प्रो पुरदूर
ता. १ डिसेंबर १७७० शनिवार ते ४ डिसेंबर मौजे कोनगुटे सां मूलबागल
ता. ५ डिसेंबर १७७० बुधवार ते ८ डिसेंबर मौजे बंडपली सां मूलबागल
ता. ९ डिसेंबर १७७० रविवार मौजे करमठी सां ब्रोतमंगल पा कोलार
ता. १० डिसेंबर १७७० सोमवार मौजे नाईनपाले पो हुसकोटे
ता. ११ डिसेंबर १७७० मंगळवार ते १४ डिसें. मौजे बो (हे) रकी सां अंकुसगिरि

———

ता. १८ जानेवारी १७७१ शुक्रवार का। देवनहली
ता. १९ जानेवारी १७७१ शनिवार २० जाने. मौजे होनगुटे प्रां दोड बाळापूर
ता. २१ जानेवारी १७७१ सोमवार ते ३० जाने. मौजे गुंडमगिरि पो देवरायदुर्ग
ता. ३१ जानेवारी १७७१ गुरुवार मौजे सोपनहली पो बाळापूर
ता. १ फेब्रुवारी १७७१ शुक्रवार मौजे कोडेहली नजीक निजगल

———

ता. १४ जुलै १७७१ सोमवार ते २९ जुलै मौजे होनसिक प्रां बाणावर
ता. ३० जुलै १७७१ मंगळवार ते ३ ऑग. अगोदे प्रां बाणावर
ता. ४ ऑगस्ट १७७१ रविवार ते ७ ऑ. कुटनेकहळी प्रां तुराविकरे
ता. ८ ऑगस्ट १७७१ गुरुवार ते १० ऑ. का। दंडसरयर प्रां तुराविकरे
ता. ११ ऑगस्ट १७७१ रविवार ते १४ ऑ. का। चेटकूर प्रां गुमकूर
ता. १५ ऑगस्ट १७७१ गुरुवार ते १९ ऑ. टुमकूर प्रा। देवरायदुर्ग
ता. २० ऑगस्ट १७७१ मंगळवार का। देवरायदुर्ग
ता. २१ ऑगस्ट १७७१ बुधवार ते २ सेपटेंबर नजीक किले देवरायदुर्ग
ता. ३ सेपटेंबर १७७१ मंगळवार ते ५ सेपटें. काया समुद्र प्रां टुमकूर.
ता. ६ सेपटेंबर १७७१ शुक्रवार ते ११ सेपटें. किले भैरव दुर्ग नजीक उतरीदुर्ग

———

| | |
|---|---|
| ता. २४ नोव्हेंबर १७७१ रविवार ते २६ नोव्हें. | मौजे तानसूर पा॥ बेगरूल |
| ता. २७ नोव्हेंबर १७७१ बुधवार | मौजे जटकूर प्रा॥ होसूर |
| ता. २८ नोव्हेंबर १७७१ गुरुवार ते १ डिसें. | मौजे पणपली ता॥ अंकुसगिरी |
| ता. २ डिसेंबर १७७१ सोमवार ते ३ डिसें. | मौजे तिरीथ ता॥ अंकुसगिरी |
| ता. ४ डिसेंबर १७७१ बुधवार ते ५ डिसें. | नजीक कि॥ कृष्णागिरी |
| ता. ६ डिसेंबर १७७१ शुक्रवार ते १३ डिसें. | किले जगदेवगड |
| ता. १४ डिसेंबर १७७१ शनिवार | नजीक किले जगदेवगड |
| ता. १५ डिसेंबर १७७१ रविवार ते २३ डिसें. | किले जगदेवगड |
| ता. २४ डिसेंबर १७७१ मंगळवार ते २७ डिसें. | मौजे कंपळी प्रां तिरपासूर |
| ता. २८ डिसेंबर १७७१ शनिवार ते ७ जाने. | मौजे (बो) हेरपली पा॥ कावेरीपटण |
| ता. ८ जानेवारी १७७२ बुधवार ते ९ जाने. | मौजे कमनेटूर पा॥ कावेरीपटण |
| ता. १० जानेवारी १७७२ शुक्रवार ते १५ जाने. | मौजे इंचबू प्रां कमाजटूर |
| ता. १६ जानेवारी १७७२ गुरुवार ते २५ जाने. | नजीक कसबे कंगरी कोटे |
| ता. २६ जानेवारी १७७२ रविवार ते ४ फेब्रु. | नजीक मौजे कमनेटसूर सां धर्मपुरी |
| ता. ५ फेब्रुवारी १७७२ बुधवार ते ११ फेब्रु. | का॥ पालगुंड प्रा॥ श्रीरंगपटण |
| ता. १२ फेब्रुवारी १७७२ बुधवार | मौजे पाचमारपळी प्रां श्रीरंगपटण |
| ता. १३ फेब्रुवारी १७७२ गुरुवार | नजीक किले रायकोटा प्रां श्रीरंगपटण |
| ता. १४ फेब्रुवारी १७७२ शुक्रवार ते १६ फेब्रु. | का॥ कोनमंगल प्रां होसूर |
| ता. १७ फेब्रुवारी १७७२ सोमवार ते २२ फे. | कसबे आनेकल |
| ता. २३ फेब्रुवारी १७७२ रविवार ते ५ मार्च | मौजे कोप प्रां जिगजी |
| ता. ६ मार्च १७७२ शुक्रवार ते ९ मार्च | आग्राम प्रां बेंगरूल |
| ता. १० मार्च १७७२ मंगळवार | मौजे हेब्राळ प्रा॥ बेंगरूल |
| ता. ११ मार्च १७७२ बुधवार ते १२ मार्च | मौजे आलकूर पा॥ जेलबंगल |
| ता. १३ मार्च १७७२ शुक्रवार | मौजे महादेवपूर |
| ता. १४ मार्च १७७२ शनिवार | नजीक किले भैरवदुर्ग |
| ता. १५ मार्च १७७२ रविवार | किले भैरवदुर्ग |
| ता. १६ मार्च १७७२ सोमवार | नजीक किले भैरवदुर्ग |
| ता. १७ मार्च १७७२ मंगळवार ते १९ मार्च | कसबे कुणगल प्रां पटण |
| ता. २० मार्च १७७२ शुक्रवार ते २२ मार्च | मौजे बेगूर प्रांत उत्तरीदुर्ग |
| ता. २३ मार्च १७७२ सोमवार | मौजे सिंगना नाईक हली |
| ता. २४ मार्च १७७२ मंगळवार ते २५ मार्च | कसबे नागमंगल प्रांत पटण |
| ता. २६ मार्च १७७२ गुरुवार ते २७ मार्च | मौजे होनवड प्रां नागमंगल |
| ता. २८ मार्च १७७२ शनिवार | नजीक किकेरी प्रां पटण |
| ता. २९ मार्च १७७२ रविवार | मौजे बीकरहली माहादेव (दा) पूर |

| | |
|---|---|
| ता. ३० मार्च १७७२ सोमवार | नजीक होले नरसिंगपूर |
| ता. ३१ मार्च १७७२ मंगळवार ते ४ एप्रिल | का॥ अर्कलगोंडा प्रां पटण |

---

| | |
|---|---|
| ता. ३ जून १७७२ बुधवार ते ५ जून | श्रावण बेगूर |
| ता. ६ जून १७७२ शनिवार ते १४ जून | मौजे कली प्रां किकेरी |
| ता. १५ जून १७७२ सोमवार | मौजे बारहली प्रां किकेरी |
| ता. १६ जून १७७२ मंगळवार | का॥ हिरेशा प्रां किकेरी |
| ता. १७ जून १७७२ बुधवार ते २० जून | का॥ तुरविकिरे |
| ता. २१ जून १७७२ रविवार | कसबे कडबा |
| ता. २२ जून १७७२ सोमवार | मौजे टुगमूर प्रां टुमकूर |
| ता. २३ जून १७७२ मंगळवार ते २५ जून | का॥ टुमकूर |
| ता. २६ जून १७७२ शुक्रवार ते ५ जुलै | कसबे कस्तुर प्रां देवरायदुर्ग |
| ता. ६ जुलै १७७२ सोमवार | मौजे ब्रह्मसमुद्र प्रां सिरे |
| ता. ७ जुलै १७७२ मंगळवार ते ८ जुलै | का॥ आगली सां रत्नागिरी |
| ता. ९ जुलै १७७२ गुरुवार ते १३ जुलै | का॥ मडमारहली प्रां सिरे |
| ता. १४ जुलै १७७२ मंगळवार | नजीक किले देवरकोंडा |
| ता. १५ जुलै १७७२ बुधवार ते १७ जुलै | मौजे करीगनहली सां रायदुर्ग |
| ता. १८ जुलै १७७२ शनिवार ते १९ जुलै | मौजे कोंढापूर सां रायदुर्ग |
| ता. २० जुलै १७७२ सोमवार ते २१ जुलै | मौजे कंदकूर सां रायदुर्ग |
| ता. २२ जुलै १७७२ बुधवार | नजीक रायदुर्ग |
| ता. २३ जुलै १७७२ गुरुवार ते २४ जुलै | का॥ सिरे कोल सां रायदुर्ग |
| ता. २५ जुलै १७७२ शनिवार | मौजे तुलकुंदी सां बाकरी |
| ता. २६ जुलै १७७२ रविवार ते २७ जुलै | नजीक किले दरोजी प्रां कंपली |
| ता. २८ जुलै १७७२ मंगळवार ते ३१ जुलै | मौजे आरालहली तुंगभद्रा दक्षिणतीर |
| ता. १ ऑगस्ट १७७२ शनिवार | मौजे आरालहली तुंगभद्रा दक्षिणतीर |
| ता. २ ऑगस्ट १७७२ रविवार | मौजे डिट्टुर तुंगभद्रा उत्तरतीर |
| ता. ३ ऑगस्ट १७७२ सोमवार ते ७ ऑ. | मौजे दानापूर ,, |
| ता. ८ ऑगस्ट १७७२ शनिवार | मौजे नरसिंगपूर पो कनकगिरी |
| ता. ९ ऑगस्ट १७७२ रविवार | मौजे मनापूर ,, |
| ता. १० ऑगस्ट १७७२ सोमवार | का॥ हणमंतसागर |

| | |
|---|---|
| ता. ११ ऑगस्ट १७७२ मंगळवार | का। कमति पा. बागलकोट |
| ता. १२ ऑगस्ट १७७२ बुधवार | का। जालेहाल पा। बागलकोट |
| ता. १३ ऑगस्ट १७७२ गुरुवार | का। बागलकोट |
| ता. १४ ऑगस्ट १७७२ शुक्रवार ते १७ ऑ. | किले बागलकोट घटप्रभा उत्तरतीर |
| ता. १८ ऑगस्ट १७७२ मंगळवार ते १९ ऑ. | मौजे कोप पा। कुंदरगी प्रां बागलकोट |
| ता. २० ऑगस्ट १७७२ गुरुवार | मौजे (नं ?) जगदाल नावलगी प्रां जमखंडी |
| ता. २१ ऑगस्ट १७७२ शुक्रवार | मौजे खेमलापूर |
| ता. २२ ऑगस्ट १७७२ शनिवार | मौजे सवपति पा रायबाग |
| ता. २३ ऑगस्ट १७७२ रविवार ते २४ ऑ. | मौजे कक्कले पा. चिकोडी |
| ता. २५ ऑगस्ट १७७२ मंगळवार ते २६ ऑ. | मौजे येडूर पा. चिकोडी |
| ता. २७ ऑगस्ट १७७२ गुरुवार ते २८ ऑ. | मौजे मांजरी प्रां रायबाग |
| ता. २९ ऑगस्ट १७७२ शनिवार ते ३० ऑ. | मौजे मिरज प्रां रायबाग |
| ता. ३१ ऑगस्ट १७७२ सोमवार ते २ सेपटें. | मौजे गोरेगाव |
| ता. ३ सेपटेंबर १७७२ गुरुवार | मौजे न (ज ?) लगाव प्रां वाई |
| ता. ४ सेपटेंबर १७७२ शुक्रवार | मौजे देऊर प्रां वाई |
| ता. ५ सेपटेंबर १७७२ शनिवार ते ६ सेपटें. | मौजे पिंपरे प्रां पुणें |
| ता. ७ सेपटेंबर १७७२ सोमवार | मौजे वालती प्रां पुणें |
| ता. ८ सेपटेंबर १७७२ मंगळवार ते ९ सेपटें. | मौजे लोणी प्रां पुणें |
| ता. १० सेपटेंबर १७७२ गुरुवार ते २४ सेपटें. | मौजे थेऊर प्रां पुणें |
| ता. २५ सेपटेंबर १७७२ | कसबे पुणें |

---

## त्रिंबकरावमामा पेठे—शकावली

**लेखांक १८५**

पेशव्यांच्या चार पिढ्या त्रिंबकराव विश्वनाथ पेठे यांनीं पाहिल्या. सन १७१३ पासून सन १७७४ एप्रिल ३ पर्यंतच्या त्यांच्या हयातींतील सूक्ष्म नसलें तरी स्थूल गोष्टींचें दिग्दर्शन व्हावें म्हणून ही शकावली तयार केली आहे. ती परिपूर्ण आहे असें नाहीं. तरी त्यावरून त्रिंबकरावमामांच्या जीवनांतील कमी–अधिक महत्त्वाच्या घटनांवर थोडा प्रकाश पडून इतर ऐतिहासिक

गोष्टींचा कार्यकारणभाव लक्षांत घेण्यास बरीच मदत होईल अशी आशा आहे. बहुतेक सर्व ठिकाणीं मराठींतील सिद्ध ग्रंथांचें आधार दिलेले आहेत.

| | |
|---|---|
| १७१० | रखमाबाई पेठे, चिमाजी आप्पांची प्रथम स्त्री, हिचा जन्म झाला असावा. |
| १७१३ | त्रिंबकराव पेठे जन्म ( अजमासें ). |
| १७१६ डिसेंबर १६ | विसाजी कृष्ण ( मामांचे वडील ) श्रीत्र्यंबकेश्वरास भेट देतात. ( पेठे दफ्तर ले. १८२ ) |
| १७१७ डिसेंबर | त्रिंबकराव विश्वनाथाची मातेसह श्रीत्र्यंबकेश्वरास भेट. |
| १७१८ | अनुबाई घोरपडे यांची कन्या वेणूबाई हिचा जन्म. ( अजमासें ) |
| १७१८-१९ | बाळाजी विश्वनाथाबरोबर नागपूरकर भोसल्यांच्या पथकांत हरकारा म्हणून विसाजी कृष्ण दिल्लीस रवाना. ( पे. द. ३०, पान २५१ ) |
| १७२२ नोव्हेंबर १९ | छ शाहूनें विसाजी कृष्णास किवळ्यास एक चाहूर पड जमीन इनाम दिली ( पेठे दफ्तर ले. १ ) |
| १७२४ | त्रिंबकरावाचें वेणूबाईशीं लग्न. तिचें सासरचें नांव येसूबाई. ( पे. द. ३०, ३५५ मध्यें राजश्री विसाजी कृष्ण याचे मुलाचे हातीं घालावयाशी सौ. बाईनें मोहोर १ नेली असा उल्लेख आहे. तो याच वेळचा असावा. अर्थात् लग्नांत वेणूबाई ५-७ वर्षांची असावी. त्यावरून तिची आई अनुबाई तिच्यापेक्षां १३-१४ वर्षांनीं मोठी धरल्यास अनुबाईचा जन्म १७०५ च्या सुमाराचा ठरतो. अनुबाई भिऊबाईपेक्षां मोठी ( पहा, का. सं. प. या. दुसरी आवृत्ति, पान ४९४ व पे. द. ९, ले. ४१ व ४५ ) व चिमाजी अप्पापेक्षां धाकटी होय. ( पहा पे. द. ९, ले. ७१ ) |
| १७२७ जानेवारी ९ | विसाजीपंत, सौ. वेणूबाई व त्रिंबकराव खुशाल आहेत असे राधाबाई रखमाबाईस लिहिते. (पे. द. ३०, ले. ११८) |
| ऑक्टोबर २२ | दंडाराजपुरीच्या देशमुखाचा मुतालिक गोविंद कृष्ण याच्याकडे त्रिंबकराव विश्वनाथ याची कारकून म्हणून नेमणूक. ( पे. द. ३०, ले. ४७ ) |
| १७२८ जून ६ | विसाजी कृष्ण पेठे याचा मृत्यु. (पे. द. ३०, ले. ३१६) तो बुद्धिमान असल्याबद्दल उल्लेख. ( का. सं. प. या. पान ४९४ व शा. रो. पान ४५ ) |

| | |
|---|---|
| जून ७ | बाप मृत्यु पावल्यानें त्याच्या जागीं बाबती प्रांत खानदेशचा मामला त्रिंबकराव विश्वनाथ याच्याकडे आला. (पे. द. ३०, ले. ३१६) |
| १७३० जुलै १३ | रखमाबाई त्रिंबकरावमामाकडे आहे, तिचा समाचार घेणें म्हणून राधाबाई सिऊबाईस लिहिते. यावेळीं रखमाबाई गरोदर होती. (पे. द. १८, ले. १५७) |
| जुलै १४ | त्रिंबकरावाचें 'रखमाबाईस पाठवीत नाहीं, ठेवून घेतो' म्हणून राधाबाईस पत्र. (पे. द. १८, ले. १०३; या पत्राची छापील तारीख चूक आहे. येथील बरोबर.) |
| ऑगस्ट ३ | त्रिंबकरावाचा भाचा सदाशिवरावभाऊ याचा जन्म. |
| ऑगस्ट १२ | सदाशिवरावभाऊचें नामकरण (रा. खं.२, पा.६१–६२) |
| ऑगस्ट ३१ | रखमाबाईचा (बाळंतरोगानें ?) मृत्यु. (त्रिंबकरावाची बहीण.) |
| १७३१ डिसेंबर | कतबे लोकांचे सा। राजश्री पंतप्रधान करार रुपये, त्रिंबकराव विश्वनाथ यास रुपये ८००० (पे. द. १७, ले. ३१) |
| १७३४ सेपटेंबर २ | 'त्रिंबकरावाचा जाब लिहिला, त्यास सांगावयाचें तें सांगावें. (पे. द. ३०, ले. १११) |
| सेपटेंबर | निजामास पत्रें लिहून बंदोबस्त परवाने मिळण्यास मदत मिळवावी असें त्रिंबकराव विश्वनाथ वराडांतून लिहितो. (पे द. ३०, ले. ११२) |
| १७३५ ऑगस्ट २० | वस्त्रें दि॥ त्रिंबकराव विश्वनाथ सुभेदार बाबती प्रांत खानदेश. (पे. द. २२, ले. ११०) |
| १७३६ फेब्रुवारी २ | सदाशिवरावभाऊची मुंज (पे. द. २२, ले ३११) |
| मार्च ३ | सायगांवच्या लोकांचें व स्थळांचे, दाभाड्याच्या लोकांपासून त्रिंबकरावमामानें संरक्षण केलें. (पे. द. ३०, ले. १६३) |
| एप्रिल २ | त्रिंबकरावमामा बागलाणांत (लष्करी) चाकरीस होता. त्याजबरोबर कान्होजी पा। झांबरा याचा भाऊ झुंजांत पडला. त्याची स्त्री सती गेली. (पे. द. २२, ले. ३१७) |
| एप्रिल ४ | फौजेस रजा देऊन खानदेशांतून घरास आलो असें त्रिंबकराव चिमाजीस कळवितो. (पे. द. ३३, ले २८८) |
| १७३८ मार्च ९ | अनेक सरदारांस रकमा दिल्या; त्रिंबकराव पेठ्यास पोता पा। रु. १००० दिले. (पे. द. ३०, ले. ३७१ पान ३८३) |

डिसेंबर २१ राणोजी भोसले याजकडून त्रिंबकरावानें घेतलेले कर्ज रुपये ४२०० ( अ. प्र. वैद्य द. )

१७३९ एप्रिल ४ राजश्री नारोपंत दि।। डबीर यांसी ज्येष्ठ मासाचे हप्त्याचे ऐवजी रु।। ५० दिविले, आदा करून कबज घेणें असें राणोजी भोसले त्रिंबकरावास कळवितो. ( राजवाडे ३, ले. २०० )

१७३९ ऑक्टोबर २८ पा।। उदेपूर दिगर जागीर व पा।। वासोदे जकात साभेर व पां अमझरी व तपे सुनेर नि।। त्रिंबक विश्वनाथ व महादाजी शंकर पाठविले याजपासून रसद रु. १२००० ( पे. द. ३०, ले. ३७५, पान ३८६ )

१७४० ऑगस्ट २३ राजजी पा। बहिरट मौजे भांब्रोडें याचा व जावजी शिरवला याचा वाडियाचा कजिया होता. तो त्रिंबकराव विश्वनायानें तोडला. ( राजवाडे ६, पान ३९ )

१७४२ ते ४ त्रिंबकरावानें वराडांत घुसून उपद्रव केला म्हणून त्याच्यावर फौज पाठवून त्याला कैद केलें असें रघूजी भोसले लिहितो. ( पेठे द. ले. ५ व ६ )

ऑगस्ट त्रिंबकरावाची शाहूच्या हुकमानें सुटका व त्याचें साताऱ्याकडे गमन. ( पेठे द. ले. ५ व ६ )

सपटेंबर ३० ग्यानगीर व जिवनगीर यांच्याकडे पूर्वी असलेले खानदेशांतील गांव पूर्वीप्रमाणें चालत तें करणें असा पेशव्याचा हुकूम ( बा. बा. रो. भाग २ ले. ३१५ )

१७४४ माहुलीस श्रीरामाचे देऊळ त्रिंबकरावानें बांधलें. ( भा. इ. सं. मं. षष्ठ संमेलन वृत्त, पान १९१ )

१७४४ मामानें ब्रम्हेंद्रस्वामींस पालखीचा दांडा व पिवळी सकलाद पाठविली. ( राजवाडे ३, ले. ४० )

१७४५ डिसेंबर १५ 'त्रिंबकराव विश्वनाथ यांचे पुत्राचे लग्न यावरून जामदारखान्यापैकीं जरूर ती सनगे देणें' म्हणून पेशव्याचा हुकूम. ( पे. द. ४०, ले. ३१ )

डिसेंबर २३ विना दिल्या घेतल्याबगर सरदारी कैसी चालते व बोज कैसा राहतो असें त्रिंबकरावाजवळ बापूजी बाजीराव बोलला. ( का. सं. प. या. ले. ४९ ) ( या पत्राची तारीख चूक आहे; ती येथें दिल्याप्रमाणें पाहिजे )

| | |
|---|---|
| १७४८ फेब्रुवारी ३ | नरसिंगराव बीन खंडेराव सितोले देशमुख यांजकडील एक चावर जमीन ( मौजे किवले येथील ) त्रिंबकराव विश्वनाथ यास दिली अशी पेशव्याची सनद. |
| मे ५ | त्रिंबकपंतानीं सर्व उठविलें. ( पुरं. १, ले. १६७ ) |
| ऑगस्ट ४ | मामा निर्माल्य तुल्य आहेत तीर्थरूपाचा भाव म्हणून थोडे थोडे काम सांगतो. ' ( पुरं. १, ले. १९७ ) असें सदाशिवराव लिहितो. |
| ऑगस्ट | मामासारखे मुर्दाडपणाचें भे मला नाहीं. ( पुरं. १, लें. २४८ ) असें सदाशिवराव लिहितो. |
| १७४८ | श्रीमंत मामास म्हणाले तुम्ही शहाणे वरी तुमचा सल्ला सांगा. ( पुरं. १, ले. १५८ ) |
| डिसेंबर ५ | किवले गांव इनाम दिल्याची सनद पेशव्याकडून मिळाली. |
| १७४९ मार्च ८ | किवले गांव इनाम दिल्याबद्दलची छ. संभाजी करवीरकर याची सनद. ( पेठे द. ले. ८ ) |
| ऑक्टोबर २७ | त्रिंबकराव विश्वनाथ हे त्रिंबकराव शंकर यासी ओळखतात. ( पे. द. २० ले. ५४ ) |
| १७५० मे २५ | मांडोबाची खंडणी त्रिंबकरावानें केली, गांव दरोबस्त आपल्याकडे घेतला, आताराकडील मामला दूर केला, रामराजियाचा हातरोखा घेतला. (राजवाडे ६, पान ५४) |
| १७५० जुलै १३ | पा। आडावद येथील घासदाणा रु. ७५० सालमजकुरी करार केला अशी पेशव्याकडून त्रिंबकरावास सनद. ( बा. बा. रोज १, ४९७ ) |
| सप्टेंबर १५ | खानदेशांतील लोकांकडून कर्ज उगविण्याबद्दल त्रिंबकरावाच्या दुय्यमास पेशव्याचें पत्र. (बा. बा. रोज २,२५) |
| १७५१ फेब्रुवारी १२ | त्रिंबकराव पुण्यास आला; पेशव्यांचा कारभारी म्हणून त्याची नेमणूक. ( राजवाडे ६, पान ६१ ) |
| फेब्रुवारी १४ | त्रिंबकराव विश्वनाथ यास लेहून राजश्री स्वामीचा पैका व जवाहीर पुण्यास आणून निराळया कोठडींत ठेवणें असा पेशव्याचा हुकूम. ( पुरं. १, ले. ३२१ ) |
| फेब्रुवारी १४ | त्रिंबकरावास लिहून पुण्याहून हशम आणवावे. ( पुरं. १, ले. ३२३ ) |
| फेब्रुवारी | यवतेश्वरची लढाई, ताराबाईचा करवीरकराशीं संदर्भ, साताऱ्याहून जास्त हशम मागतात वगैरे मजकुराचें त्रिंबकरावाचें पेशव्यास पत्र. ( पे. द. ६, ले. १५६ ) |

फेब्रुवारी १५ माधवरावाची मुंज मामानीं पुण्यास लाविली. ( पेशवे शकावली पान १२३ )

फेब्रुवारी १७ त्रिंबकरावाकडून ऐवज मागवावा म्हणून पेशव्याचें पत्र. ( पुरं १, ले. ३२६ )

मार्च ७ गायकवाड केंद्रावर आला, त्रिंबकराव विश्वनाथ पारगांवावरून आपल्या फौजेंत जावयास गेले. ( राजवाडे ६, पान ६१ ) रात्रीं पहिले प्रहरीं आपले घरास आले.

मार्च १७ गेंडामाळाचे लढाईत दमाजीचा पराभव झाल्याची हकीकत पेशव्यास, राघोबास व वासुदेव दीक्षित यांस त्रिंबकराव कळवितो. (पे. द.२६, ले. १६५; पे. द. ६, ले. १७१, १७४; राजवाडे खंड ३, ले. ३७९ पान ३५० )

मार्च २८ माणिकगडास वेढा दिल्याबद्दल मामानीं रामाजी महादेवास दोष दिला. ( पे. द. २४; ले. ६० )

एप्रिल ११ त्रिंबकरावाकडून निरंतर बाण, हाशम, जेजाला आणवणें. ( पुरं. १, ले. ३४४ )

एप्रिल २० बनाजी माधव पेशव्याच्या छावणींतून त्रिंबकरावास गेंड्यामाळावरील लढाईचें व मल्हारराव होळकराच्या अंतर्वेदींतील चकमकीचें वृत्त कळवितो. ( पे. द. २६, ले. १७६ )

एप्रिल २० साताऱ्यास वरचेवर हाशम पाठवितो असें त्रिंबकराव पेशव्यास कळवितो. ( पे. द. ६, ले. १८६ )

एप्रिल २१ गरनाळा, दारू गोळ्या वगैरे वरिचेवरी रवाना करीतच आहे असें त्रिंबकराव पेशव्यास कळवितो. ( पे. द. ६, ले. १८८ )

एप्रिल २२ राणा दुर्जनसिंग याच्या सरदारांस मामानें परत जाण्यास परवानगी दिली नाहीं, आतां पेशव्यानीं द्यावी. ( पे. द. २४, ले. ६२ )

एप्रिल २३ आजपर्यंत साताऱ्यास लढाईकरितां किती सरंजाम पाठविला त्याचा तपशील व वसईच्या गरनाला लाहान २०० व तुके ५०० थोर गरनाला गोले २० वगैरे साहित्य पाठवितो असें त्रिंबकराव पेशव्यास कळवितो. ( पे. द. २६, ले. १७७ )

एप्रिल २४ वरील पत्रांत नमूद केलेलें साहित्य साताऱ्यास रवाना केलें व शिवाय २० जेजाला तोफा ५।६ व फटकडी वगैरे साहित्य पाठवितो असें त्रिंबकराव पेशव्यास कळवितो. (पे. द. २६, ले. १७८)

एप्रील २७ दमाजीचा मोड झाल्याबद्दल पेशव्याचें त्रिंबकराव अभिनंदन करतो व उंटावर पाऊण लक्ष रुपये राऊतांबरोबर रवाना करतो म्हणून लिहितो. (पे. द. २६, ले. १८०)

एप्रिल २७ गायकवाड पराभूत होऊन शरण आल्याबद्दल आनंद दर्शविणारें पत्र रघुनाथरावास त्रिंबकराव लिहितो. (पे. द. ६, ले. १९१)

मे ३ इंदुरी व दावडीस पैका आहे. तेथें माणूस पाठवून आंतील वस्तभाव बाहेर जाणार नाहीं अशी खबरदारी घेणें म्हणून पेशव्याची त्रिंबकरावास आज्ञा. त्याप्रमाणें आपण काय तजवीज केली हें तो पेशव्यास कळवितो. (पे. द. २६, ले. १८३)

मे ५ इंदुरी व दावडी येथें ४०० माणसें पाठविलीं परंतु इंदुरींत खजाना नाहीं व दावडींत दाभाड्याची वस्तभाव किती याचा शोध चालू आहे असें त्रिंबकराव पेशव्यास कळवितो. (पे. द. ६, ले. १९४)

मे १० मल्हारराव होळकराचा वाडा लहान म्हणून आवजी कवडे यांच्या वाड्यांत दमाजीस ठेवण्यास सिद्धता केली आहे व उमाबाई, सेनापती वगैरेकारितां बाबूजी नाईकाची हवेली मुकर केली आहे असें पेशव्यास त्रिंबकराव लिहितो. (पे. द. ६, ले. १९५)

मे २५ दमाजी गायकवाड श्रीमंत राजश्री पंतप्रधान यास भेटावयास आला त्यास विश्वासराव व त्रिंबकराव सामोरे गेले (राजवाडे खंड ६, पान ७६)

ऑगस्ट २३ त्रिंबकराव दाभाडे यांनीं मौजे किवळे येथील सरपाटिलकीचा आकार त्रिंबकराव विश्वनाथ यास दिल्याबद्दल सनद. (पेठे द. अप्र.)

डिसेंबर २ उंटावर भांडीं वगैरे घालून दोन उंट पाठविल्याचें त्रिंबकराव गोपिकाबाईस कळवितो. (भा. इ. सं. मंडळ त्रै. जून १९३०, ले. १४८)

१७५२ जानेवारी ७ नारळ व ओल्या सुपाऱ्या पाठविल्याबद्दल व मोगल व पेशवे यांचा तह घाटत असल्याबद्दल त्रिंबकराव गोपिकाबाईस कळवितो ( मा. इ. सं. मं. त्रै. जून, १९३० ले. १५१. )

मे १३ दादाकडील वर्तमान कळवावे, रघूजी–मोगल तह झाला किंवा नाहीं अशी सदाशिवरावभाऊ त्रिंबकरावाकडे चौकशी करतो. ( पे. द. १८, ले. १५२ )

जुलै ९ पेशवे स्वारीस जाण्यास निघून त्रिंबकराव विश्वनाथ याचे घरीं येऊन राहिले. पुढे महादोबाशीं समेट. भटी–महादोबांनीं चार हजार फौज ठेवावी सुरत अठ्ठाविशींत ५ लक्षांचा सरंजाम, महीपलीकडे साडेतीन लक्षांचा, माळव्यांत ४० हजारांचा सरंजाम, पुरंदरसह पुणे देशची मुतालिकी महादोबाच्या पुत्रास द्यावी व देशी ८ हजारांचा सरंजाम द्यावा. ( राजवाडे ६, ले. १ )

जुलै ११।१२ श्रीमंत नाना त्रिंबक विश्वनाथाचे घरीं मोहोर्तेकरून राहिले. त्यांची भेट घेऊन महादोबा आपल्या घरीं गेले. ( राजवाडे ६, ले. १ )

ऑगस्ट २ माधवराव विश्वनाथ पेठे, बलवंतराव गणपतराव व बाबूराव फडणिस यांस पालखी सरंजाम मिळाला. ( राजवाडे ६, ले. १ )

नोव्हेंबर १ विश्वासराव, माधवराव व त्रिंबकराव विश्वनाथ लष्करांतून फिरोन आले. ( राजवाडे ६, ले. १ )

नोव्हेंबर २० त्रिंबकरावासमागमें फौज पाठवावी असे जगजीवन प्रतिनिधीस पेशव्यानें सांगितलें; परंतु त्रिंबकराव निघून गेला. ( पे. द. २६, ले. १९९ )

नोव्हेंबर २० येथील पारिपत्यासाठीं दोन हजार फौजेनिसी त्रिंबकरावास पाठवून द्यावें असें जगजीवन प्रतिनिधी पेशव्यास विनवितो. ( पे. द. २६, ले. २०० )

१७५३ जानेवारी १४ मल्हारराव होळकर वाफगांवाहून पुण्यास आले. त्यास त्रिंबकराव सामोरा गेला. ( निजामाकडील कांहीं मुलुख आपल्याला मिळावा अशी मल्हारराव व जयाजी शिंदे यांची इच्छा. म्हणून ते रुसले. त्यांचा रुसवा विश्वासराव व त्रिंबकराव यांनीं सामोपचारानें काढला. ) ( पे. द. २१, ले. ४९, ४८, ५१ )

जानेवारी २५ मामानीं कबूतरखान्यांत दक्षिणा वाटली. (राजवाडे ६, ले. १)

फेब्रुवारी ५ माधवराव विश्वनाथ पेठे याच्या मुलाचें लग्न. (राजवाडे ६, ले. १)
(माधवरावाचा जन्म सुमारें १७२० चा असावा.)

मार्च २१ अमृतराव मृत्यु पावला तरी त्याच्या कुटुंबीयांचें सांत्वन करावें असें पेशवा त्रिंबकरावास लिहितो. (पे. द. २८, ले. २१७)

मार्च २८ पाऊण लाख रुपये परत देण्याबद्दल त्रिंबकरावानें सनद दिली नाहीं, अशी अंताजी माणकेश्वर तक्रार करतो. (ऐ. प. व्य. ८९)

एप्रिल ४ वासुदेव दीक्षित यांस त्रिंबकराव कळवितो कीं महायात्रेचें साहित्य पाठविलें आहे. श्रीमंतांची बातमी नाहीं. द दानीं अहमदाबाद घेतलें. (राजवाडे ३, ले.४२५)

सप्टेंबर १७ वडगांवाला गोळीयांच्या वाड्यास उपसर्ग लागतो, तो बंद व्हावा. (पे. द. १२, ले. ११२.)

ऑक्टोबर ३० बालकोजी राऊत याची तरवार मोडली सबब त्यास सरकारांतून नवी दिली. (पे. द. २७, पान ८५)

नोव्हेंबर २७ जळालपुरची सरदेशमुखी दामोदर महादेव याचेकडे होती ती दूर करून त्रिंबकरावास मिळावी असें आज्ञापत्र (पेठे द. अप्र.)

१७५४ फेब्रुवारी २७ पुण्यांत कलालाचा बंदोबस्त केला आहे. त्याप्रा मुलाहिजा न धरितां पारपत्य, कैद चालविणें. (पे. द. २३, ले. ५९)

जुलै १० मौजे मोहाडीचा मोकासा मिळाल्याची सनद. (पेठे द. अप्र.)

मे २० मौजे कोयेली सरकार जुन्नर येथें १ चाहूर जमीनीची सनद (पेठे द. अप्र.)

१७५५ सेप्टेंबर २० खानदेशपैकीं कांहीं परगणे त्रिंबकराव विश्वनाथ याणी केलें. (राजवाडे ३, ले. ४६३)

१७५६ मार्च ३ राउल उदेसिंग, बासदा संस्थानचा, यानें मानकुन्या हा गांव त्रिंबकरावास इनाम दिला. (पेठे द. ले. ११)

१७५७ जानेवारी ३० मुजफरखानावर फौजेसह जाऊं नये. (पे. द. २८, ले. १६४)

| | |
|---|---|
| १७५७ मार्च ६ | कुलस्वामीच्या दर्शनाकरितां जाणार तरी विजयदुर्गादिक स्थळीं जाऊन किले कोट आरमार यांचा बंदोबस्त पहावा म्हणून पेशव्याची सूचना. पोर्तुगीज लोक शेजार-धर्म पाळीत नाहींत अशी तक्रार. ( पे. द. ३९, ले. ११५ या पत्राची तारीख ६ मार्च १७५७ अशी पाहिजे. ) याच सुमारास त्रिंबकराव मर्दनगडावर होता, ( सरदेसाई स्मारक ग्रंथ पान ३५ पहा ) असा अन्य पुरावा आहे. ( पेठे दप्तर लेखांक १२ पहा.) |
| एप्रिल १८ | कवडींची जागा पुण्याहून लांब, तेव्हां पुण्यास या. ( पे. द. २३, ले. ८० ) |
| जून २१ | मामाही येथें (पुण्यास) आले आहेत. (पुरं. १,ले.३७६) |
| १७५८ एप्रिल २४ | हरिद्वाराहून सत्रा कावडी आल्या त्या पुण्यास रवाना केल्या. त्यांची नीट व्यवस्था लावावी अशी त्रिंबक-रावास पेशव्यांची आज्ञा. ( पे. द. १८, ले. १२९ ) |
| ऑक्टोबर १७ | नाशिक येथील वाड्याच्या जागेची खरेदी. ( पेठे द. अप्रका. ) |
| १७५९ फेब्रुवारी २८ | सिके कटार सासवडास नाना पुरंधरे यांचे घरीं आहे, ती घ्यावी व याल तेव्हां त्यांच्याकडे परत करावी. ( राज-वाडे ६, ले. १७५८ ) |
| मार्च ४ | सिके कटार मिळाली, आश्रयो परत करूं. ( राजवाडे १, ले. १२७ ) |
| मार्च १५ | सातारा किल्ल्यावर गडकरीयास चढी लावून मामा मोज-दादेस वर जात होते; ते मना गडकरियानी केली. याणी मातुश्रीस पुसल्यावर पारपत्य करावे हे बोलली... मामानी आदीच चौक्या बसविल्या ( पुरं. १, ले. ३६९. या पत्राचा पुढील भाग म्हणजेच ले. ३६८ होय. या सबंध पत्राची तारीख मूळ संपादक चुकले, नंतर रा. ग. ह. खरे यांनीं ती सुधारण्याचा प्रयत्न केला. त्या पत्राची खरी ता. १५ मार्च १७५९ ही आहे. ) |
| सेपटेंबर २४ | माहुलीस असलेल्या छ. शाहुमहाराजांच्या वृंदावनाची व्यवस्था लाविली. |
| ऑक्टोबर १२ | साबाजी शिंदे याचे शिलेदार खोटेपणा करून पळाले. त्यांस पकडून त्याजपासील माल उगवून घेणें. ( राजवाडे ६, ले. १७५९ ) |

१७६० फेब्रुवारी २६ श्रीमंत भाऊसाहेबांनीं मोगलास जर्बेत आणिले; मोगलानें ६० लक्षांची जागीर देऊन सलूक केला. ( भा. इ. सं. मं. त्रै. जून, ले. १५६ )

एप्रिल १ नासिकचे चक्रेश्वराचे पटांगण मामानें सेवटास न्यावें. त्रिंबकेश्वरी पूजा वगैरे बंदोबस्त मामानी नीट चालवावे. ( पे. द. ४०, ले. १३२ )

जून ६ महादाजी गदाधर आमात्य याचा सरंजाम त्याच्या योग्य वारसाकडे चालवावा. ( पे. द. ६, ले. २२३ )

जुलै ९ किल्ले बहुला सरकारांत घेऊन राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ याजकडे दिल्हा असे. ( बा. बा. रोजनिशी १, ले. १०३ )

ऑक्टोबर २४ जलालपुरास बंधारा बांधावा व त्याबद्दल तेथील उरलेल्या पाटीलकीचा निमा भाग त्रिंबकरावास मिळावा म्हणून वतनपत्र. ( पेठे द. ले. १६ )

डिसेंबर २७ वाखरे देशस्त सावकार याची कन्या नोवरी पाहून त्रिंबकरावमामाचे विद्यमाने श्रीमंती लग्न केलें. ( पुरं. ३, पान ११३ ) व ( पे. द. २, पान १६२ )

१७६१ मे २९ राजश्री त्रिंबकरावमामा श्री ( रामेश्वर ) यात्रेहून आले. त्याही सांगितलें आजीजखान जगदेव सरकार तालुक्यास उपद्रव देतो. ( पे. द. २१, ले. २०३ )

जून ६ माधवराव विश्वनाथ पेठे यास पत्र ( पेशव्याचें ) द्यावे हा हेत होता परंतु गुंत्यामुळें योग न घडे. ( पे. द. २१, ले. २०४ )

जून १४ राजश्री त्रिंबकरावमामा कोकणांत गेले. ( हिंगणे १, ले. २८९ )

जुलै ४ पेशवाईची वस्त्रें घ्यावयाचा मुहूर्त आहे. त्रिंबकरावमामा सातारा आहेत. ( राजवाडे १, ले. २८९ )

ऑगस्ट मोगलाकडील दाटीचे वर्तमान आहे तुम्ही बहुत चौकसीनें सावध असणें असें त्रिंबकरावाचें पत्र. ( पे. द. ३८, ले. २३ )

ऑगस्ट २१ चिंचणेर व चिंधोली हीं गांवें मामास इनाम मिळालीं. ( पेठे द. अप्र. )

ऑगस्ट २७ घाटाखालीं फौज पाठवावयास राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यास आज्ञा. ( पे. द. ३८, ले. २२ )

ऑक्टोबर १८ ' ऐवजाची ओढ फार म्हणून पुण्यास टंकसाळ घालावी. पातशाही शिक्का करावा; रुपये, अधेल्या कराव्या, सरकारी सोन्यारुप्याचे दागिने, भांडीं मोडून मोहरा पाडाव्या ', म्हणून माधवराव विश्वनाथ पेठे यास आज्ञा. (इ. सं.पे.टि. २-४) सरकारी पोतनीसी व जामदारखाना याची घालमेली कोणी न करावी येविसी दरम्याने बोलीचालीस विद्यमान रा. बाबूराव सदाशिव व बाबूराव फडणिस व त्रिंबकराव विश्वनाथ. ( पुरं. ३, ले. १४ )

१

डिसेंबर ११ माधवराव विश्वनाथ पेठे पेशव्यास कळवितो कीं 'खजिना पुरंदरास रवाना केला आहे. जामदारखाना व सिलेखाना सिंहगडीं पाठविला.' ( पे. द. ३८, ले. ३९ )

१७६२ जानेवारी ६ सखाराम बापूनें राजीनामा दिला; परंतु अंतःकरणापासून नाहीं पेचांमुळें म्हणतात. ( खरे भाग १, ले. ५४ )

जानेवारी ६ ' आम्ही कारभारी होत नाहीं. दादांत कर्तेपणा नाहीं. क्रोड–दीडक्रोड रुपये कर्ज, कोणास कोणाचा विश्वास नाहीं. तरी सखाराम कारभारी करणे मनापासून तरी दादासाहेब जाणोत, दौलत सखाराम जाणो. तो राव-साहेबास एखादे प्रसंगी दगा करील, ' असें त्रिंबकरावाचें गोपिकाबाईस पत्र. ( खरे भाग १, ले. ५५ )

जानेवारी ८ बापूनें राजीनामा दिल्यावर बाबूराव व त्र्यंबकराव यांस कारभार सांगितला. तीन दिवस केल्यावर ' आम्हांस मसलत सांगत जावी ' असें तो दादास म्हणाला. उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीस जाण्याची रघुनाथरावाची मस-लत त्रिंबकरावानें फेटाळली. ( खरे भाग १, ले. ५८ )

जानेवारी ८ उरुळीच्या तहाच्या अटी त्रिंबकरावमामा, बाबूराव, गोपाळराव, बाबूजी नाईक वगैरेस पसंत नसतां, दादा व बापू यांनीं पसंत केल्या. ( ऐ. प. व्य. ले. १०३ )

जानेवारी १४ कारभार चांगला करीत नाहींत असा बापूवर आरोप. हल्लीं बाबूराव व मामा कारभार करितात असें वेणूबाई अनुबाईस कळविते. ( इचल. ले. ६२ )

फेब्रुवारी ५ ' दादाचा विरोध झाला तरी आपण आमच्या पक्षास मिळावें ' असें मामा व बाबूराव पेशव्यास शफतपूर्वक सांगा म्हणून म्हणो लागले. माधवरावास तशी शफथ मान्य नव्हती. ( खरे भा. १, ले. ५९ )

फेब्रुवारी २१ त्रिंबकरावांनीं कारभार मान्य केला व उभय चिरंजीव तुमच्या गोष्टी मान्य करितील' असें गोपिकाबाईनें दादास लिहिलें. तेव्हां दादा कळवितो कीं 'सद्यां गाडा चालू करावा, पुण्यास आल्यावर निशा वडिलां-देखत होईल.' ( खरे भाग १, ले. ६० )

फेब्रुवारी २१ गोपिकाबाईनें समझोत्याच्या अटी दादा व माधवराव यांचेकडे पाठविल्या. ( खरे भाग १, ले. ६१ )

फेब्रुवारी २२ त्रिंबकरावमामा येथें आल्यावर अटींप्रमाणें आम्ही वागूं असें माधवराव लष्करांतून आईस लिहितो. दादानें कांहीं विपरीत मजकूर लिहिला तो लिहूं नका असें पेशव्यानें त्यांस सांगितलें तरीही त्यानें लिहिलेंच. ( खरे भाग १, ले. ६२ )

फेब्रुवारी २७ बाबूराव पुण्यास कारभार करतात, त्रिंबकराव मामा वडुतावरून लष्करास गेले असतील. त्याणी कारभार करावा ऐसा करार आहे. ( पे. द. ३७, ले. ४ )

मार्च २ रा. त्रिंबकराव मामा लष्करांत गेले अद्यापि पावलियाचे पत्र आलें नाहीं. ( पे. द. ३७, ले. ३. या पत्राची तारीख चूक आहे; ती २ मार्च १७६२ पाहिजे. )

मार्च १९ त्रिंबकराव लष्करांत आले; त्यांची खातरनिशा पुरविली. होळकर देशी आले. ( खरे भाग १, ले. ६३ ). रघुनाथराव पुण्यास परत गेले.

मार्च २२ ( १ ) मामानीं कारभार स्वीकारला. 'जातीनें लोभ नाहीं परंतु श्रीमंतांचें अन्न फार दिवस खाल्लें. कठिण काळीं सोडिली तर अन्न भक्षिल्याचें सार्थक होणार नाहीं. सर्व प्रकारें कारभाराची सोय नाहीं. तुम्ही नाहीं तर मीही नाहीं; परंतु दुर्लौकिक व नाकर्तेपण येऊं नये' असें त्रिंबकराव बाबूराव फडणिसास लिहितो. ( खरे भाग १, ले. ६५ )

( २ ) त्र्यंबकरावाची रीत, शहाणपणा, निखालसता, खावंदांचें कार्याकरितां जपणें, मेहनत करणें, युक्तीस मनसुब्यास न चुकणें यांची निशा पुरली असें माधवराव आईस लिहितो. ( खरे भाग १, ले. ६४ )

( ३ ) त्रिंबकराव दादास लिहितो 'सेवकाचें स्वरूप पाहोन

उत्साहभंग न होता स्वामींचे कृपेंत, ममतेंत, वचनांत अंतर न दिसे ते करावे. ( खरे भाग १, ले. ६६ )

एप्रिल ९ सर्वांचे चित्त राजश्री त्रिंबकरावमामानीं कारभार करावा. कर्नाटकप्रांतीं श्रीमंत पंतप्रधान स्वामीसमागमें जाऊन तिकडील मनसबा उत्तमरीतीनें सिधीस नेला. ४०।४५ लक्ष रुपये मेळविले. ( हिंगणे २, लेखांक ४९ )

जून १५ दादांचे डेरे बाहेर जालेच आहेत, जाणार म्हणतात. गोपिकाबाईनें आजपर्यंत जाऊं दिलें नाहीं. तिची व माधवरावाची ममता आमचे यजमानावर व बाबुरावावर पुर्ती आहे असें वेणुबाई अनुबाईस कळविते. ( इचल. ६४; या पत्राची तारीख येथें दिली तशी पाहिजे. )

जून १३ श्रीमंत माधवराव स्वारीहून ( कर्नाटक ) रात्रौ घरास आले. ( पुरं. ३, पान १०७ ) त्यांच्याबरोबर अर्थात त्रिंबकरावही आला.

जून २६ आज चार रोज डोहणा पडला आहे. दादा म्हणतात दौलत दो जागा करावी, आम्हास येकत्र रहावयास अनुकूल पडत नाहीं. रावसाहेब म्हणतात आम्हास दौलत लागत नाहीं, आपण वडील सर्व कारभार करावा. सखारामपंत या मसलतींत नाहीं, ते रावसाहेबाकडे आहेत. सचीव म्हणतात करावा तर कारभार, नाहींतर दोन करावी. ( पेठे द. ले. १९ )

जुलै ३ ( इचलकरंजी लेखांक ६६ याची तारीख ३ जुलै १७६२ अशी पाहिजे; खऱ्यांनीं ती ३ ऑगस्ट १७६२ अशी दिली आहे. त्या महत्त्वाच्या पत्रांतील सारांश असा.) गोपिकाबाई व पेशवा त्रिंबकरावानें कारभार करावा असें म्हणतात. कारभाऱ्यांनीं दोन पक्ष करून घर फोडले असा आरोप येईल म्हणून कारभार नको असें त्रिंबकराव म्हणाला. सर्वांनीं दादाची गाठ घेतली. तेव्हां त्रिंबकरावानें स्पष्ट शब्दांत दादाची उघाडणी केल्यानें मामानें व बाबूरावानें कारभार करावा, मी सुचेल तें सांगेन असें दादा म्हणाला. यावरून सर्वांस ठीक झाल्यासारखें वाटलें. ( इचल. ले. ६६ )

ऑगस्ट २२ दादासाहेब रुसोन वडगांवास गेले..दादाची '५ किले व दहा लक्षांची जागीर स्वदेशीं देणें अशी मागणी होती, ती पेशव्यानें मान्य केली नाहीं. ( इचल. ६७; खरे ६८, ६९ ) बापूही मागाहून गेले. तीन दिवस तेथें होते. माधवराव, मामा, होळकर समजावयास गेले; परंतु दादा आले नाहींत.

ऑगस्ट २३ गोपिकाबाई वडगांवास दादास समजावयास गेली. दादांनीं 'येतो' असें सांगितलें. परंतु त्यानंतर दुसरें दिवशीं एकाएकीं कोरेगावचे मार्गें निघोन गेले. ( खरे भाग १, ले. ६८ )

ऑ. २४-२५ दादाचा तपास. मामानीं वडगांवास जाऊन गोपिकाबाईस पुण्यास आणले; 'पळत्याच्या पाठी लागल्यानें परिणाम नाहीं' असें मामा म्हणाले. होळकरानें आपणास मदत करावी अशी त्यास विनंती. ( किता )

सप्टेंबर ३ मामा, राऊ, होळकर वगैरे सर्वांनीं एकमत होऊन दौलत सांभाळावी, जे गेले त्यांच्यानें काय होणार ! दुही तुटली. सर्व बंदोबस्त नीट राखून जरबेनें कारभार करावा असा गोविंद हरीचा उपदेश. ( खरे भाग १, ले. ६८ )

सप्टेंबर ते बाहेर अनायासे गेले, पक्षच्छेद केल्यावर कुंठित होऊन परत येतील. कारभाऱ्यांनीं हिंय्या करून कारभार करावा. ( खरे, भाग १, ले. ६९ )

सप्टेंबर २६ सखाराम सर्व नाश करावया निर्माण जाहला आहे. एक दोघा तत्पक्षीयास जरबेंत आणिल्यास दबा बसेल. परंतु कार्यभागी ( म्हणजे मामा व बाबूराव ) ढिसाळ, असें गोविंद हरी लिहितो. ( खरे भाग १, ले. ७१ ).

ऑक्टोबर ६ त्रिंबकरावास जव्हारकरांकडून देवरगांव हा गांव इनाम मिळाला; कारण त्यानें त्याची जव्हारवर पुन्हां स्थापना करविली. ( पेठे द. ले. २० )

नोव्हेंबर ८ मुख्य श्रीमंतांनीं व मातुश्रींनीं करार शपथपूर्वक त्रिंबकराव व बाबूराव यासी वचनें दिल्हीं. ( खरे भाग १, ले. ८६ )

नोव्हेंबर ७-१२ घोडनदीची लढाई; माधवरावाचा पराभव; चुलते-पुतण्यांची भेट.

| | |
|---|---|
| नोव्हेंबर २० | त्र्यंबकराव मामा व बाबूराव फडणिस 'सिंहगडास गोपिकाबाईकडे जा' असें माधवराव सांगत असतां ते बारामतीस बाबूजी नाईकाच्या आश्रयास गेले. ( खरे भाग १, ले. ९४ ) |
| नोव्हेंबर | दादानें त्रिंबकरावास व बाबूरावास पकडून आणण्याकरितां २००।३०० राउत पाठविले. आबाजी नाईकांनींही वाडा खबरदार केला व जबरदस्ती केली तर वाडा झुंजवूं व त्रिवर्गांनीं ( त्रिंबकराव, बाबूराव व आबाजी ) मरावें पण हातीं लागू नये असा करार केला. ( खरे भाग १, १०३ ) पुढें अब्रूस धक्का लावणार नाहीं असें दादानें वचन दिल्यावर सर्व पुण्यास दादास भेटले, मात्र दादांनीं त्रिंबकरावाचा बहुतेक सरंजाम जप्त केला. |
| नोव्हेंबर | बाबूराव व मामा यांजकडे समाधानाचीं पत्रें पाठवावीं असें गोविंद हरि गोपाळरावास लिहितो. ( खरे भाग १, ले. १११ ) |
| डिसेंबर ५ | त्रिंबकराव मामाच्या पत्रांत अवसान नाहीं. ( खरे भाग १, ले. १३४ ) |
| १७६३ जानेवारी | त्रिंबकराव लष्करांत सुखरूप आहेत; बाबूराव फडणीस बारामतीस आहेत. ( खरे भाग १, ले. १४६ ) |
| मार्च ७ | गेल्या खेपेस निजामास मिळाल्यानें माझ्यावर गहजब झाला; तरी या खेपेस कोणास मिळावे असें जानोजी त्रिंबकरावास विचारतो. ( पे. द. २० ले. १४० या लेखाची तारीख येथें दिली तशी पाहिजे ) |
| एप्रिल १ | प्रस्तुत पेचांत आहोत सर्व प्रकारें लौकिक रक्षिण्याविषयी चिरंजिवाची ( मोंगलाकडे ! ) सोय करावी असें गोपाळरावास सुचवावें असें त्रिंबकराव गोविंद हरीस लिहितो. ( खरे भाग १, ले. २१६ ) |
| मे २ | नारायणराव पेशवे यांच्या लग्नाकरितां मामा सिंहगडावर होता. तिकडे गोपाळरावाकडील कांहीं माणसें आलीं व धरलीं गेलीं; तेव्हां त्यांस मामा, नाना पुरंदरे, नारो आपाजी वगैरेंनीं युक्तीनें सोडविलें. ( खरे भाग १, लेखांक २५१ ) |

| | |
|---|---|
| मे ४ | आम्ही राजमाचीस केवल डोंगरांत, तरी मोंगलाची बातमी कळवावी असें त्रिंबकराव रामशास्त्र्यास लिहितो. (पे. द ३८, ले ९१) |
| मे ३१ | नाशिकचें आमचें घर व जलालपूरची जिंदगी आहे, तरी गोपाळरावाच्यातर्फे विठ्ठल सुंदरला सांगून ती बचेल असें करावें असें त्रिंबकराव गोविंद हरीस विनावितो. (खरे २, ले. २९५) |
| सप्टेंबर १७ | रेवदंड्यास समुद्रस्नानाकारितां त्रिंबकराव गेला होता. तिकडे त्यानें रघोजी आंग्रे याची भेट घेतली. (आंग्रे. अष्टा. ले. २६३) |
| डिसेंबर १२ | आम्हा भावांची वाटणी करून द्यावी अशी माधवराव पेठ्याची पेशव्यास विनंती (पे. द. ३९, ले. १९) त्याप्रमाणें ता. १४ जून, १७६४ रोजीं दोन्ही भावांची विभक्तता होऊन माधवरावास सरंजामापैकीं तिजाई सरंजामाचा ऐवज त्रिंबकरावानें देण्याचें मान्य केलें. |
| १७६४ जानेवारी ५ | दादानीं नाशिक–त्रिंबकला जाऊन राहण्याचा विचार कायम केला. त्यांच्याबरोबर शिवराम गोविंद व त्रिंबकराव विश्वनाथ जाण्याचें ठरलें. (खरे ३९६) |
| मार्च २ | हैदरनें चिकबाळापुरास मोर्चे लाविले. मदत केल्यास मुरारराव हैदरवर चालून जाईल असें वर्तमान त्रिंबकरावास विसाजी बाबूराव कळवितो. (पे. द. ३७, ले. २५) |
| मार्च १६ | मामा व गोविंद शिवराम व आबा प्रस्तुत वडिलांजवळ आहेत त्यास काय काय घाटत आहे तें कळवावे. (खरे, ४१३) यावरून दादा वगैरे मंडळी मार्च महिन्यांतच नाशिकास गेली असावी. |
| मे ४ | त्रिंबकराव गोपाळरावास रघुनाथरावाचा नाशिक येथील जीवनाचा आढावा वर्णन करून सांगतो. तेथें सर्व होळकर मंडळी जमा झाली आहेत. आम्हास संसारनिर्वाहाचें संकट प्राप्त जाहलें ! (खरे, ले. ४२८) |
| मे ४ | त्रिंबकराव गोविंद हरीस लिहितो 'कुंडे घालून संकल्प करावा इतक्यांत त्यांनीं कुंडेच गंगेंत टाकिलीं, मनस्वी कारभार. पत्या किल्ल्याच्या चौकशीस जाणार. गोपिकाबाई जलालपुरास आमचे घरीं आहे.' (खरे, ४२९) |

मे १७ 'सर्व सोडून गंगातीरीं कालहरण करीत आहों. येथें सर्व क्रिया श्रीमतांची आहे तैशीच आहे' असें त्रिंबकराव गोपाळरावास लिहितो. ( खरे, ४३१ )

मे २० ! 'पुरंदरमुळें फारच विकल्प विपरीत दर्शवितात; चित्तांतही येऊन मनस्वी भाषण श्रीमंत ( दादा ) करितात. सर्व दौलतीचा कारभार येथील कारभारी ढवळीतच आहे' असें तिंबकरावाचें पत्र. ( खरे, ४३३ )

मे ' तुमचीं पत्रें मामाकडे पाठविलीं, ती पाहून त्यास संतोष झाला.' असें गोविंद हरी गोपाळरावास कळवितो. ( खरे, ४३५ )

जून २८ विरेपट्टण घेतल्याबद्दल त्रिंबकरावास पत्र. ( का. सं. प. या. २०३ )

जुलै १८ मामाच्या बिऱ्हाडी जाऊन तेथें नानाची जशी पाहिजे तशी खातरजमा करून देणें म्हणून दादाचें पत्र. ( पेठे द. २३ )

जुलै २५ मामाच्या घरीं जात जावें, सर्वांस राजी रक्षावें. ( पेठे द. २४ )

ऑगस्ट २८ 'सातारचा बंदोबस्त ठीक नसल्यास वडिलांस विनंती करून दौलतीस उपयोगी पडे ऐसा बंदोबस्त करावा.' असें पेशवा त्रिंबकरावास लिहितो. (राजवाडे १४, ले. ३७)

ऑगस्ट २१ आनंदीबाईस पुत्र झाला. सबब मामानें मोहोर १ नजर केली. ( मा. रो. १, ले. १०७ )

सप्टेंबर १६ मामाच्या सरंजामावरील जप्ती बरीच उठविली.

ऑक्टोबर २३ दादानें सांगितल्याप्रमाणें मामानें पेशव्यास पत्रें लिहिलीं. तेव्हां पुरंदर कोळी प्रकरणांत पेशव्याने कौल दिला. त्यामुळें आबाचा दुर्लौकिक झाला. ( पेठे द. २९ )

नोव्हेंबर ८ ' दादा कोठें आहेत. श्रीमंतांनीं धारवाड किल्ला घेतला ' वगैरे हकीकतीचें त्रिंबकरावास पत्र. ( राजवाडे १४, ले. १३ )

नोव्हेंबर तोतया खरा कीं खोटा हें पाहण्यास त्रिंबकराव गेला असतां त्यानें मामास ओळखिलें नाहीं. ( इचल. ले. ८० ) सबब तो खोटा असें त्रिंबकरावाचें मत.

नोव्हेंबर २३ दादासाहेबांचा काल मुक्काम ... होता. रावसाहेबांच्या कुमकेस जातात. मामाही सभागमे आहेत.

| | |
|---|---|
| | ( इचल. ले. ८२. त्या पत्रांत उल्लेखिलेला आबा हा विश्वासराव होय; खरेशास्त्री अमृतराव समजतात तें चूक आहे. ) |
| नोव्हेंबर २६ | 'राऊतांचा रोजमरा ठरविल्याप्रमाणें करावा, मामांच्या बरोबर कांहीं आहेत' असें रघुनाथराव नाना फडणिसास लिहितो. ( पेठे द. ३१ ) |
| १७६५ फेब्रुवारी २४ | त्रिंबकरावमामा पुरंदर किल्ल्यावरील जामदारखाना मोजण्यास गेले. प्रथम २।४ दिवस अटकाव झाला नाहीं. पुढें त्यास वर घेतलें नाहीं. ( पुरं. ३, ले. ७८ ) |
| जून १६ | मामा पंढरीस आहेत. येथून श्रमिंतांचें बोलावणें गेलें आहे. ( खरे ५७५ ) |
| सपटेंबर ३० | त्रिंबकरावाचें घरीं माधवराव पेशवे जेवावयास आले. |
| नोव्हें—डिसें. | माधवरावासारखा कर्ता दुसरा नाहीं; याजला सोडूं नये असे चित्तापासून परंतु दादाकडील कल आम्हास जरूर राखावा लागतो. दादा लगामी लागेना गोविंद सिवराम व मामा दादाजवल आहेत. ते बहुत खटपट करितात, परंतु तेथें कांहीं होत नाहीं, असें बापू विठलभटास लि॥ ( पे. द. ३९, ले. ६१. हें पत्र सन १७६४ च्या जून-जुलैमधील असावें. ) |
| डिसेंबर ८ | मामांची पत्नी बरीच आजारी. ( पेठे द. ले. ४२ ) |
| फेब्रुवारी १८ | राजश्री दादासाहेब हिंदुस्थानावर दबाब देण्यासाठीं निघाले. समागमे त्रिंबकरावमामा कारभारी आहेत. ( हिंगणे २. ले. ४३. पत्राच्या पैवस्तीची तारीख फेब्रुवारी १८ १७६६ अशी पाहिजे. संपादकांनी दिलेली चूक आहे.) |
| १७६६ मार्च ३० | रघुनाथरावाचा दरबार झाला, सव्य हस्ताकडे आम्हीं, डावीकडे त्र्यंबकरावमामास बसविले. ( पे. द. २१, ले. १६१ ) |
| ऑगस्ट ८ | मामाचीं पत्रें आलीं, त्यांचा सरंजाम करावा ( पे. द. २९, ले. १५१ ) ( याप्रमाणें मामांचीं बहुतेक सर्व इनामी गांवें जप्तींतून सोडविण्यांत आलीं. त्यांत नरडाणे, दभासी, दसवेली, वडाली, जातोडे वालखेडे, कलबाऊ, कंचनपूर, वणजारपूर, गाधली, तामसवाडी वगैरे गांवें होतीं. ) |

१७६७ जानेवारी १ झांशीहून कल्पीस मामा गेला. प्रकृती ठीक नव्हती, तरी स्वामीकार्याची कार्यसिधी होईल असें तो दादास लिहितो. (पे. द. ३९, ले. ८१)

ऑगस्ट २७ मामा व नाना (राजेबहादर) हंड्याच्या मार्गे देशास गेले असें ऐकतो. (पेठे द. ले. ४९)

सप्टेंबर २३ त्रिंबकरावमामा व बालाजी गोविंद फौजेसह छत्रपुरास आले. (पेठे द. ले. ५०)

ऑक्टोबर १२ त्रिंबकरावानें हिंदुपतची भेट घेतली. (पेठे द. ले. ५१)

नोव्हेंबर १ जाटाचे सर्व वर्तमान मामा पाहून गेले आहेत ते सांगतील. (पे. द. १९, ले. १९२)

नोव्हेंबर २ मामा सेना जमा करून काल्पीस गेले. (पेठे द. ले. ५२)

नोव्हेंबर त्रिंबकरावमामा सुजाउद्दौल्याच्या फौजेबरोबर आहेत. (पे. द. २९, ले. १६३)

१ विलायती वैद्याचे औषधाची व्यवस्था झाल्यास आरोग्य लौकर प्राप्त होईल असें त्रिंबकराव रघुनाथरावास सुचवितो. (पे. द. ३२, ले. १४०. हें पत्र सन १७६४ मधील असावें.)

१७६८ जानेवारी ९ यात्रेनिमित्त झालेल्या कर्जांतून मुक्त करण्याकरितां मामास पेशव्यानीं पंचवीस हजार रुपये बक्षीस दिले. (पे. द. २२, ले. २०९)

मे १४ त्रिस्थली यात्रा करून घरीं आलो, उभयता श्रीमंतांचा विकल्प भासतो, परिणाम उत्तम दिसत नाहीं, असें त्रिंबकराव गोपाळरावास लिहितो. (खरे ७१९)

मे २१ माधवराव धोडपेच्या स्वारीस पांच हजार स्वारासह निघतात. त्यांच्या स्वारींत गोविंद शिवराम, त्रिंबकरावमामा, सखारामबापू वगैरे मंडळी आहेत. (गेनसे व बाणाजीकृत 'बडोद्याचे गायकवाड भाग १' पान १७२)

१७६९ नोव्हेंबर १ श्रीमंत नारायणराव ता. २२ ऑक्टोबरला डेरे दाखल झाले. समागमे कारभारीसाहेब त्रिंबकरावमामा करार होते ते राहिले. (ऐ. प. व्य. ले. १२१)

नोव्हेंबर २७ लष्करांत मामानीं एक उंट रु. ३००स विकत घेतला.

१७७० एप्रिल १४ त्रिंबकरावमामा, आपा बलवंत व बालकोबा तात्या यांपैकीं कोणीतरी छावणीस रहाण्याचा ठराव होईल. (पे. द. ३७, ले. २०५)

| | |
|---|---|
| एप्रिल २४ | त्रिंबकरावानीं प्रकृतिनिमित्य छावणीस राहण्याचें नाकारलें. परंतु त्यांच्याकडे पुन्हां अनुसंधान पेशव्यानें लाविलें. तेव्हां त्रिंबकरावानें कांहीं अटीवर मान्यता दिली. अजून निकाल नाहीं. गोपाळरावानेंही नाकारलें. ( पे. द. ३७, ले. १७० या पत्राची तारीख २४-४-१७७० अशी पाहिजे; पुस्तकांतील तारीख चूक आहे. या पत्राची व लेखांक नंबर २०५ ची पैवस्तीही जुळते. ) |
| मे १ | त्रिंबकरावमामा छावणीस राहावयाचा निश्चय झाला. ( पे. द. ३७, ले. २०७ ) |
| मे ७ | मामा व गोपाळराव यांनीं छावणीस राहण्याचा निश्चय झाला. हुजरातची फौज सात-आठ हजार पावेतों ठेविली. ( ऐ. प. व्य. ले. १२५ ) |
| मे १२ | मामाचा आग्रह न राहावे ऐसे नाहीं, परंतु मनोदयानुरूप साहित्य झाल्यास राहावें असें आहे. तसी मर्जी यजमानाची नाहीं, याजमुळें बनत नाहीं. ( पे. द. ३७, ले. २०९ ) |
| मे १३ | त्रिंबकरावमामा यास छावणीस ठेवणार, उत्तम आहे. परंतु श्रीमंत राहिले असते म्हणजे गोष्ट निराळी. बरें. हेंही उत्तम आहे. ( खरे ९७२ ) |
| मे २५ | त्रिंबकरावमामा छावणीस ठेविलें; मुरारराव, गोपालराव, रास्ते आदीकरून पंचवीस हजार फौज ठेविली. ( पे. द. ३७, ले. २१० व ले. २२८. या दुसऱ्या पत्राची मुळांत दिलेली तारीख चूक असून ती २६ मे, १७७०, अशी पाहिजे. ) |
| मे ३० | त्रिंबकरावमामा बोलावितात ते समयीं जातो, पुसतात तें यथामतीनें सांगतो. पुढें होईल तें लिहून पाठवूं. ( खरे ९७६ ) |
| मे ३० | मामांनीं बोलाविलें. त्यांजकडे गेलों. ते म्हणाले सर्वांनीं एकविचारें रहावें. सर्वांच्या मतें ठरलें कीं निलगड, पावागड वगैरे तालुक्यांत पंधरा दिवस गुजराण करावी. ( खरे ९७७ ) |
| मे ३१ | नंदीगडाव्यातिरिक्त संपूर्ण संस्थान चिकबाळापुरकरांस द्यावें. त्यानीं सालाबादप्रमाणें खंडणी देत जावी. ( पे. द. ३७, ले. २११ ) |

जून ११ मामा व रास्ते व आनंदराव गोपाळ छावणीस ठेविले. मामांची मर्जी रक्षून रहावें. ( खरे ९८७ )

जुलै २७ त्रिंबकरावमामांनीं श्रीमंतास गोपाळराव, नीळकंठराव, व परशुरामभाऊ या त्रिवर्गांचे मर्दुमकीविशी फारच लिहिलें. ( खरे १००३ )

ऑगस्ट १९ मामा गुरमकोंड्यापाशीं येऊन उतरले आहेत. मोर्चे लावणार. ( खरे १००८ )

ऑगस्ट २२ त्रिंबकरावमामा गुरमकोंड्यास मोर्चे लावून बसले आहेत. आंत माणूस दोन हजार व शेपन्नास स्वार व दोन-तीन हत्ती आहेत असें म्हणतात. ( खरे १००९ )

ऑगस्ट २५ श्रीमंतांनी हैदरावर स्वारी करण्याकरितां झाडी तोडण्यास कुऱ्हाडी दोन हजार व कुदळया एक हजार तयार केल्या. ( खरे १०१३ ) ( तसेच आणखी उल्लेख ले. १०१८, १०२० मध्यें आहेत. )

सपटेंबर ९ मामांनी गुरमकोंड्यास मोर्चे दिले आहेत. त्यास राजकारणानें किल्ला हस्तगत झाला तर न कळे. नाहींतर जागा तो बिकटच आहे. ( खरे १०१९ )

सपटेंबर १२ मामानीं गुरमकोंड्यास मोर्चे बसविले आहेत. एखादे वेळेस हैदर बाहेर निघून निकड करील. तरी सावध असावें. ( खरे १०२१ )

सपटेंबर १३ गुरमकोंडयाचे मोर्चे खंदकावर गेले. सरकारी तोफांचे बळ थोडकें म्हणून दिवस लागतात. ( खरे १०२२ )

सपटेंबर १९ काळया मृत्तिकेचा तोटा, तोफाही थोडक्या. (खरे१०२८)

सपटेंबर २७ मामानीं गुरमकोंड्यास मोर्चे दिले आहेत. आज वीस दिवस झाले. श्रावण वद्य त्रयोदशीस पेठ घेऊन मोर्चे लाविले. मोर्चे खंदकापर्यंत गेले. खंदकाच्या फक्त एका बाजूस पाणी नाहीं. ( खरे १०२५ व १०२६ )

सपटेंबर २९ गुरुमकोंड्याच्या तळयाचे कोनाचा अर्धा बुरूज उडाला खंदक भरून निघाला. एक सुरूंग किल्ल्याचें भिताड टाकून आंत गेला. ( खरे १०२७ )

ऑक्टोबर २ आंत लोक गडबडले आहेत. गुरें व घोडीं कापून खातात गोरगरीब फार बेजार झाले आहेत. हांडे-भांडें विहिरींत टाकलें. ( खरे १०३१ )

ऑक्टोबर ५ त्रिंबकरावांनीं 'यवनास जरबेंत आणून पुरतें पारपत्य करावें, देव ब्रह्मणांची स्थापना करावी, संस्थानें सोडवावीं असें लिहिलें. ते योग्यच. मीररेझाचा अर्थ लिहिला. तो आला नाहीं.' ( खरे १०३५ )

ऑक्टोबर ११ गुरमकोंड्यास मोर्चे लावून सव्वा महिना झाला. जेरीस येत नाहीं. भारी तोफा असत्या तर स्थल लौकर हातीं लागतें. ( खरे १०३६ )

ऑक्टोबर ११ गुरमकोंडा जिंकल्यानेंच सर्वांच्या कर्तेपणाचा ठसा व प्रधान यांचा नक्षा हा मामांचा आशय. ( खरे १०३८ )

ऑक्टोबर २१ गुरमकोंड्याचें काम मातबर झालें, सर्वांनीं छावणीस राहिल्याचें सार्थक झालें. तुम्हास देशीं जाण्यास आज्ञा देऊं. ( खरे १०४४ )

ऑक्टोबर २६ दिपवाळीचें प्रतिपदेस किल्ले गुरमकोंड्यावर मराठ्यांचे निशाण चढलें. गुरुमकोंड्याहून सारी फौज व्यंकटेशास जाणार. ( खरे १०४७ )

नोव्हेंबर ११ 'सध्यां जाऊं नये. ही वेळ नाजूक प्रसंग चुकल्यास आजपर्यंत केलें तें व्यर्थ होऊन वेडेपण पदरीं येणार' असें मामानें गोपाळरावास कळविलें. ( खरे १०५८ )

नोव्हेंबर २१ त्रिंबकराव मामानीं गुरुमकोंडा सरकारांत घेतला; पुढें तिर्पतिकडे स्वारीस गेले. ( पे. द. ३७, ले. २१९ )

नोव्हेंबर २६ 'त्रिंबकराव मामानीं गुरमकोंडा घेतला त्यात पांचसे घोडे व हत्ती च्यार व्होन दोन लक्ष येणे प्रमाणें जाहले' ( पुरं. ३, ले. १७३ )

डिसेंबर १९ प्रकृतीचें निमित्त करून आपण इकडे येत नाहीं असा मामाने पेशव्यास टोमणा मारिला. प्रकृति ठीक नाहीं म्हणूनच स्वारीवर येत नाहीं हेंच खरें असें पेशव्यानें उलट कळविलें; 'मी आल्यानें चहूं महिन्यांत मसलत शेवटास जाण्याऐवजीं आठ महिन्यांत जाईल असें त्यानें उलट मामास लिहिलें', ( खरे १०६२ ) शत्रूचें पारिपत्य यथास्थित केल्याशिवाय चैन पडणार नाहीं. ( खरे १०६३ )

डिसेंबर १२ त्रिंबकरावमामाचा निरोप घेऊन या प्रांतास आलो असें गोपाळराव कळवितो. ( खरे, १०६४ )

डिसेंबर १२ हैदरच्या जिव्हाळ्याचा मुलूख अमेल तो प्रथम मारावा असें पेशवा मामास लिहितो. ( खरे १०६५ )

डिसेंबर — गोपाळराव निघून गेल्यानें मामानीं श्रीमंतास चार बंद लिहून त्यांत त्याची नालस्ती लिहिली ! गुरुमकोंडा सर केल्यानें फारच हावभरी झाले आहेत. कोणी माणूस खातरेत नाहीं. ( खरें १०६८ )

डिसेंबर— 'मामा छावणीस राहिले येणेंकरून फार सांभाळिलें. त्यांच्या एक दोन गोष्टी फारच चांगल्या आहेत. पुढेंहि त्यावरच काम आहे. त्यांच्या मदतीस अप्पा बलवंत व मलबास पाठवितो' असें पेशवा मातोश्रीस लिहितो. ( खरे, १०६९ )

डिसेंबर त्रिंबकरावमामांनीं आपणाकडून (गोपाळरावाबद्दल वाईट) लिहावयास आळस केला नाहीं. ( खरे, १०७३ )

डिसेंबर ३० गुरमकोंडा फत्ते झाला त्यामुळें मामास फारच गर्व होऊन मनुष्य तृणप्राय झालें आहे. ( खरे, १०७४ )

डिसेंबर ३० " सर्वांनीं अधिकोत्तर मेहनत एक दिल होऊन करावी. इंग्रजांची मदत मिळाल्यास ठीकच, न मिळाल्यास खांद्यावर भाला टाकून तमाम मुलुख पालथा उलथा घालूं. घाटाखालींहि फौज उतरून तोही प्रांत मारून ताराज करूं ! तो कोणीकडे धावेल. तरी भरंवसा आपला धरितों. आपल्यावर मदार आमची " त्रिंबकरावाचें गोपाळरावास पत्र. ( खरे, १०७५ )

१७७१ जानेवारी— 'मामानीं प्रथम निरोप दिला; मागती न जाणें म्हणून निरोप पाठविला. तुम्ही हेका धरून आला ये गोष्टीचें विषम श्रीमंतांस वाटेल.' असें गोविंद हरी गोपाळरावास लिहितो. ( खरे, १०७९ )

जानेवारी— 'पाहिली फौज व येणारी फौज अशी सारीच फौज छावणीस रहावी व मातबर कामें करावीं अशी श्रीमंतांची इच्छा आहे असें मामा म्हणतात हें खरें कीं खोटें कळत नाहीं.' ( खरे, १०८१ )

जानेवारी २५ राजश्री मलबा बापू व कृष्णराव बलवंत याजबरोबर दहा हजार फौज व तोफखाना देऊन मामाकडे रवाना केला खासा स्वारी मागती पुणियास माघ शु॥ ५ दाखल झाली. ( पे. द. ३७, ले. २२३, २२४. पे. द. २१, ले. २३१ )

जानेवारी २५ मामा बेंगरूळचे सुमारें आले आहेत. हैदरखान पट्टणांत आहे. वामनराव गोपाळरावाची फौज घेऊन मामाकडे जाणार व मलबारही मागाहून पावलेच असतील. (पे. द. ३७, ले. २२३, २२४. पे. द., २२ ले. २३१.)

फेब्रुवारी ७ मामा व वामनराव यांची गांठ ३ फेब्रुवारीस देवरायदुर्गच्या जवळ पडली. मामा सामोरे गेले. 'गोपाळराव आम्हा सर्व ब्राह्मणांत केवल मुगुटमणि होते. ते तो आपल्या वक्रांतच गेले' असें मामा म्हणाले. देवरायदुर्ग मोर्चे लावून घ्यावा असा मामांचा उद्देश. (खरे, १०८६)

फेब्रुवारी १७ "काल छबिना करावा म्हणून चिठी आम्ही पाठविली होती. त्याचें उत्तर आलें कीं 'काल आम्ही छबिना केला, आज करीत नाही तरी हें उत्तर कामांचें नाहीं." असें त्रिंबकरावमामानें वामनरावास लिहिलें. (खरे, १०९०)

फेब्रुवारी २७ छावणीस रहावयाचें असें मामाच बोलतात असें नाहीं, श्रीमंतही तसेंच बोलत होते. (खरे, १०९१)

फेब्रुवारी २४ मामानीं बिदनुराकडे जाण्याचा मनसबा केला आहे, कडूर बाणावरावरून शिवमोघ्याचें रोखें जाणार. (खरे, १०९३)

मार्च ३ सखाराम हरीनें मेलकोटयास जाऊन हैदरअलीची कही मारली व मामास पत्र पाठवून भारी फौजेसह आपण यावें असें कळविलें. (खरे, १०९७)

मार्च– गुरमकोंड्याची मामलत बाजी रघुनाथ यास दिली. त्याबद्दल सखारामबापूनें तक्रार केली. तीबद्दल नाना फडाणिसानें मामाकडे तक्रार गुदरली. तेव्हां मामानें सडेतोड उत्तर देऊन नानास गप केलें. (पे. द. ३७. ले. २२५

मार्च ६ हैदरच्या कहीवर मारा करण्यास मामानें सांगितलें. त्याप्रमाणें त्याची कही मारून तट्टू व बैल पाडाव आणिलें. (खरे, १०९८)

मार्च ७ मोतितलावाची लढाई. हैदरखानाचा पराभव होऊन तो स्वतः कसाबसा जीव वाचवून फक्त ८।१० लोकांनिशी पट्टणास पोचला. त्याची सर्व चीजवस्त त्रिंबकरावाच्या हस्तगत झाली. निळकंठराव पटवर्धन मात्र लढतां लढतां मारला गेला. मामास उजवे कानास गोळी लागली.

(पे. द. ३७, ले. २२६; खरे, ११००, ११०१, ११०२ व ११०३, ११२१; पेठे द. ले. ६० )

मार्च १८ पटणच्या पश्चिमेस कुल फौजेनिशीं फाल्गुन वद्य दशमी सोमवारीं ( म्हणजे ता. ११-३-१७७१ रोजीं) उतरलों. त्रिंबकराव मामानीं शहरामोंवता तलावा करून तोफा लावल्या. ( खरे, ११२२ ) वेढ्याचे वेळीं कोणीं कोठें असावें हें मामानी ठरवून दिलें.

मार्च १८ वर्षप्रतिपदेचे मुहूर्तें पट्टणास मोर्चे लाविले. किल्ल्यांत हैदर, टिपू, मरिफैजुल्ला व आठ-दहा हजार गाडदी व फौज दोन हजार आहे. ( खरे, ११२३ )

मार्च २१ 'तुम्ही तिकडे आहां, तिकडील राजकारणें, मनसुबा, कर्तव्याकर्तव्य करणें न करणें हें तुमच्या चित्तींही येत असेल. पट्टण तो सर्व प्रकारें बळकट. बिदनूर झाडीनें अवघड, आवईनें घेतां सोपें. तरी तें आधीं घ्यावें' असें पेशवा त्रिंबकरावास लिहितो. ( खरे, ११२४ )

एप्रिल— 'त्रिंबकरावमामा साहेब कामास गुंतले असतां नामी सरदारांनीं कसें ( परत ) यावें, वोढींत वोढ करून रहावें' असा पेशवा पटवर्धनास उपदेश करतो. ( खरे, ११३० )

एप्रिल ११ फाल्गुन वद्य दशमीस पट्टणच्या पश्चिमेस किल्ल्यास लगत आलो. मामांनीं संवत्सर प्रातिपदेस उत्तरेस तोफा लागू केल्या. फौजेंत महर्गता फार. तृणाचें संकट. घरावरील कैंबळें आणितात. वस्तीनें कही येतें. ( खरे, १०३२ )

एप्रिल १२ हैदरनें सल्ल्याचें राजकारण मुराररावाच्या विद्यमानें सुरू केलें. हैदरच्या अटी. त्या नापसंत करून रास्त्यानीं भयंकर अटी त्याला सुचविल्या. ( पे. द. ३७, ले. २२७; खरे, ११२८ )

एप्रिल १८ मामा लिहितात 'हैदर फार जेर झाला आहे, त्यामुळें त्वरित फडशा व्हावा.' ( खरे, ११३५ )

एप्रिल २४ पट्टणास सव्वा महिना मोर्चे होते. हैदरनें सल्ल्याची बोली लावली. रास्त्यांनीं त्याच्या अटी अमान्य केल्या. अक्षयतृतीयेच्या दिवशीं पट्टणचा वेढा उठविण्यांत येऊन मोतीतलावाचे मुक्कामीं लष्करें आलीं. मामा व सारी फौज कावेरी लगत असणारीं ठाणीं घ्यावीं म्हणून नदीच्या कांठानें निघाली. ( खरे, ११३६ )

| | |
|---|---|
| एप्रिल | मामा आणखी किती दम धरतील तें न कळे. वैशाख अखेर राहतील, पुढें तों राहणार नाहींत. (खरे, ११३८) |
| मे १० | मामांचे मोर्चे चेन्नरायपट्टणास लागले होते. आठ दिवशीं घेतलें. आतां नरसिंहपुरास मोर्चे लाविले आहेत. ( खरे, ११३९ ) |
| मे १५ | ' या दिवसांत तुम्ही मेहनत करून रस्त आणून पोचवीत नाहीं, ही गोष्ट ठीक नाहीं. यांउपरी पत्रदर्शनी वीसपंचवीस हजार रस्तेचे बैल घेऊन तुम्ही पोहोचणें ' असें पेशवा सखाराम हरीस चापतो. ( पे. द. ३७, ले. २३० ) |
| मे २८ | मामाच्या लिहिण्याप्रमाणें लक्ष्मीश्वराहून २१४ माणसें लष्करभरती केली. ( खरे, ११४६ ) |
| जून | आपाजीराम मामास भेटले, तहाच्या वाटाघाटी झाल्या. सोळा दिवसाचा वायदा करून तो परत पट्टणास गेला. मामांच्या मनांत यंदाही छावणीच करावी. ( खरे, ११४७ ) |
| जुलै ७ | ' आपली पागा येथें चाकरीस आली; त्याचें आम्ही सर्व प्रकारें सांभाळ करूं. यंदां छावणी बहुत कठीण पडली ' असें मामा अनुबाईस ( सासूस ) कळवितो. ( इचल. ले. ९९ ) |
| जुलै १४ | ' धोंडवणाचा विधी एकदां केला. आगांतुकास नित्य दहींपोहे फराळास घालतो. श्रीची सेवा यथाशक्तें करितो अद्यापि पुरता गुण नाहीं. ' असें विश्वासराव ( खरेशास्त्री अमृतराव असें म्हणतात तें चूक ) अनुबाईस कळवितो. ( इचल. ले. १०० ) |
| नोव्हेंबर १६ | चंदावरास महंमद अलीखान यानें वेढा दिला. तेव्हां तंजावरच्या मदतीकरितां त्रिंबकरावमामा फौजेसुद्धां गेले. ( खरे, ११५३ ) |
| नोव्हेंबर १६ | मामा घाटमाथा गेले. या प्रांताच्या रक्षणार्थ पटवर्धन, नरसिंहराव धायगुडे, शहाजी भापकर, कवडे वगैरे राहिले. ( खरे, ११५४ ) |
| डिसेंबर ११ | मामा घाटाखालीं गेले तेव्हां इंग्रजांनीं त्यास १५ लक्ष रुपये देऊं केले; मामा तीस लाख रुपये मागतात. ( खरे, ११५७ ) |

| | |
|---|---|
| डिसेंबर | मामानीं पटवर्धनांस सांगितलें कीं आमचा मार्ग अडविण्यास टिपू घाटाखालीं आला आहे, त्याचें महंमदअल्लीशीं सूत न जमावें म्हणून तुम्ही घाटमाथ्यावर येऊन राहणें. ( खरे, ११६१ ) |
| डिसेंबर | त्रिंबकरावानें वामनरावास कळविलें, 'जगदेव वगैरे बारामहाल हैदरखानाकडून सोडवितो. जगदेवगड वगैरे तीन किल्ले घेतले. महमदअलीखानाच्या मुलखास उपद्रव देत नाही.' ( खरे, ११६२ ) |
| १७७२ फेब्रुवारी २ | मामाच्या अनुमतें माधवराव सदाशिव व महंमदखानाचे वकील इंग्रजांच्या मदतीबद्दल आले. इंग्रजांनीं कुमकेस न जावे, हैदरास करू नये व आपल्यालाही करूं नये असा तह ठरला. ( का. सं. प. या. २२७ ) |
| मार्च १८ | मामा घाटावर आले. त्यांच्या व पटवर्धनांच्या भेटी झाल्या. (खरे, १०९५, या.लेखाची खरेशास्त्र्यांनीं दिलेली तारीख चूक असून ती तारीख ८-३-१७७२ अशी पाहिजे. छ ५ जिल्हेजी मामांच्या भेटी झाल्या. म्हणजे १०-३-१७७२ रोजीं, असें ११६४ लेखांकांत वर्णन आहे. ) |
| मार्च १२ | मामा घाटाखालीं गेले ते फजीत पावोन मात्र आले! आम्ही मात्र येथील ठाणीं कळेल तशीं राखिलीं. वैशाख मासी देशी येतो. ( खरे, ११६५, ११६७ ) |
| मार्च १२ | 'तहाबद्दल सूत्र लागलें. परंतु मामांच्या मतें देशास यावें असें नाहीं. त्यांनीं कां जावें! चाळीस हजार फौज, तोफखाना वगैरे सरंजाम श्रीमंतांची दौलत येथें. नित्य रागरंग नाच हाच प्रकार. घरीं आल्यास हें कोठें आहे! बरें घर तरी नीट कोठें आहे! मुराररावाच्यातर्फे सलूक होणार. त्याचें विचारें श्रीमंतांचें कल्याण व्हावें हें किती आहे तें माहीतच आहे!' असें परशुरामभाऊ लिहितो. ( खरे, ११६६ ) |
| मार्च | मामांस श्रीमंतांचीं पत्रें गेलीं कीं "सल्ला हरकसाही करून लौकर येणें." हैदरखानाकडून अटी आल्या आहेत. ( खरे, ११६८ ) |
| मे ७ | सलूक करणें अशी आज्ञा. तें प्रमाण मानून सलूक ठरला. हा तह दोन वर्षे मेहनत केल्यासारखा न जाहला. |

स्वामीस शरीरीं सावकाश नाहीं या चिंतेनेंच हा तह घडवून आणला. सर्व खंडणी पुरेपूर येईतो त्याच्या मुलखांतच आपली फौज ठेवावी. हाच उत्तम मार्ग. लबाडाशी लबाड होणें पाप नाहीं. असें मामा पेशव्यास लिहितो. ( पे. द. ३७, ले. २३३ )

मे अजमास खर्च स्वारी त्रिंबकराव विश्वनाथ सन १७७२ मे अखेर रु. १३९००००० ( पे. द. ३७, ले. २३४, व पे. द. ३९ ले. १४१ )

मे श्रीमतांची आज्ञा मामास होती, म्हणून तह केला. ते समई हैदराचे पाय सुजले होते. फार व्ययिस्थ होता. तो मेला अशी गप उठली होती. ( पुरं. ३, ले. १०५ )

मे १३ हैदरची पासष्ट लक्ष खंडणी झाली, त्यापैकीं तूर्त ३५ लक्ष घ्यावे. कार्तिकांत तीस घ्यावे. मामांनीं सर्व मुलुख सोडावा. ( पुरं. ३ ले. १०६ व ले. १०८ )

मे १८ हैदरशीं तह झाला. ऐन खंडणी ५० लक्ष व दरबारखर्च दहा लक्ष. पैकीं तूर्त २८ लक्ष, बाकी सावकारी निशा पुरवावी याप्रमाणें करार झाला. ( खरे, ११७१ )

जून ८ विश्वासराव त्रिंबक पेठे यांच्या मुलांस लग्नाचे गडगनेर. ( पे. द. २२ ले. २१९ )

जून ७ 'तुंगभद्रापार झाल्यावर ऐवज देऊं; तवपावेतों रास्ते यास ठेवून जावें' असें हैदर म्हणाला तेव्हां मामानीं जबाब पाठविला, "टिपूस ओलिस दिल्यास रास्त्यास ठेंवून आम्ही जातो. ऐवजासह रास्ते लष्करांत येऊन पावल्यावर टिपूस सोडून देऊं." ( पे. द. ३७, ले. २३५ )

जुलै २८ लक्ष्मणराव रास्ते व मामा यांचें विरुद्ध आलें. हैदरखानाच्या बोलाचालींत मामा व मुरारराव हेच होते. सेनापतीखेरीज पान हलत नव्हतें. त्यांच्या विचारें चौघे सरदार रुष्ट झालें. श्रीमंतांची आज्ञा मामास अशी असेल म्हणून त्यांच्या विचारें चालत होते. ( खरे, ११७४ )

जुलै २८ देतो देतो म्हणून सांगूनही मामानीं एरडकिरें आम्हांस ( पटवर्धनांस ) येऊन दिलें नाहीं. ( खरे, ११७४ )

ऑगस्ट २५ त्रिंबकरावमामा येडूर मांजरीचे उतारास उतरावयास आले. समागमें फौज पांच हजार आहे. ( खरे, १२०१ )

सप्टेंबर २१ त्रिंबकरावमामा वाडीवर मुक्काम झाला. पटवर्धनांनीं घरीं नेऊन वस्त्रें व मेजवानी दिली. (खरे, १२०५) दादा व नारायणराव थेऊर जवळ मामास सामोरे गेले. मामा शुद्ध दशमीस (भाद्रपद) थेऊरास आले. अद्यापि तेथेंच आहेत.

नोव्हेंबर राजश्री त्रिंबकरावमामा यांस पुणियाचे बंदोबस्ताकरितां पाठवून दिले. (खरे, १२१७)

नोव्हेंबर ७ मॉस्टिन पुण्यास आला. त्याच्या घराची व्यवस्था नारायणरावानें मामाकडे सोपविली. (मॉस्टिन, पान २९)

नोव्हेंबर १० चित्रदुर्गकरांबद्दलचा मामांचा चेंगट कारभार श्रीमंतास रुचला नाहीं. मामाचें मतें जाजती पैका देईल त्यांस सांगावा. (खरे, १२१२)

पुण्यांत ब्राह्मणभोजन नित्य पांच हजार घालावें, या प्रमाणें आज्ञा, पुण्याची रात्रीस रखवाली येणेप्रमाणें त्रिंबकरावमामास सांगून आजच पाठविलें. (खरे, १२१२.)

नोव्हेंबर १८ श्रीमंत माधवराव पेशवे यांचें थेऊरास श्रीगणपती मंदिरांतील ओवरींत देहावसान झालें. सौ. रमाबाई सती गेली. (खरे १२२८, १२३०)

नोव्हेंबर २५ दोन पळपुट्या युरोपियनांस धरून देण्याबद्दल मॉस्टिननें मामास विनाविलें; परंतु मामा थेऊरला निघून गेला. (मॉस्टिन, पान ३२)

नोव्हेंबर २८ कावळा शिवला नाहीं, तेव्हा नारायणरावास पुत्र झाला तर माधवराव असें नांव ठेवावें म्हणून उदक सोडले तेव्हां काकस्पर्श झाला. (खरे, १२३३)

१७७३ फेब्रुवारी ८ दादाच्या कन्येच्या लग्नानिमित्य झालेल्या गडगनेरास नारायणराव दादाबरोबर ता. ६-२-१७७३ रोजी गेले. त्यांच्याबरोबर त्रिंबकरावमामाही गेले. (खरे, १२४६. या पत्राची मिति खऱ्यांनीं चूक दिली आहे. ती माघ व॥ १ अशी पाहिजे. अर्थात लेखांक १२४७ ची मितीही माघ व ॥ १ अशीच हवी.)

मार्च १ कोल्हापुरची राणी जिजाबाई वारली. तेव्हां तिच्या पुत्राच्या सांत्वनासाठीं व त्याच्याशीं स्नेहाचा तह करण्यासाठीं मामाची कोल्हापुरास रवानगी. त्यावेळीं पन्हाळा मिळा-

त्यास मिळवावा अशी त्यास गुप्त सूचना. ( मॉस्टिन, पानें ११३–११४ )

मे ६ हैदरवर लौकरच स्वारी होणार. नाशिकहून परत आल्या-वर मामास त्या स्वारीचें नेतृत्व देण्यांत येणार. ( मॉस्टिन पान १५३ )

ऑगस्ट ३० पेशवा नारायणराव याचा भर दुपारीं शनिवारवाड्यांत गारद्यांनीं रघुनाथरावाच्या मदतीनें खून केला व रघुनाथ-रावाच्या नांवें द्वाही फिरविली.

ऑगस्ट ३१ प्रस्तुत मामा व मोरोबा आजच्या बोलण्याचालण्यांत फार करून आहेत. ( खरे, १२६० )

सप्टेंबर २ त्रिंबकरावमामा वाड्यांत नित्य जातात. ( खरे, १२५७ ( नारायणरावाचा खून झाल्यावर त्याच्या शरीराचे भाग एकत्र करून ते त्रिंबकराव मामानीं कांहीं तेलंगी ब्राह्मणांच्या मदतीनें नडगेमोडीवर रात्रीं नेले व दहनसंस्कार केला असा उल्लेख, ना. भो. ब; धा. रा. च.; भट पेशव्यांची हकीकत; ना. पे. बखर; हरि वं. ब.; ग्रँट डफ वगैरे ग्रंथांत आहे. खुनानंतर मामानें दादाची गांठ घेतली व तेव्हां मामानें दादाची निर्भर्त्सना केली असे ना. भो. ब.; ह. वं. ब; ना. पे. बखर, वगैरे ग्रंथांत आहे. हरि-वंशाच्या बखरींतील मामाच्या तोंडचे "श्रीमंत बाजीराव साहेब यांचे पोटीं पोरगी जन्मास आला असतास तर एक्या ब्राह्मणाचें घर उभें राहतें ! हें काय केलेंस ?" हे रघुनाथरावासंबंधीं उच्चारलेलें शब्द मशहूर आहेत. )

सप्टेंबर मामाच्या घरास जात असतो. नाना व बापू यांच्या घरीं जातो. साऱ्यांचें दैव फिरलें. ( खरे, १२६१ )

सप्टेंबर ५ फडणिस मंडळी दरबारास येत असतात. रा. मामाही येतात. ( खरे, १२६२ )

ऑक्टोबर ११ आनंदीबाई गंगाबाईचा गर्भपात व्हावयाचीं साधनें करितात ! गर्भपात न झाल्यास मारावी, तें न झाल्या पुत्र झाल्यास त्याला अपाय करावा या साधनांत आहे. बचाव कोणाच्यानें होईनासा झाला ( खरे, १२७२ )

ऑक्टोबर २२ " तुमची वाट पाहिली, परंतु आले नाहीत. आम्ही तर शुक्रवारीं श्रीमंतांची आज्ञा घेतली. रविवारीं ( ता. २४

-१०-१७७३ ) येथून जाऊं. तुम्हांस खर्चास तीस हजार नक्त व कापड आठ हजार आख ठेविलें आहे, असें सखाराम बापू त्रिंबकरावास लिहितो. ( पे. द. ५, ले. ४ या लेखाची तारीख मुळांत चूक आहे. ती येथें दिली तशी पाहिजे. )

ऑक्टोबर ३१ मोंगलाच्या मदतीनें साबाजी भोसले पेशव्याच्या मुलखास उपसर्ग पोचवूं लागला. तेव्हां त्याजवर त्रिंबकरावमामा या समागमे राजश्री मुधोजी भोसलेही आज कूच करून जाणार. ( खरे, १२८७ व १२८९ )

नोव्हेंबर १ दादानें दहा हजार फौज व तोफखाना यांसह त्रिंबकराव मामाची साबाजीवर पाठवणी केली. ( मॉस्टिन पान २६० व पुन्हां पान २६१-६२ वर ही फौज २०००० स्वारांची होती असें तो म्हणतो. )

नोव्हेंबर ९ त्रिंबकरावमामा पांच हजार फौजेनिशी पुढें गेले आहेत. त्यांच्या कहीची व मीर मुसाखानाच्या कहीची गांठ पडली होती. ( खरे, १३१४ )

नोव्हेंबर १२ रघुनाथरावानें नलदुर्गावर मोर्चे लाविले. त्याच्या फौजेपासून मामा सहा मैलांवर आहे. मामा व रुक्नुद्दौला यांच्यामध्यें साबाजी आहे. ( मॉस्टिन, पान २६१ )

नोव्हेंबर १२ निंबाळकरांचा घेतलेला पैका माघारा करा असा दादाचा मामास हुकूम. ( पे. द. ५, ले. ३ )

नोव्हेंबर १३ साबाजीवर त्रिंबकरावमामा व रास्ते यांस सडे रवाना केले आहेत. ( खरे, १२९२ )

नोव्हेंबर १४ मोगलाचा बिघाड झाला. मामा पुढें गेलेच आहेत. ( खरे, १२९४, १३१३ )

नोव्हेंबर १८ साबाजी पाथरी बारवणीकडे आहेत. त्याचे पिछावर मामा आहेत. ( पेठे द. ले. ७३ )

नोव्हेंबर २१ नाना फडणीस पुण्यास आले. ( मॉस्टिन, पान २६६ ).

नोव्हेंबर २६ साबाजी पुण्यावर चालून येणार अशी आवई, त्यामुळें पुणें गडबडलें. स्वतःजवळ इतकी मोठी फौज असतांही मामानें पुण्यास असलेलीं आपलीं मुलें-माणसें व चीजवस्त पुण्याबाहेर हलवावी असें लिहिलें ! ( मॉस्टिन, पान २७१ )

नोव्हेंबर २६ साबाजीच्या तोंडावर त्रिंबकरावमामा व आनंदराव रास्ते रवाना केले आहेत. ( खरे, १३०८ )

डिसेंबर २ 'भोसल्यास साम-दामानें वश करतो. आमचे फौजेपेक्षां त्याची फौज भारी; येकायेकीं तो वश होणार नाहीं. घरीं मुलें माणसें आहेत त्यांचा परामर्ष करणें ' असें मामा नारोपंत तुळशिबागवाले यांस लिहितो. ( पे. द. ५, ले. ५ )

डिसेंबर ९ त्रिंबकरावमामानें दादाकडे आणखी फौज मागितली. तेव्हां दादानें नारो शंकर, विंचूरकर व यशवंतराव पवार यांचीं पथकें त्याच्या मदतीस पाठवून दिली. ( मॉरिटन, पान २८१ )

डिसेंबर ११ साबाजी औरंगाबादेकडे आहे. त्रिंबकरावमामा त्याच्या मागावर आहेत. साबाजीनें हल्ला केल्यास किल्ल्याचा आश्रय घेण्याचा मामाचा विचार आहे.

डिसेंबर १३ त्रिंबकरावमामा यांचा मुकाम गोलगांव गदाण्यास आजचा जाहला. उदईक जाणार. ( पे. द. ३६, ले. ३ )

डिसेंबर १४ ' मामांच्या फौजेंत आहा. पत्र कां पाठवीत नाहीं ' असें नाना फडणिस सदाशिवपंत करमरकरास लिहितो. ( पे. द. ३६, ले. ४ )

डिसेंबर १९ ' आज मामाचे डेऱ्यास जातो. तो माझें ऐकत नाहीं,' अशी देवाजीपंत चोरघोडे तक्रार करतो. ( पे. द. ७४ )

डिसेंबर २३ " साबाजी भोसले यांचें सूत्र मामाकडे आलें. त्यास दादासाहेबानीं मामास लिहिलें कीं 'सल्ला न करणें'. मामाकडे आणखी फौज पाटवावी असें झाल्यास पटवर्धनांस पाठ वितील. ( खरे, १३११ )

डिसेंबर २३ महंमद इसफ व सुमेरसिंग यांस जमीयतीसुद्धां व चार तोफा हजार-पाचशें राऊत यवनाचे सल्ल्यापूर्वीच मामाकडे रवाना केले आहेत. ( खरे, १३१४ )

डिसेंबर २३ मामा व साबाजी यांचा सलूख झाला. ( पेठे द. ले. ७५ )

१७७४ जानेवारी १२ सुमेरसिंग व महमद इसफ यांचे मामाशीं बिनसलें. तेव्हां मामा नको नको म्हणत असतां सुमेरसिंग व महंमद इसफ, तोफा मामाकडे ठेऊन परत दादाकडे निघून गेले ( पे. द. ३६, ले. ११ )

जानेवारी १२ साबाजी भोसले याची व दर्याबाई व रघोजी भोसले यांची भेट करून द्यावी असें दादानें मामास कळविलें. ( पे. द. ३६, ले. ११ )

जानेवारी २१ अनेकवार बोलाविलें तरी त्रिंबकरावमामा राघोबाकडे न जातां औरंगाबादेजवळच साबाजीवर शह देऊन आहे. ( मॉस्टिन, पान ३०३ )

जानेवारी २४ मामा व साबाजी यांची एकी झाली असून त्यांचीं सैन्यें खालीं सरकूं लागलीं आहेत. ( मॉस्टिन, पान ३०५; खरे, १३२० )

जानेवारी २५ त्रिंबकराव पेठे यास साताऱ्यास पदाचीं वस्त्रें आणावयास पाठविलें आहे, तरी सांप्रदायानुरूप व्यवस्था करावी. ( ऐ. प. व्य. १३६ )

जानेवारी २६ गंगाबाई व पार्वतीबाई यांस लौकरच वाड्याबाहेर काढून साताऱ्यास नेणार असें ऐकतो. ( मॉस्टिन, पान ३०७ )

जानेवारी २८ वस्त्रें नेण्यास त्रिंबकराव, अप्पा वगैरे यावयास अवकाश आहे. समय साधून वस्त्रें आधींच घेऊन ठेविलीं हें फारच छान केलें. ( ऐ. प. व्य. १३७ )

जानेवारी २९ सदोबा ( तोतया ) सोडून देणार अशी वदंता आहे व त्याकरितां मामा व साबाजी मोठ्या फौजेनिशी करकुंबे-नजीक आहेत. तोतयास ते पुरंधराबर नेणार आहेत म्हणे. ( मॉस्टिन, पान ३०९ )

जानेवारी ३० आज सकाळीं ६ वाजतां गंगाबाई व पार्वतीबाई यांच्यासह नाना फडणिस, हरिपंत वगैरे पुरंधरास निघून गेले. ( मॉस्टिन, पान ३१० )

जानेवारी ३० गंगाबाई व पार्वतीबाई यांची पुरंधरास रवानगी केली. बापू, नाना समागमे गेले. ( खरे, १३२२ )

जानेवारी ३० तुम्ही सातारा किल्ल्यावरील चौकी पहारा नीट ठेवणें. मामा व साबाजी लौकरच येतील असा गंगाबाईचा नागोजी शिंद्यास हुकूम. ( सातारा, शिंद्याचें ले. कागद ३४० )

फेब्रुवारी २ भवानराव व हुजरात यांची गोळागोळी होऊं लागली. सर्वत्रांनीं मिळून मुख्यांस विश्वरूप दाखवावें असा संकेत आहे. ( खरे, १३२६ )

फेब्रुवारी ३ सखारामपंत, त्रिंबकराव, साबाजी, आम्ही, मोरोबा वगैरेंनीं गंगाबाईचें रक्षण करावें व दौलतीचा बंदोबस्त करावा म्हणून सर्वांचें मानस एक झालें. बापूचा संशय न घेणें. खावंदांच्या वंशाचें बरें व्हावें हीच सर्वांची इच्छा असें नाना फडणिस बाबूराव आपटयास लिहितो. (ऐ. प. व्य. १३८)

फेब्रुवारी ७ 'फौजेसुद्धां चिरंजीव लष्करांत मामापाशी आहे,' असें नारो शंकर बापूस लिहितो. (पे. द. ५, ले. १० व पे. द. ३६, ले. १४)

फेब्रुवारी ७ मामानी मसलत केली ती बरीच जाली. जें लिहावयाचें तें परभारें कोणासही न लिहितां मामासच लिहून पाठवावे. त्यामुळें सर्व याचे लगामी राहून जय बरा पडेल. (पे. द. ५, ले. ११)

फेब्रुवारी ७ मामा व साबाजी यास निजामास सामील होण्याविशी मसलत असल्यास शेरजंग सर्व प्रकारें मदत करण्यास तयार आहे. (पेठे द. ७६)

फेब्रुवारी ८ 'दर्याबाईला मायेत सिरोन मायेंत घेतली. साबाजीही लगामीं ठेविला. एका दोघास पुण्यास ठेवून तुम्ही फौजेंत यावें. तोफखाना जरूर हातीं लागावा. ईशकृपेनें योजिले सिधीस जाईल' असें मामा बापूस लिहितो. (पे. द. ५, ले. १२)

फेब्रुवारी ९ 'तूर्त ऐवज तीन लक्ष रुपये पाठवावे. प्राप्त जाला प्रकार आकाश कवलून जसा सेवटास जाईल तसा कडेस लावावा, तरच सर्वांची आबरू' असें त्रिंबकरावमामा बापूस कळवितो. (पे. द. ३६, ले. १६; पे. द. ५, ले. २०)

फेब्रुवारी ९ मामा व साबाजी बीडनजीक दुधनापूर्णा संगमी आहेत. (पे. द. ३६, ले. १५)

फेब्रुवारी ९ 'बाबूजी नाईक व कृष्णराव काळे हे कदाचित अमृतरावाच्या राजकारणासाठीं दादाच्या लष्करांतून इकडे आले असतील. त्यांस आपल्यांत मेलवून घ्यावें. पुढें अस्सल निर्माण जाहालियास नकलेस कोण विचारतो' असें त्रिंबकराव बापूस सुचवितो. (पे. द. ५, ले. १५)

फेब्रुवारी ९ गावांत लोक बोलतात जे मोरोबादादास निराळे टाकले

हें वाईट केलें. ते उगेच राहणार नाहींत. ( पे. द. ५, ले. १७ )

फेब्रुवारी ९ पुण्यास कांहीं गडबड झाली आहे असें ऐकतो. तुम्ही तेथें असतां गडबड कां व्हावी ? तरी कारण कळवावें असें दादा नानास विचारतो. ( पेठे द. ७७ )

फेब्रुवारी जवाहीरखाना सिंहगडीं नेला. पार्वतीबाई व गंगाबाई यांस मारावे असे मारेकरी सापडले. त्यांणीं नांवहीं आनंदीबाईचें ( घेतलें ). कारभारी गंगाबाईच्या नांवें सनदापत्रें व नारायणरावाच्या नांवचे शिक्के करितात. ( खरे, १३३० )

फेब्रुवारी १० 'पुण्यांतील कित्येकांनीं फितूर केला. हरामखोर ढंगास प्रवर्तले. मीही मजल दर मजल साताऱ्यास येतो. छत्रपतीस तुम्ही किल्ल्यावर नेऊन ठेविलें ही गोष्ट फारच संतोषाची' असें दादा नागोजी शिंदे यास लिहितो. ( पे. द. ५, ले. १८ )

फेब्रुवारी ११ 'तोफखाना तिकडे, गाडदीही तिकडे, पागाफौजही तिकडे केवळ ब्राह्मणमंडळी इकडे! ज्यास चाकरी घेणे पडते त्यास हुकूम जरब राखोन, त्याची उमेद खुशालीही राखावी लागते. त्यापक्षीं सर्वांचा उचित प्रकारें जवाहीर पोषाख लौकिकास वाढविणें वगैरे करावें लागेल. तरच आपली पत वाढेल. तरी सरंजाम पैका पाठवावा' असें त्रिंबकराव बापूस लिहितो. ( पे. द. ५, ले. १९ )

फेब्रुवारी १२ मामा, साबाजी व दर्याबाई फौजसुद्धां खंदारनजीक मुकाम जाला. तोफखाना मागे राहिला. ( पे. द. ३६, ले. १७ )

फेब्रुवारी १४ 'माझी खातरजमा असावी; स्त्रियांचें परिपालन, गर्भसंरक्षण करणें जरूर. मसलत थोर. तुम्ही व मी फौजेंत राहूं. मोरोबा व नाना पुण्यास कार्य उरकतील. चौघानी च्यारी तनवा धरल्यावर सिबीर उभे राहते. साबाजी व दर्याबाई यास वागाविणें कठीण. त्यांची खातरजमा केली. साबाजीनें पदाविषयीं सध्यां बोलूं नये, मात्र दहा हजार फौजेंत उणे न व्हावे असें कबूल केलें आहे' असें त्रिंबकराव बापूस लिहितो. ( पे. द. ५, ले. २४, २६ )

फेब्रुवारी १४ 'साबाजी व दर्याबाई यांची एकवाक्यता केली. पैका पाठवा. याउपर जें लिहिणें तें आम्हांसच लिहून सुचवावें. देणेंही आमचे हातून पाववावें' असें त्रिंबकराव मोरोबा-दादास कळवितो. (पे. द. ५, ले २५. या पत्राची तारीख मुळांत चूक आहे; ती येथें दिली तशी पाहिजे.)

फेब्रुवारी १५ दर्याबाईची समजूत मामांनीं केली. वराडांत जाऊं दिली तरी संकट, जवळ राहूं दिलें तरी संकट! शेवटीं सभागमेंच ठेविली. (पेठे द. ७८; पे. द. ३६, ले. २३)

फेब्रुवारी १५ ' कायावाचामनसात्रिपुटी संकेत निश्चय हाच कीं आपल्या सिधांत आहो. मामा व आम्ही एक विचारे आहों' (पे. द. ५, ले. २९) असें साबाजी लिहितो. (पेठे द. ७९) आधीं योजिली मसलत सिद्धीस जावी; मग सेनासाहेबसुभा पदाची घालमेल व्हावी. (पे. द. ३६, ले. २५).

,, दर्याबाईचा पायबंद दूर झाला (पेठे द. ७८, ७९, ८०) मोकली सोडलियास दहा—बारा आहेत. वऱ्हाडांत जाती तर तिकडे गडबड करती. (पेठे. द. ७८, ९२, ९३, )

फेब्रुवारी १६ दादासाहेबांची पत्रे मामास आलीं. मामानीं साफच कळाविलें कीं, "आम्ही आपले चाकर नाहींत. इतके दिवस खावंद म्हणोन चाकरी एकनिष्ठ केली त्याचें बक्षीस आपण दिल्हे. या उपरी आमच्या मनास येईल तसें करूं." (पेठे. द. ९५)

फेब्रुवारी १६ साबाजी व दर्याबाई यांची भेट मामानीं युक्तीनें व जरबेनें करून त्यांचें समाधान केलें. मामानी कारस्तानी बहुत केली. (पेठे. द. ९५; पे. द. ३६, ले. ३१)

फेब्रुवारी १९ दादानें निजामास पत्र लिहून आम्हांस मिळावें असें विनविलें. तेव्हां तो म्हणाला, 'जो आपलें राज्य रक्षील त्याचे शरीक आहो. श्रीमंत राज्य रक्षितील येसे दिसत नाही. त्यांचा विश्वास पुरत नाहीं.' (पेठे. द. ९६)

फेब्रुवारी १९ मामानें दर्याबाईस बजाविलें 'निखालसपणें सरल वर्तावें काडीमात्र अंतर पडिल्यास पारपत्य करूं.' मामास कळलें कीं, 'पुण्याहून सेनासाहेबसुभा पदाचीं वस्त्रें आलीं. तेव्हां ती त्यानीं स्वतःजवळ ठेवून घेतलीं.' देवाजीपंतास फोडण्याचा दादानें प्रयत्न केला. (पेठे. द. ९७)

फेब्रुवारी १९ यैवज आणविणे तो मामानींच आणवून आम्हांस द्यावा आणि आपण त्याजकडे पाठवावा. (पे. द. ३६, ले. २५.)

फेब्रुवारी २० दिवाकरपंतास पाठवून जाब्रीतजंग घोशास आणण्यासाठीं मामानीं पाठविलें आहे. (पेठे द. १००)

फेब्रुवारी २१ तुम्ही सर्वांची जोड घालून येकवाक्यता घडवून आणिली हें उत्तम केलें. याचें सार्थक तेंच कीं चौघे येकाचित. कोणी कोणाचे उणे कधींही पडूं देऊंच नये. (पे. द. ५, ले. ३१)

फेब्रुवारी २१ 'सर्वांनीं एकावर भार द्यावा, त्याची योग्यता. राजश्री बापू सर्वांस वडील केलेला पुरुष. त्याणींच आवघे डोईवर घेऊन करावे, आम्ही तुम्ही सर्व त्यास आनकूल व्हावे.' (पे. द. ५, ले. ३३)

'माझा स्वभाव साफ सरल, आंत येक बाहेर येक असें कधींहि नाहीं. सर्वांनीं चार कामें निर्लोभपणें आटोपावीं. एकाचें उणें तें सर्वांचें' असें त्रिंबकराव नाना फडणिसास लिहितो. (पे. द. ५, ले. ३३)

फेब्रुवारी २२ रुक्नुद्दौलाचे मनांत साबाजी व मामा यांची भेट व एकवाक्यता होय तोपर्यंत नबाबास मनसबा कलो नये असें आहे. (पेठे द. १०१)

फेब्रुवारी २२ श्रीमंताचे लष्करांत फितुर झाला आहे. भवानराव, वामनराव वगैरे लोक बेदील आहेत. (पेठे द. १०१)

फेब्रुवारी २४ 'कृष्णराव काळे यास जवाहीर, पोशाक, पैका वगैरेसह आम्हाकडे पाठवून देणें. तोफा व दारूगोळाही पाठवावा सातारियास कोणी शाहाणा जावा. तेथील शोभा करून तोच तोरा काढिणें', असें त्रिंबकरावमामा नाना फडणिसास कळवितो. (पे. द. ५, ले. ३५)

फेब्रुवारी २४ मामा व साबाजी दोनचार दिवसांत तुळजापूरच्या रोखे फौजेसुद्धां जाणार. निजामअली फौजसुद्धां कलबुर्ग्यास आहे. (पेठे द. १०२)

फेब्रुवारी २५ संदेहाचें पात्र खरे, परंतु दर्याबाईस जवळ बाळगली आहे. त्यास पन्नास हजार निदानी पाऊण लक्ष रुपये दरमहा पाच महिन्याचे दिले पाहिजेत. (पे. द. ५, ले. ३६)

फेब्रुवारी २६ त्रिंबकराव व साबाजी रेणापूर लातूर प्रांतीं आले (पे. द. ३६, ले. ३५)

फेब्रुवारी २६ हेडगुल येथें आलो, पंढरपुराच्या सुमारें येतों. मामा व आम्ही येकाचित्त आहो. लक्ष दुसरे नाहीं. मामाच्या आशेस बिलकूल प्रतीकूल नाहीं (पे. द. ३६, ले. ३७)

फेब्रुवारी २७ आपाजीराम श्रीमंताशीं घासाघीस करीत आहे. श्रीमंतासी इकडे यावयासी निकड आहे. फौज कह्यांत नाहीं, खर्चाची मोठी ओढ. कोणीही सावकार पैसा देत नाहीं. (पेठे. द. १०४)

फेब्रुवारी २८ 'रघुनाथ बाजीराव याजकडील पेशवाई दूर केली. तरी तुम्ही भवानराव, त्रिंबकराव विश्वनाथ, साबाजी भोसले व वामनराव यांच्या लक्षांत राहून स्वामीसेवा करणें' असें छत्रपतीचें आज्ञापत्र. (का. सं. प. या. २३०)

फेब्रुवारी २८ या कामी येकहातीं येकहुकमी येक विचारें सोय गैरसोय जाल्यानें आव्र राहून मजाहि पडते असें त्रिंबकराव नाना फडणिसास लि॥. (पे. द. ५, ले. ३९)

फेब्रुवारी २८ त्रिंबकरावमामा व भोसले ३०।३५ हजार फौज एकदिल आहे. मोगलाचा लढा राहिला नाहीं. मामा फौजसुद्धां त्या लष्कराजवळ गेल्यावर संकेताप्रमाणें सारे एकत्र होतील आणि दादासाहेबास धारितील अथवा लुटतील. (खरे, १३३०)

फेब्रुवारी २८ अविंध कलबुर्गेयास आहे. त्यास मेलवून घेण्याकरितां मामा कलबुर्ग्यास जाणार. मामा आमच्या बोलण्याकडे लक्ष देत नाहींत. (पेठे द. १०५)

फेब्रुवारी २८ घऊशे यास आणावयास देवाजीपंत पाठविले; परंतु ते अद्यापि आले नाहींत. साबाजीस दादासाहेबांचीं पत्रें येतात कीं, 'अविलंबे येऊन पोहचावें, तुमचा बंदोबस्त तुमचे मनोदयानरूप करून देतो.' (पेठे द. १०७)

मार्च ३ आमच्या व मोगलाच्या फौजेंत चौ कोसांची तफावत आहे. आम्ही व मामा रुक्नुद्दौलास भेटलो. (राजवाडे १०, ले. ८९, ९०, ९२, ९३, ९६)

मार्च ३ दादाकडून आज चार दिवसांत अनुसंधानें चौघांचे हातून साबाजीकडे आलीं. तेव्हां मामा म्हणाले 'श्रीमंतांचीं सूत्रें येतात, तेव्हां कोणी कचेपके होतील.'

मामाचें भाषण रूक्ष. त्यांचा सल्लागार देवाजीपंत; मामास ते आप्त वाटतात. ( राजवाडे १०, ले, ९५ )

मार्च ४ नबाबास वीस लक्षांची जागीर व दोन किल्ले देतो असें दादासाहिबानीं सूत्र लाविलें आहे. ( राजवाडे १०, ले. ९६. )

मार्च ६ ' मुराराव यासी दादासाहेबांचा निरोप घेण्यास आम्ही सांगितलें. त्यानींहि घेतला. तेव्हां आम्हीहि रहात नाहीं असें म्हणालो. तेव्हां आम्हां दोघास निरोप दिल्हा. मामा कोठें जवळपास नाहींत त्यांचा उदय झाला म्हणजे आम्ही त्यास मिळतो ' असें वामनराव लिहितो. ( S. H. P. Shinde, Vol. II ले. ३५१ )

मार्च ६ ' मंडळीचें चित्त कीं तुर्तच गडबड करावी. श्रीमंतांनीं शफत घ्या म्हणून सांगितलें. तुमचे मांडीवर उसें ठेवितो त्याचा विश्वास न पडे. मामांचें लष्कर जवळ आलें. म्हणजे त्यास मिळतो ' असें वामनराव नाना फडणिसास कळवितो. ( S. H. P. Shinde Vol. II ले. ३५२ )

मार्च ६ हरिपंत फडके त्रिंबकराव मामाकडे काल गेले. जलदीनें त्यानीं जावे. मोगलाच्या व मामाच्या भेटी अक्कलकोटा-जवळ झाल्या. ( खरे, १३२५; राजवाडे १०, ले. ९९, १००. )

मार्च ८ सेनासाहेबसुभा यास टाकून खलबत करणें मामास उचित नाहीं. समयी मामा मानभंग या रीतीनें करतात. दर्या-बाई मामानी बगलेंत मारिली यामुळें बखेडे होतात. त्यास साह्य देवाजीपंत. साबाजी मानपान मनांत न आणतां मामांच्या मर्जीप्रमाणें वागतात. (राजवाडे १०, ले. ९८)

मार्च ९ नरसिंगराव धायगुडे यांनीं गुंजोटीनजीक मामास जाऊन मिळावें. ( राजवाडे १०, ले. ९९; खरे १३३७ ).

मार्च ११ चाळिस हजार फौजेनिसी मामा साबाजी व धौंशा अबजल-पुरानजीक भीमातीरी आले. दोन्ही फौजांचा मुकाबिला आठ-दहा दिवसांत व्हावा. ( खरे, १३७३ )

मार्च १२ पैका व सैन्य घेऊन मामाकडे जाण्याकारितां हरिपंत फडके पुण्याहून निघाले. ( मॉरिटन, पान ३३७ )

मार्च १२ मामा भंडारकवठ्यास फौजेसह आले. दादाचें लष्कर गडबडलें आहे. मामाचें बल भारी दिसतें. (खरे, १३३१)

मार्च १२ विसाजी कृष्ण बिनीवाले यांचे पुत्रास कैदे करून ठेवले. त्यास चाप लावले. मामा तीस हजार फौजेनिशीं सोलापुरास आले. ( खरे, १३४३, १३४६ )

मार्च १२ मामाची फौज आलंदगुंजोटीकडेच आहे. मामा अद्याप लांबणीवर टाकतात. याचा अर्थ कळत नाहीं. ( S. H. P. Shinde, Vol. II, ले. ३५४ )

मार्च १५ जागा जागा प्रस्थें आणि समय या प्रकारचा. मामाशीं संबंध असलिया उत्तम नाहीं. तरी राजश्री बापू व राजश्री नाना व तात्या उभयतांही यावें. तात्या तरी असावेत. ( राजवाडे १०, ले. १०१, १०२ )

मार्च १४ आमचे पदरीं पैसा नाहीं. पोटावाचून तरी अर्थ सरेना. परस्परें कर्ज घेतलें ऐसें मामासही दिसेल. ( राजवाडे १०, ले. १०३ )

मार्च १७ हरिपंततात्या फाल्गुन वद्य चतुर्दशीस लष्करांत आले. त्यांस सर्व सांगितलें. त्यांच्या बोलण्यांतील अर्थ मामांची मर्जी राखावी. ते देतील तितकाच पैसा घ्यावा. ( राजवाडे १०, ले. १०६ )

मार्च १७ श्रीमंत दादासाहेब फौजसुद्धां साताऱ्याच्या रोखानें जात आहेत. ( राजवाडे १०, ले. १०७ )

मार्च १७ राजश्री मामा व आम्ही लौकरच एक जागा होऊं. श्रीमंतांचें लष्कर मिरजेकडे येणार म्हणून लौकर येत आहे. श्रीमंत जवळ आले आहेत तरी सावध असावें. ( खरे, १३४० )

मार्च १८ मामाच्याकडून साबाजीस फोडून आपल्याकडे आणण्याकरितां दादासाहेबानीं पाठविलेली कलमबंद यादी. ( ऐ. प. व्य. १४० )

मार्च १८ मामाचे अजून ठिकाण नाहीं. श्रीमंतांचा मुक्काम आसंगीवर आहे. मामाच्या लष्कराची बातमी लागे तों आम्ही बागलकोटचे पंचक्रोशींत आहों. श्रीमंतांच्या लष्करानें बहुत लुटालूट केली. ( खरे, १३३८ )

मार्च २० मोगलानें मौजे दिघी लुटला; नाश बहुत झाला. मराठे व ब्राम्हण बाइकांची अब्रू घेतली. याजकरितां सरदार मामाकडे गेले. तेव्हां मामानीं अर्विंदाच्या वकिलाची मनमानें तैशी भाषणें केलीं व त्याला लष्करांतून काढून

दिल्हे. त्यामुळें नवाब अजुर्दा आहेत. ( राजवाडे १०, ले. १०९ )

मार्च २१ साबाजीच्या गोटांत धरणी पारणी, कटकटी, रुसवे केवळ पैशासाठीं नित्य चालू. भोसल्यास मामानीं पाऊण लक्ष रुपये दिले. दादाकडून संधान आलें. परंतु साबाजी खंबीर आहे. ( राजवाडे १०, ले. ११० )

मार्च २१ मामा कऱ्हाडचे सुमारें येणार होते, परंतु श्रीमंत मिरजे-पुढें आलें नाहींत. हें कळल्यावर कऱ्हाडकडे येणार नाहींत. मामा–भोसले मिळून पन्नास हजार फौज. भोस-ल्याची फौज अनिवार. गांव लुटितात. ताकीद करूनही ऐकत नाहीं. ( खरे, १३३५ )

मार्च २१ मामाचें सैन्य मायणीवर आहे. भोसले व अविंध कले-ढोणावर आहेत. रोजाचे दिवस अविंधाचे आहेत. मुकाम होईलसें वाटतें. ( खरे, १३३९ )

मार्च २१ हरिपंत फडके साताऱ्यास महाराज आणावयास आले आहेत. श्रीमंतांनीं कृष्णेचें पाणी धरिलें, मामानीं वेरळेचें पाणी धरिलें. गांठ कोठें पडते पहावें. मोगलाचें लष्कर बेकैद अनिवार. तमाम गांव जाळून लुटून फस्त करतो. बायकांची बेअब्रु करितात. ( खरे, १३३९ )

मार्च २४ हरिपंत फडके मंगळवारीं निघून तेच दिवशीं बावीस कोस प्रवास करून राजश्री मामाच्या लष्करांत दाखल झाला. साताराहून आल्यावर तेथील बंदोबस्ताची हकी-कत त्यानें मामास सांगितली. ( S. H. P. Shinde, Vol. II ले. ३५५ )

मार्च २५ मामानीं भोसल्यास सव्वा लक्ष रुपये देण्याचा करार केला आहे. ते निदान दोन तरी पाहिजेत. मामा राज्यांत शहाणे हें खरें; परंतु सत्तेचें शहाणपण आहे. ( राजवाडे १०, ले. ११३ )

मार्च २६ कासेगांवची लढाई. दोन प्रहारां मामासी व दादासी मोकाबला जाहला. ( हिचें वर्णन खरे, १३४९ व राज-वाडे १०, ले. १३० मध्यें सविस्तर आहे. )

मार्च २७ मुसलमानांच्या ताबुताचे दिवस म्हणून साबाजी मार्गे राहिला. दादा पंढरपूरच्या सुमारें कूच करून चालले;

| | |
|---|---|
| | तेव्हां मामा सडेच होऊन त्यांच्या मार्गे गेले. गफलत जाहली. ( पे. द. ३६, ले. ४१ ) |
| मार्च २७ | कासेगांवीं श्रीमंतांची फौज चालून आली. अगोदर श्रीमंतांनीं कृष्णराव पानसे यांच्या नांवची चिठी पाठविली कीं तहाबद्दल बोलणें व्हावें. त्याबद्दल वाटाघाटी मामा करीत असतांच दादांची फौज चालून आली. चकमक झाली. मामास तोंडावर जखम होती. अलीकडे आले. तेथें खालीं आले. पुढें त्यांचें काय झालें कळत नाहीं. मामा नाहीं म्हणून आम्ही कामास चुकत नाहीं. ( खरे, १३४९ ) |
| मार्च २७ | मामा जखमी पाडाव नेले. मोहरमचे दिवस म्हणून मार्गे राहिलो. मामानी उतावळी केली. वामनराव, रास्ते, नारो शंकर पथक व शिवराम विठल वगैरे समग्र आहो. ( राजवाडे १०, ले. ११५, ११६, ११७ ) |
| मार्च २८ | सड्या फौजांची लढाई होऊन मोड झाला, मोगल पिछाडीस होता. ( खरे, १३५४ ) |
| मार्च २८ | मामा वीस हजार स्वार घेऊन कासेगांवीं आला. मुकाबला जाहला. त्यास जय न मिळतां तो निमकहराम कैद झाला. आम्हास मोठी लूट मिळाली. ( पेठे प. ८३ ) |
| मार्च २९ | मामाचें वर्तमान लोक मनस्वी बोलतात. (पेठे द. ११०) |
| मार्च ३० | मामांचा मोड होऊन त्यांचा पळ आला आहे. ( पेठे द. १११ ) |
| मार्च ३० | दादासाहेब छाप्याचे अनेक दगे करितील तरी मजबुतीनें असावें मामा गेले तर काय चिंता आहे. सर्वांचें मनोधारण रक्षावें. ( खरे, १३५५ ) |
| मार्च ३१ | मामा धरले म्हणोन लिहिले. तरी तुम्ही देखतपत्र सत्वर यावे. ( पेठे द. ११२ ) |
| मार्च ३१ | दादानें अकल्पितपणें मामावर हल्ला चढविला व मामाचा पराभव झाला. अनेक जखमा झाल्यानें मामा कैद झाला. हरिपंतही कैद झाला असावा असें वाटतें. ( मॉस्टिन, पान ३४२ ) |
| एप्रिल १ | त्रिंबकरावमामा गेल्यानें हुजरातींत वगैरे मनसब्यांत वजन नाहीं. ते मातबर होते. राजश्री हरिपंततात्या मेहनत करितात, परंतु अंतर पडतें. त्रिंबकरावमामांनीं पेच पडेल |

म्हणून केलें. तेंच मनसबा शेवटास जाई तों राखले पाहिजे. ( खरे, १३५७ )

एप्रिल २ दादाच्या पाठलागास मामा व वामनराव वगैरे सडी फौज गेली. त्यांनीं सलुखाचा मजकूर घालून अकस्मात मामावर फौज पाठवून लढाई जाहाली. मामा पाडाव जाहाले. ( इ. सं. ऐ. टि. ६२. याची तारीख २ एप्रिल १७७४ अशी पाहिजे; मुळांतील चूक आहे. )

एप्रिल २ मामानीं उतावळी केली. एक दिवस गाठ घातली नसती तर बरें झाले असते. श्रीमंत मोख्याहून पुढें गेले. गांठ लवकरच पडावी. ( राजवाडे १०, ले. ११८ )

एप्रिल २ मामा गेले म्हणून कोणी आव टाकिला नाहीं. सूर्यास्तीं मामाचा पळ येऊं लागला. त्यास साबाजीनें धीरभरंवसा दिला. ( राजवाडे १०, ले. ११९, १२० )

एप्रिल ३ हरिपंत फडके नारो आप्पाजीस लिहितो, 'सातारचा बंदोबस्त करून लष्करांत आलो. मामानीं सडी स्वारी करून पाठिलाग केला. लढाईचे तोंड लागावे इतक्यांत कृष्णराव माधव दरोगे तोफखाना यांची चिठी आली. मागाहून मुधोजीची चिटी आली. त्यांत मजकूर लढाई करूं नये, इकडील बोलणार यावयाचे आहेत. मामा चिठीचा जाब लिहीत बसले असतांच अकस्मात लढाईस सुरवात झाली. खाशा निशाणाखालीं आम्ही व मामा होतो. मामा जखमी होऊन दगाबाजीनें पाडाव गेले. ( पे. द. ५, ले. ४३ )

एप्रिल ३ त्रिंबकरावमामास जखमा लागल्या होत्या. फुटून चैत्र व॥ ७ सप्तमीस ( ता. ३–४–१७७४ ) देवआज्ञा जाहली मोठे वाईट झालें ( राजवाडे १०, ले. १२४ )

एप्रिल ५ भवानराव प्रतिनिधी तीनसे स्वारानिशी आले. परंतु नावाचे मनुश. मोठें काम जाहाले. श्रीमंत परश्रमी फार जाले. मामा हस्तगत जाहाले, त्या हर्षापेक्षां हा विषाद बहुत मानतात. ( भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष ११ अं. २, सन १९३० लेखांक १७५ )

एप्रिल ६ तीर्थरूपानीं राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यासी सलुखाचा संदर्भ लाविला यामुळें त्याणीं विश्वासेंकरून हजार पाचशे राऊतांनसी त्याचे आसपास जाऊन त्याजकडील

मध्यस्तांशी बोलत आहेत इतक्यांत त्याणीं दगा करून धरून नेले. केवळ सावध असोन धरून नेले असे नाहीं. त्यावरून हवालदील व्हाल तर न होणें. ( S. H. P. Shinde, Vol. II, ले. ३५७ )

एप्रिल ११ मामा सडे होऊन पुढें गेले. तों मामास चिठी आपल्या यजमानाची आली कीं आज तुम्ही माघारे सरून राहणें मामानीं विचार केला कीं ( दादाच्या ) फौजेंत फितूर आहे, तरी लाग करावा. म्हणोन अंदेशा न करितां चालून गेले. मामावर मिठी पडली. मामावर जखमा डोईस वार तरवारेचा, एक ख द्यावर, एक कुशीस, एकूण तीन वार होते. मामा श्रीमंताबरोबर अटकेंत होते. ते जखमांनीं हैराण होऊन खडकतच्या मुकामी देवआज्ञा चैत्र वद्य ८ रविवारी जाली. ( राजवाडे १०, ले. १३० या पत्रांत रविवारीं चैत्र व॥ ८ असें आहे. पण मोडकांच्या जंत्रींत रविवार ७ सप्तमीस आहे. शिवाय राजवाडे १०, ले. १२४ चैत्र व॥ सप्तमी असेंच आहे. यावरून सप्तमीसच मामांचा काल झाला हें निश्चित. खरे आपल्या चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत पान २०२५ वर ' मामा धरले गेल्यावर दुसरे दिवशीं मेला ' असें लिहितात तें अर्थातच चूक आहे. )

एप्रिल १० दादाचें महादजीस पत्र, " त्रिंबकराव पंढरपुरचे मुक्कामीं सडे होऊन झुंजास आले. त्यांचा मोड होऊन ते धरले गेले. दोन तीन जखमा भारी त्यामुळें मृत्यु पावले. ( इ. सं. ऐ. टि. ले. ५४ या पत्राची तारीख एप्रिल १०,१७७४ अशी पाहिजे; मुळांतील चूक आहे. )

एप्रिल १३ कांहीं दिवसापूर्वी त्रिंबकरावमामा जखमांमुळे मृत्यु पावला. त्याचा जांवई मोरोबादादा, मामाची स्त्री सती जाणार असल्यानें, जुन्नरास गेला. ( मॉस्टिन, पान ३४६ )

एप्रिल १४ मुत्सद्यांनीं मोगलांस मिलोन बंड केलें. राजश्री त्रिंबकराव हस्तगत होऊन आठा दिवसी मृत्य पावले. ( S. H. P. Shinde Vol. I, ले. १ )

एप्रिल १७ दादासाहेब बापूस लिहितो, " दौलत बहुता दिवसांनीं वाडिलांनीं मेलविली ते आमचे तुमचे कजियानें बुडवावी

हें तुम्हांस उचित नाहीं. मोगलाचे घरांत दौलत घालितां हें या लोकीं व परलोकीं बरें कीं काय ! पूर्वी नारायेणरावाचा काल जाहला तेव्हां तुम्हीं माडीवर शफत वाहिली ते विस्मरणांत आली कीं काय !( S. H. P. Shinde Vol. II ले. ३६१ )

एप्रिल २७ मामास श्रीमंतांनीं दग्यानें पाडाव करून नेलें. मोगल, भोसले व सरकारची फौज कायम आहे. ( ऐ. प. व्य. ले. १४२ )

एप्रिल २७ त्रिंबकरावमामा मुनहेचा सरदार. समागमींच्या सर्वत्रांस त्याचा भरंवसा असतां सडे निघोन गेले. मामा धरले गेल्यानें बाजी थोडी कमी पडली. तथापि मोगल व भोसले व सरकारची हुजरात मागें आहे. त्यांत कोणी नामी सरदार आळा घालणाराविना बसणार नाहीं. ( इ. सं. ऐ. टि. ५५ व म. शिं. कागदपत्रें, लेखांक १ )

एप्रिल २७ मामास साबाजीविरुद्ध मदत करण्यास श्रीमंतांनीं कळविलें होते. परंतु मामा व साबाजी यांची भेट झाल्यावर मामांचीं पत्रें आलीं कीं ताकपिरास परतोन नेणें इतक्यांत दुहीचा प्रकार जाहला. म्हणून चिरंजिवांचें जाणें मना करविलें. ( म. शिं. कागदपत्रें, ले. २ )

मे २ राजश्री मोरोबादादा आले. किल्ल्याखालींच राहिले आहेत. मामाचे पुत्र आबा ( विश्वासराव त्रिंबक—खरेशास्त्री म्हणतात तें चूक ) आले आहेत. ( खरे, १३६० )

मे ७ राजश्री मामा विश्वासघातामुळें त्यांजकडे सांपडले. वरकड मंडळी खैर आहे. मामा तिकडे सांपडले, मृत्यु पावले, अनुचित गोष्ट झाली ! विश्वासघात केल्यावर उपाय नाहीं. ( खरे, १३६५ )

मे ८ दादासीं करार पूर्वी माधवरावानें केल्याप्रमाणें करावा. त्यांत अंतर दादास वाकडें सर्व प्रकारें योजूं नये. मनसब्यास आरंभीं नारायणरावजीची व शेवटास त्रिंबकरावमामा या उभयतांची कीर्ति तिकडेच असो द्यावी ! या अर्थी कारस्थानींत हरगीज कमी करूं नये. मनसबा शेवटास न्यावा. ( खरे, १३६६ )

मे २६ त्रिंबकराव विश्वनाथ दौलताबादेस होते, तेव्हां त्यांनीं

| | |
|---|---|
| | सरपणास घरें मोडिलीं. तमाम परगणाचे लोक जीव घेऊन गेले. (पेठे द. ले. ११३) |
| जुलै ३० | मागें साबाजी व मामा घाटमाथा आल्यानें आवईनेंच मुलुख वैराण होऊं लागला. म्हणोन शिबंदी वाढविली. (पेठे द. ले. ११४) |
| १७८० डिसेंबर | त्रिंबकरावमामानीं चाकरी जिवाभ्य केली. त्यासी करारमदार केला होता, कीं मागें राहिले याणी त्याची निभावणी करावी. तरी ती गोष्ट विसरूं नये. मामा कामास आले तरी त्याचें कुटुंबसंरक्षण करावें. (पेठे द. ले. ११७) |
| १७८७ नोव्हेंबर १२ | बाबूराव फडणिस व त्रिंबकराव मामा हे आले नव्हते. कर्मानुरूप फलें जाली. (पे. द. ४, पान २९) |
| १७८८ मे १९ | त्रिंबकरावमामा यांस शेणमार दिला. आम्हीच कराविलें (याच्या खालीं पादटीपेंत मामाचा मृत्यु ' मे १७७९ ' असा दिलेला आहे. तो अर्थात चूक असून, खरी तारीख ३ एप्रिल, १७७४ अशी पाहिजे.) (पे. द. ४, पान ४५.) |
| जुलै २७ | भाऊसाहेब व विश्वासराव व त्रिंबकराव व पुरंदरे व समशेरबहाद्दर इतक्यास फौजा देऊन पाठविलें. परंतु याणी विशेष केला नाहीं. (पे. द. ४, पान ७५) |
| १७८९ मार्च १ | चिंचणेर ता। वंदन येथें इनामी जमीन अर्धा चाहूर. त्यापैकीं त्रिंबकराव विश्वनाथ याणीं आपल्याकडे गांव सरकारांतून घेतल्यापासून पाव चाहूर जमीन जबरदस्तीनें घेतली. (S. H. P. Shinde Vol, I, ले. १८४) |
| १८०८ फेब्रुवारी ६ | सर्व सरंजाम जप्त करून दरसाल दोन हजार रुपये दरसाल खर्चास सरकारांतून मिळत जातील ते घेऊन आम्ही येकनिष्टेनें चाकरी करून राहूं असें त्रिंबकराव अमृतेश्वरानें लिहून दिलें. (बाजिराव रोज. २, पान १११) |
| १८३२ सप्टेंबर ८ | पेश्व्यांची कैफियत. या कैफियतींत पेश्व्यांचे विशिष्ट हक्क मानमरातबाचे इरादे दिले आहेत. (वाडकृत कैफियती, पानें १४१–१४४) |

# सूची

ह्या सूचींत व्यक्तिस्थलनामें घेतलीं आहेत. नांवांपुढील कंसांतील आंकडा कालदर्शक आहे व त्यापुढील आंकडा लेखांकाचा आहे.

## अ वर्ग


अक्कलकोट (१७७४) पृ. १२१
अगारखिंड (१७०३) १२१-२२
अगोदे (१७७१) १८५
अच्युतराव (१६८१) ४१
अच्युतराव गणेश (१६८७) ३८
अडबोजी मकोजी (शिक्का) नाईक सितोळे देशमूख (१६४४) १
अनसोजी सितोळे (१७७२) १८०
अनुबाई घोरपडे (१७७१) पृ. १०८, (१७२४-६२) पृ. ८३, ९३
अन्यास्वामी (१६८७) ३५
अबजलपूर (१७७४) पृ. १२१
अबदुल हकीमखान सावनूरकर (१७७२) १७३
अमझरी (१७३९) पृ. ८५
अमलनेर (१६८८) ४६, (१७५१) ले. १२८
अमृतराव ले. १८३, (१७५३) पृ. ९०
अमृतराव बांडे (१६९३) ५५
अमृतराव त्रिंबक (१८०३-७२), १८३
अमृतराव वासुदेव (१६८७) ४५
